# । विश्वस्त ।

सौ. शकुंतला भूपेंद्र करंदीकर



# । विश्वस्त ।

सौ. शकुंतला भूपेंद्र करंदीकर

। विश्वस्त ।

प्रकाशन-तिथी
आषाढी एकादशी
सन १९९२

प्रकाशक
ज्ञानेश्वर चंद्रशेखर आगाशे
श्री प्रकाशन
४९५-९६ शनिवार
पुणे ४११०३०

मुद्रक
मंदार प्रिंटर्स
४९५-९६ शनिवार
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ / मांडणी
अंतरंगातील छायाचित्रे
चित्रकार जयंत ताडफळे

ब्लॉक मेकर्स
'युनिक' मुंबई
'सुप्रीम प्रोसेस' पुणे

भाग्य तेथ विलासु । सुख तेथ उल्लासु ।
हें असो तेथ प्रकाशु । सूर्य जेथें ॥
तैसे सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी कां सनाथ ।
तो श्रीकृष्णरावो जेथ । तेथ लक्ष्मी ॥

— श्रीज्ञानेश्वरी

## चंद्रशेखर गोविंद आगाशे

या ग्रंथाचे चरित्रनायक, माझे वडील.
आज त्यांच्या देहावसानाला उणीपुरी ३६ वर्षे झाली.

इतक्या उशिरा त्यांच्या चरित्र-प्रकाशनाचा योग
येत आहे. वास्तविक, यापूर्वीच या ग्रंथाचे प्रकाशन
व्हावयास पाहिजे होते. अशा स्वरूपाचा ग्रंथ
संपादित करावा असे प्रयत्नही झाले; पण
या कामास चालना मिळाली नाही हे मात्र खरे!

एका लहानशा खेड्यात जन्मलेल्या या मुलाची आई
स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून, मुलांना घेऊन पुण्यात
आली. आणि निराधार असूनही स्वप्रयत्नाने या मुलाने
आईच्या स्वावलंबी संस्कारामुळे जो चमत्कार केला
तो अगदी लोकविलक्षण होता.

आधी विद्यार्थी-जीवनातही बुद्धिमान व तितकेच
कष्टाळू, त्यात शिक्षणातही स्वातंत्र्याच्या
चळवळीचा परिणाम व स्वदेशीचे वेड.
या दौडीत माझे वडील लहानाचे मोठे होत गेले.

सामान्य शिक्षक, सन्माननीय वकिलीपेशातून
माझ्या वडिलांनी वैयक्तिक धाडसावर, त्या काळात
मध्यमवर्गीय माणसाकडून कोटी रुपये उभे करून
'दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट' ही संस्था
स्थापन केली. मध्यमवर्गीयांकडून भागभांडवल उभे
करण्याच्या कल्पनेचे माझे वडील जन्मदाते आहेत.

या कंपनीच्या निर्मितीत स्वदेशनिष्ठा, स्वदेशी चळवळीचे प्रेम होते. वडिलांच्या देहावसानानंतरही परिस्थितीशी आमचा संघर्ष चालूच राहिला. त्यात माझे थोरले बंधू (कै.) पंडितराव यांचे श्रम फार मोलाचे आहेत.

कंपनीच्या सततच्या अस्तित्वाला सांभाळण्यात आमची झुंज कसोटीची होती. वडिलांमाघारी ही कंपनी व तिचे अस्तित्व आणि मध्यमवर्गीय भागभांडवलदारांचा विश्वास आम्हाला सांभाळायचा होता. या साऱ्या प्रयत्नात असताना, सरकारी धोरणांमुळे अखेरीस या कंपनीचा साखरउद्योग 'सहकारी तत्त्वाकडे सुपूर्द करण्याचे' धोरण स्वीकारावे लागले. या कंपनीचे हे स्थित्यंतर कालसाक्षेप आहे खरे, पण याच वेळी आमच्या वडिलांनी जो नवा इतिहास घडविला, शून्यातून जे विश्व निर्माण केले, त्याची नोंद या क्षणी नव्या पिढीसाठी तरी केली पाहिजे, असे तीव्रतेने वाटू लागले.

आमचे मामा श्री. मुकुंदराव गोखले तसेच श्री. दत्ताजी कुलकर्णी यांनी सुरुवातीस संकलन, आठवणी, कंपनीचा इतिहास एकत्रित करण्याचे प्रयत्न केले. श्री. नरुभाऊ लिमये यांनी या आधारावर चरित्रलेखन पूर्ण केले. या सर्वांच्या

प्रयत्नात तळमळ होती, पण काही उणिवा भासत
राहिल्या होत्या. वडिलांच्या माघारी एवढ्या काळात
साऱ्या घटना पाहणारे साक्षीदारही आता राहिलेले
नव्हते, त्यामुळेही असेल. चरित्रलेखनात जो
आत्मीय भाव यायला हवा तो काही निर्माण होईना.

शेवटी आम्ही सर्व भावंडे एकत्रितपणे यावर
विचार करता करता आमच्या बहिणीतील
सौ. शकुंतला भूपेन्द्र करंदीकर हिने हे काम स्वीकारले.
आणि खरोखरीच तिच्या हातून आम्हाला जे चित्र
आणि चरित्र पाहिजे ते स्पष्ट दिसू लागले.
या तिच्या लेखनामागे यापूर्वीच्या सर्वांच्या प्रयत्नांची
मदत होतीच. लेखन वाचल्यावर मात्र धीर धरवेना
व प्रकाशन झालेच पाहिजे ही ओढ लागत राहिली.

स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवण्याची उमेद, स्वदेश व
स्वदेशीवरची निष्ठा आणि परमेश्वरी शक्तीच्या
अधिष्ठानावर पूर्ण श्रद्धा यांचे संस्कार
म्हणजे आमच्या वडिलांचे चरित्र आहे.

आमचे वडील – मामासाहेब म्हणजे पूर्ण भक्तियोग व
कर्मयोग याचे राजस दर्शन होते. श्री विठोबारखुमाई,
श्री ज्ञानेश्वरमाऊली हे त्यांचे विश्वस्त होते.
या विश्वस्तांच्या चरणीच हा लेखनप्रपंच !

दि. १० जुलै '९२
आषाढ शु।। एकादशी

–ज्ञानेश्वर आगाशे

## ॥ ॐ नमोजी आद्या ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥

कोणत्याही चांगल्या कार्याचा प्रारंभ देवतांच्या अधिष्ठानाशिवाय होत नाही; आणि हे चरित्रलेखनाचे कार्य तर मोठेच आहे, म्हणून

प्रारंभी विनति करू गणपति विद्यादयासागरा ।
अज्ञानत्व हरूनि बुद्धि-मति दे आराध्य मोरेश्वरा ॥
चिंताक्लेश, दरिद्रय दुःख अवघे देशांतरा पाठवी ।
हेरंबा गणनायका गजमुखा सर्वां बहु तोषवी ॥

हे मोरेश्वरा, तू विद्येचे दैवत, तू स्फूर्तिदाता म्हणून कार्यारंभी मी तुला वंदन करते.

या कुंदेदुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदण्डमंडितकरा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माऽच्युतशंकर-प्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥


हे महासरस्वती, तू म्हणजे साक्षात ब्रह्मज्ञान आहेस. स्वरांचे स्पंदन, परमाणूंचे स्पंदन, वायूचे स्पंदन म्हणजे तुझ्या क्रियाशक्तीचा आविष्कार आहे. ज्ञानीयांच्या ज्ञानातून, प्रतिभावंतांच्या प्रतिभेतून, महात्म्यांच्या महत्पदातून, साहित्यिकांच्या साहित्यातून सर्वत्र तुझा पदन्यास आहे. शुभ्र वस्त्र धारण करणारी, सर्व कलांचे प्रतीक अशी वीणा घेतलेली, कमलासनावर बसलेली तुझी नयनरम्य मूर्ती माझी स्फूर्तिदायिनी आहे. परममंगल, शांतिरूप, नवनवोन्मेषशाली, जगत्कल्याणी, मुक्तिदायी अशा तुझी मी उपासक आहे. मी साहित्यिक नाही पण तुझी पाईक आहे. म्हणून माझ्या आदरणीय देवतुल्य पित्याच्या चरित्रलेखनाची सुरुवात करताना मी तुला वंदन करते. ज्ञानेश्वरमाउलींनी ज्या तुला वंदन करताना

आता अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यकलाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मिया ॥

असे म्हटले आहे, देवी शारदे, त्या तुला माझे कोटी कोटी प्रणाम. हे विघ्नहरा, हे जगज्जननी मला स्फूर्ती दे, यश दे.




आगाशेसाहेबांचे विश्वस्त दैवत श्री पांडुरंग



श्री/सौ आगाशेसाहेबांची आराध्य देवता श्री रुक्मिणी




आगाशेसाहेबांच्या मर्मबंधातील ठेव श्री ज्ञानेश्वर माऊली.



ओंकारेश्वर मंदिरातील या विष्णूची पूजा साहेब करत.

# जीवतीच्या हाती

पुणे शहर, माझ्या वडिलांची, आगाशेसाहेबांची कर्मभूमी. एक इतिहासप्रसिद्ध शहर. पुणे शहराच्या आसपास किल्ले सिंहगड, रायगड, राजगड. शिवछत्रपतींच्या पराक्रमाची साक्ष देणारा, डोंगरदऱ्यांचा, सृष्टिसौंदर्यानें नटलेला प्रदेश. 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा' ही उक्ती सार्थ करणारा महाराष्ट्र प्रदेशाचा भाग. या पुण्याजवळच वेल्हे-महालात एक गाव आहे. डोंगराच्या कुशीत वसलेले हे गाव 'मांगले' नावाच्या कुटुंबाला मराठी राजांनी इनाम दिले होते. त्यावरून त्याला 'मांगदरी' असे नाव पडले. डोंगरदऱ्यातले हे गाव तसे शहरापासून अलिप्तच. जेमतेम शंभर घरांची वस्ती असलेल्या गावात वस्ती मराठमोळ्यांचीच. मांगले यांच्या सहवासात तेथे राहावयास आलेले आगाशे कुटुंब हेच काय ते ब्राह्मण सावकार. आगाशे कुटुंब सावकारी करत होते तशी शेतीही करत होते. आगाशे कुटुंबाची सावकारी मात्र अधिक श्रीमंत होण्यासाठी नसून, शिवराय गेल्यानंतर दैन्य व दारिद्र्यात असलेल्या लोकांची गरज भागविण्यासाठी होती. कोणावरही अन्याय किंवा छळ, वसुलीसाठी बळजोरी, हुकूमशाही वगैरे प्रकार नव्हता, असे आज हयात असलेले वृद्ध लोक त्या वेळच्या आख्यायिका सांगतात.

आगाशे कुटुंबाने मांगदरी येथे खूप मोठा चारचौकी वाडा बांधला. श्रीरामाचे अतिशय सुंदर व भव्य मंदिर बांधले. एकेक दगड दोन वाव लांब व रुंद. हा कसा घडविला असेल, कसा रचला

असेल याचे नवल वाटते. वाडा व राममंदिर गावाच्या पश्चिमेला, डोंगराच्या उतारावर. त्यापलीकडे वस्ती नाही. म्हणून आगाशे कुटुंबाची मांगदरी म्हणजे लहानशी गढीच होती. दुर्दैवाने गांधी-वधानंतरच्या जाळपोळीत राममंदिर व घरे आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्यामुळे आज फक्त भग्नावशेष शिल्लक आहेत.

या आगाशे कुटुंबातील मोठ्या घरचे कै. श्री. रंगनाथ आगाशे हे सावकार. त्यांचे एकुलते एक पुत्र म्हणजे कै. श्री. गोविंद रंगनाथ आगाशे. त्यांच्या पत्नी म्हणजे कै. राधाबाई आगाशे. आणि हे माझ्या वडिलांचे जन्मदाते. आमचे ऐश्वर्यसंपन्न, वैभवशाली आजी-आजोबा.

१४ फेब्रुवारी १८८८ साल. फेब्रुवारी महिना म्हणजे थंडीचे दिवस. सारी मांगदरी पहाटेच्या थंडीत, घोंगडीच्या उबेत पहुडली होती. दाही दिशांच्या मुखकमलावर लाली पसरली होती. अशा त्या मंगल प्रभाती आगाशांच्या घरात आनंदीआनंद झाला. राधाबाईंनी (भीमाताईंनी) एका सुपुत्राला, महाराष्ट्रातल्या उद्योगाची ज्योत उजळणाऱ्या नंदादीपाला जन्म दिला. जणू, 'आनंदाचे डोही, आनंदतरंग' अशीच सर्वांची मने होऊन गेली.

'आगाशेसाहेबां'चा जन्म वैभवशाली घरात झाल्यामुळे खूप कोडकौतुक झालेच असणार. नामकरणविधी यथासांग होऊन राधाबाई व गोविंदरावांनी मुलाचे नाव 'चंद्रशेखर' असे ठेवले. त्यांची आई मात्र त्यांना 'राजा' या नावानेच हाक मारीत असे. तिला त्यांच्या उज्ज्वल भवितव्याची चाहूल लागली होती की काय कोण जाणे! कारखाना काढेपर्यंत ते 'राजाभाऊ' या नावानेच ओळखले जात. माझ्या वडिलांचे रूपही साजरे-गोजरे होते. उंचनिंच व व्यायामाने शरीराची जोपासना केल्यामुळे हाडापेराने मजबूत होते. लालसर पण पूर्ण गोरा रंग, भव्य कपाळ, सरळ नाक, डोळे त्या मानाने लहान, पण कोणत्याही गोष्टीचा अचूक वेध घेणारी नजर. कुशाग्र बुद्धिमत्तेची डोळ्यात चमक. शांत व प्रसन्न व्यक्तिमत्त्व.

मांगदरीसारख्या निसर्गरम्य वातावरणात त्यांचे लहानपण गेले. घोड्यावर बसावे, गावात फेरफटका मारावा, ओढ्यावर जावे, पाण्यात पोहावे, शेतावर जावे असा दिनक्रम. त्यांना एक मोठी बहीण व दोन लहान भाऊ. मोठी आऊताई, दुसरे माझे वडील, मग प्रधान व नारायण. ही सर्व भावंडे आईवडिलांच्या मायेच्या सावलीत लहानाची मोठी होत होती. माझे वडील आठ-नऊ वर्षांचे होईपर्यंत दुःखाचा वारा त्यांना माहीत नव्हता. त्यांच्या बालपणी घरात सुखसमृद्धी होती. घरात नोकरचाकर, गोठा गुराढोरांनी भरलेला होता. आई-वडील, आजी-आजोबा, काका-काकू व इतर सर्व नाती एकोपा साधून होती. घरातील तिथी, सणवार, व्रत-वैकल्ये व्यवस्थित पार पडत होती. घरात धार्मिक वातावरण, त्यामुळे मनावर चांगले संस्कार घडत होते. सर्व कसे छान होते. 'रम्य ते बालपण' म्हणतात, तसेच माझ्या वडिलांचे बालपण आनंदात, मजेत जात होते. माझ्या वडिलांचा जन्म तर कवीने वर्णन केल्याप्रमाणे, म्हणजेच असा–

सुनीत सुमंगल होती वसुधा
अमृतात न्हाली
विलसत होती दाही दिशांच्या
मुखकमलावर लाली
आणि अचानक आला उतरुनी
कुणी स्वर्गीचा
जन्मला ज्ञानदीप मांगदरीचा ।

पण.........

पण ! पण नियतीला हे सुख मान्य नव्हते.

माझी आजी तिच्या चिमण्या जीवांना–

पाळण्याची दोरी हालत लांबत ।
संसारी गंमत तान्हीयाची ।।
जीवतीच्या हाती अमृताचे द्रोण ।
शिंपले कोन पाळण्याचे ।।

अशी ओवी म्हणत असताना—

आगाशांचा चंद्रशेखर जणु पुष्कराज ।
सोनं झाकावं पदरानं माझा बाळराज ।।
जिच्या घरी तान्हं तिच्या उरी आनंद ।
पाळण्याचे शेजारी पितादेव उभा गोविंद ।।

अशा बालजीवांच्या आठवणीत रमत असताना देव तिला हसत होते. नियतीने निष्ठुर दावा साधला होता. सुखासमाधानाने नांदणाऱ्या घरावर काळपुरुषाने नांगर फिरविला होता. आगाशांच्या घरावर काळ्याकुट्ट ढगांनी काळोख पसरला होता. कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले. अभूतपूर्व प्रलयंकारी घटना घडल्या. मांगदरीत कॉलऱ्याची साथ आली. त्या काळी आत्ताच्या एवढ्या वैद्यकीय सेवा, औषधे, प्रवासाची साधने नव्हती. पुण्यापासून गाव दूर. आणि त्या भयंकर साथीत माझे आजोबा, आगाशे-साहेबांचे वडील बळी पडले. त्यांच्या तेराव्या दिवशीच रंगनाथ आगाशे (वडिलांचे आजोबा) निवर्तले. या साथीमध्ये आगाशांच्या कुटुंबातील अर्धेअधिक पुरुष बळी पडल्यामुळे हाहाकार उडाला. कोण कोणाला धीर देणार ? कोण कोणाचे सांत्वन करणार ? एका परमेश्वराशिवाय कोणाचा आधार उरला नाही. माझी आजी घरातील सर्वात मोठी व कर्ती गृहिणी. काय तिची अवस्था झाली असेल ? या फाटलेल्या आभाळाला कोण सांधणार ? दुःखाने ओले झालेले डोळे पुसायला पण नशिबाने तिला उसंत ठेवली नव्हती. चालतेबोलते घर पोरके झाले होते. मायेच्या ओलाव्याने उभ्या असलेल्या भिंती मूक रुदन करीत होत्या. पण माझी आजी या संकटाशी मुकाबला करायला सज्ज झाली. आघात आकस्मिक व भयानक. पण धैर्यवान माणसे संकटात धीर सोडत नाहीत. माझी आजी पण धीराची, निश्चयी व करारी. माझ्या आत्याचे लग्न तेव्हा झालेले होते. पण ही तिन्ही मुले लहान होती. हे सर्व काय झाले, कसे झाले हे कदाचित त्यांना कळलेही नसेल. लहान वयात कशाची एवढी जाण असणार ! पण त्या सर्वांना आपल्या

आईबरोबर सर्व कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागणार होते. मने खंबीर करावी लागणार होती. आत्ता मात्र त्यांची मने फुलासारखी कोमल होती, नाजूक होती. त्या बाळजीवांनी, म्हणजेच माझ्या वडिलांनी व दोन्ही काकांनी,

जखम वेदनांची झेलली गोजिऱ्या करांनी ।
पालवीच करपून गेली दु:खवेदनांनी ।।

मुले लहान. घराचा आधार संपला. कर्ता पुरुष गेल्याबरोबर भाऊबंदांनी जमिनी बळकावण्यास सुरुवात केली. त्या वेळच्या दुष्ट रूढीप्रमाणे केशवपन करून सोवळ्या केलेल्या अतिशय दु:खी अशा आजीने एक निर्णय घेतला. मुलांना शिक्षण देऊन आयुष्यात यशस्वी करण्याचा निर्धार तिच्या मनाने घेतला व सर्व मुलांसहित तिने मांगदरी सोडली. ती तिच्या वडिलांकडे – भावाकडे आली. तिचे वडील श्री. बापट हे पुण्यातच स्थायिक होते. माझ्या आजीने त्यांच्या आधाराने पुण्यातच राहावयाचा विचार केला. तिची मोठी मुलगी म्हणजेच माझी आत्या पुण्यालाच होती. कै. श्री. रामचंद्र थत्ते यांच्याशी तिचा विवाह झालेला होता. त्यांचे काष्ठौषधीचे दुकान होते. मिळकत बेताची. त्यामुळे तिच्या मनात असूनही तिला भावांना मदत करता येत नव्हती; किंवा तिच्या आईला ती आधार देऊ शकत नव्हती. माझी आत्या मनाची अतिशय मोठी, चांगल्या स्वभावाची व हौशी होती. अशा एकंदर परिस्थितीत माझ्या वडिलांच्या शिक्षणाची सुरुवात झाली. ते नू. म. वि. मध्ये जात. माझी आजी शिस्तप्रिय व व्यवहारी. त्यामुळे मुलांना कष्ट करून, त्यांच्या मामांवर भार न टाकता, शिक्षण घेण्याची शिकवण दिली. आपल्या मुलांच्या वागण्यावर, अभ्यासावर तिचे बारीक लक्ष असावयाचे. जरा जरी बेशिस्त लक्षात आली तरी ती कडक शिक्षा करीत असे.

माझ्या वडिलांना शालेय शिक्षणासाठी अनेक लहान-मोठ्या नोकऱ्या कराव्या लागल्या. माझे वडील व काका दोघेही बरोबरच शिकत होते. पुण्याला ओंकारेश्वर मंदिर पेशवेकालापासून प्रसिद्ध

आहे. त्याच्या सभोवतालच्या आवारातच एक विष्णुमंदिर आहे. ते एका बाईच्या मालकीचे होते. त्या एकटयाच होत्या. तर त्या विष्णूची पूजा करावयाचे काम माझ्या वडिलांनी पत्करले. त्याबद्दल त्यांना दोन रुपये मिळत असत. त्यामुळे त्यांना शाळेची फी देता येत असे. पुढे काही दिवसांनी त्या बाईनी माझ्या वडिलांचा सरळपणा, नियमितपणा, पूजेतील व्यवस्थितपणा, इमानदारी व आदरयुक्त वागणूक व हुशारी पाहून ते विष्णुमंदिर माझ्या वडिलांना मालकीहक्काने देऊन टाकले. आजही ते मंदिर आगाशे कुटुंबियांच्या मालकीचे असून आमच्या वडिलांच्या पुण्याईने आमच्यावर विष्णुकृपा आहे.

नंतर काही दिवस पोस्टात शिक्के मारावयाचे काम केल्याची आठवण आमचे वडील सांगत असत. छोटया-मोठया नोकऱ्या व शिक्षण असे एकाच वेळी चालू होते. त्याच वेळी, म्हणजे शिक्षण चालू असताना माझे 'प्रधान' नावाचे काका आजारी पडले. गरीब परिस्थितीमुळे त्यांच्यावर उपचार करता आले नाहीत व ते त्या आजारातच मृत्यू पावले. गरिबीमुळे काकांवर उपचार करणे शक्य झाले नाही याची खंत माझ्या वडिलांना जन्मभर होती. तसे ते बोलून दाखवत असत. भावाच्या मृत्यूचा त्यांच्या लहानपणी बसलेला हा दुसरा धक्का.

संकटांची मालिका त्यांचा पिच्छा सोडत नव्हती. पण आजी, वडील व काका धीराने त्याला तोंड देत होते. आपदांचा किंवा संकटांचा बाऊ करून ती नाहीशी होत नाहीत, तर ती भोगूनच संपवावी लागतात हे अध्यात्म त्यांनी जाणले होते. निराशा बाळगून जगणे म्हणजे जगणे नाही, तर पुरुषार्थाची प्रेरणा घेऊन जगण्याच्या जिद्दीने जगणे म्हणजे खरे जीवन. सर्व वेळी समविचार व समबुद्धी त्यांनी ठेवली होती. जाण ठेवली होती.

आता शालेय जीवनाचे त्यांचे महत्त्वाचे म्हणजे मॅट्रिकचे वर्ष चालू होते. त्यांचा गणित हा विषय फारच चांगला होता. अभ्यास तर झटून चालू होता. फॉर्म-फी भरावयाची होती. फी

भरावयाची तारीख जवळ आली, पण फी भरावयास पैसे नाहीत. मामा वगैरे होते. पण त्यांच्यावर भार टाकावयाचा नाही असा आजीचा निश्चय. आता काय करावयाचे असा विचार पडला असतानाच माझी आत्या या अडचणीच्या वेळी उपयोगी पडली. माझी आत्या परिस्थितीने गरीब. डोक्यातले सोन्याचे फूल हा एकच दागिना तिच्या जवळ होता. तेव्हा बँकाही नव्हत्या. तिने दागिना सावकाराकडे गहाण टाकून पैसे आणले व भावाची फॉर्म-फी भरली. एखाद्या श्रीमंत बहिणीने भावाला मदत करणे वेगळे, पण माझ्या आत्याने तिच्या गरीब परिस्थितीत मदत करणे याला आगळे महत्त्व होते. हा बहिणीच्या बंधुप्रेमाचा एक आदर्श नमुना आहे. आमच्या घरातल्या संस्कारांचे एक उत्तम उदाहरण आहे. मनाने मोठी असणारी माणसे आपल्यावर दुसऱ्याने केलेल्या उपकाराची जाणीव कधीही विसरत नाहीत. माझ्या वडिलांनी अशी जाणीव सतत ठेवली होती.

माझ्या वहिणीने जर फॉर्म-फीचे पैसे दिले नसते तर मी मॅट्रिकही झालो नसतो. मग पुढचे उच्च शिक्षण तरी कुठले आणि उद्योगपती तरी कुठले? ह्या जाणिवेतूनच आगाशेसाहेबांनी — माझ्या वडिलांनी हिमालयाच्या सावलीचा आधार तिच्या आयुष्य-भर तिला दिला. तिच्या मुलांना लहानांचे मोठे केले, माया-ममता दिली. आमच्या वडिलांसारखा मनाचा मोठेपणा क्वचितच बघावयास मिळतो. पैशाने खूप माणसे मोठी असतात, परंतु आमच्या वडिलांसारखे, गंगौघाप्रमाणे स्वच्छ व निर्मळ मन आणि धवल हिमगिरीसारखी उत्तुंग अशी मनाची उंची ही अपवादात्मकच म्हणावी लागेल.

१९०५ साली आगाशेसाहेब मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. परीक्षा पास झाल्यावर नूतन मराठी विद्यालयात गणिताचे शिक्षक म्हणून नोकरी धरली व पुढील शिक्षणासाठी फर्गसन कॉलेजमध्ये नाव दाखल केले. स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावरोबर आजी व काकांसह त्यांनी मामांचे घर सोडून स्वतंत्र बिऱ्हाड केले.

घराची जबाबदारी उचलली. ते ओंकारेश्वर मंदिरासमोर चित्राव यांच्या वाड्यात (२६७, शनिवार पेठ) राहू लागले. पानशेतचा पूर येईपर्यंत आमच्या कुटुंबाचे वास्तव्य तेथेच होते. जिद्दी व महत्त्वाकांक्षी माणूस नेहमी प्रगतिपथाकडे धाव घेत असतो. तो कधी मागे वळून पाहत नाही, त्याप्रमाणे माझे वडील कटू अशा भूतकाळाकडे न बघता ते उज्ज्वल भविष्यकाळाचा वेध घेत होते. दोघे बंधू म्हणजे राम-लक्ष्मणाची जोडीच. शिक्षण चालू व पैसे कमी, म्हणून दोघांनी असे ठरविले की, एक वर्ष एकाने नोकरी करावयाची व दुसऱ्याने शिकावयाचे. दोघांना एकमेकाबद्दल अत्यंत आपुलकी व जिव्हाळा असल्यामुळे याबाबतीत मतभेदाचा प्रश्नच आला नाही. दोघेही एकमेकासाठी आटापिटा करीत होते व शिक्षण घेत होते. अथक प्रयत्नांमुळे १९१४ साली माझे वडील बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. माझे काका मध्येच आजारी पडले, त्यामुळे ते पदवी घेऊ शकले नाहीत. ते विज्ञानशाखेत शिकत होते.

आता त्यांच्या आयुष्याला जरा स्थिरता येऊ लागली होती. काका व वडील दोघेही नोकरी करीत होते. वडील नूतन मराठी शाळेत शिक्षक होते व नारायणकाका मिलिटरी अकौंट्समध्ये नोकरी करीत होते. आता आजीच्या आयुष्यात पण स्थैर्य आले होते. तेव्हा साहजिकच माझ्या वडिलांच्या लग्नाचा प्रस्ताव आल्यास नवल ते काय?

१९१४ साली माझ्या वडिलांचा विवाह झाला. माझी आई धारवाड येथील श्री. नारायणराव गोखले सराफ यांची सर्वात मोठी मुलगी. माझ्या आईचे मामा म्हणजे त्या वेळचे प्रसिद्ध डॉक्टर व्ही. डी. फाटक, म्हणजेच त्यानंतरच्या काळात प्रसिद्ध असलेले डॉ. वाय. व्ही. फाटक यांचे वडील. माझी आई लहान असताना पुण्यात मामांकडे आजोळी होती. सराफ गोखले व डॉ. फाटक ही मंडळी श्रीमंत. माझे वडील गरीब. परंतु डॉ. फाटकांनी माझ्या वडिलांची चांगला जावई म्हणून भाचीसाठी निवड केली. त्यांचे बी. ए. पर्यंतचे शिक्षण, सुस्वभाव व मुख्य

म्हणजे हा मुलगा कर्तबगार निघेल याची त्यांनी परीक्षा केली व गोखले सराफांची द्वारका आगाशांच्या घरात सौ. इंदिरा म्हणून प्रवेश करती झाली. माझी आई वडिलांच्या मानाने थोडी कमी उंच, धारदार नाक असलेली. वडील पूर्ण गोरे, त्यामानाने आई सावळी; मनाने अतिशय चांगली, कोणत्याही कामाची तयारी, अतिशय कष्टाळू, प्रेमळ, कुटुंब जोडणारी, मुलांवर सुसंस्कार घडविणारी, सहनशील होती. माझ्या वडिलांचे व्यक्तिमत्त्व हिऱ्यासारखे चमकदार, तर माझी आई म्हणजे त्या हिऱ्याला असणारे बावनकशी सोन्याचे कोंदण. आणि नाहीतरी कोंदणामुळेच हिऱ्याच्या पैलूंची शोभा वाढते ना? ती आजच्या आधुनिक स्त्रीसारखी पदवी घेतलेली विदुषी नसली तरी लेखन, वाचन, कलाकौशल्य या सर्व गोष्टींत, सर्व कलांमध्ये तिला रस होता. घराची सर्व जबाबदारी आजीच्या बरोबरीने तिने उचलली होती. म्हणूनच आमचे वडील एवढ्या निर्धास्तपणे साखरकारखान्याचे स्वप्न पुरे करू शकले. कारण आयुष्यात एकमेकाला जोडीदार जर सुयोग्य व चांगला मिळाला तरच आयुष्य यशस्वी होऊ शकते. माझ्या वडिलांना माझ्या आईची अशीच उत्तम जोड मिळाली. तिच्या गृहप्रवेशानंतर सरस्वती व लक्ष्मी या दोघीही एकत्र आल्या. भरभराट झाली. माझ्या वडिलांचे जीवन जास्त समृद्ध झाले. त्यांच्या जीवनात माझी आई म्हणजे–

पुण्यप्रदा ही तुझीच कांता ।
स्वर्गाची देईल तुझिया हाता ।।
कामधेनु ही जाण तत्त्वता ।
आली तुझीया संगती ।।

# मन शुध्द तुझं

आयुष्यात स्थिरता आली तरी आगाशेसाहेबांचे महत्त्वाकांक्षी मन त्यांना गप्प बसू देत नव्हते. त्यांची शिक्षणाची ओढ कायम होती. कुशाग्र बुद्धिमत्तेची जोड व धाडस यामुळे त्यांच्या यशाची घोडदौड आता सुरू झाली होती. त्यांनी पुण्यातील नोकरी सोडली व ते नोकरीसाठीच कराचीला गेले. तेव्हा अखंड हिंदुस्थान असल्यामुळे बरेच लोक नोकरीच्या निमित्ताने कराची, कलकत्ता येथे जात असत. माझे वडील नोकरीनिमित्त कराचीस गेले, परंतु फार दिवस तेथे राहिले नाहीत. तेथील नोकरी सोडून ते मुंबईला आले व कॉन्व्हेंटमध्ये शिक्षकाची नोकरी धरली. १९१७ ते १९२६ पर्यंत त्यांनी तेथे नोकरी केली. तेथे नोकरी करीत असतानाच त्यांनी कायद्याचा अभ्यास केला व वकिलीची एल्एल्. बी. ही परीक्षा ते उत्तीर्ण झाले. १९१९ मध्ये गव्हर्नमेंट लॉ क्लास, मुंबई येथे ही परीक्षा दिली. हे सर्व करीत असतानाच ज्योतिष, तत्त्वज्ञान, धार्मिक ग्रंथ, चरित्रे अशा अनेक विषयांवरील पुस्तकांचे वाचन व अभ्यास ते करीत असत. प्रत्येक गोष्टीचा सखोल अभ्यास करण्याचा त्यांचा परिपाठच होता.

ध्येयाने प्रेरित झालेली माणसे वेगळीच असतात. त्यांचे वागणे, बोलणे, चिंतन, मनन हे इतरांना अनाकलनीय असते. काही माणसे पहाटे उठणारी असतात. इतर सामान्य माणसे गुलाबी झोपेत असतात तेव्हा ध्येयवादी माणसांना जाग आलेली असते. ती जाग असते मनाची. ती जाग असते बुद्धीची. मग त्यांचे चिंतन सुरू होते.

कुणी स्वत:बद्दलचे चिंतन करतो, तर एखादा सामान्य जीवनाच्या भवितव्याचे चिंतन करतो आणि आपण काहीतरी केले पाहिजे या निर्णयाला येतो. आपल्याला काहीतरी केले पाहिजे, समाजाची उन्नती झाली पाहिजे, अशाच विचारात माझे वडील नेहमी गुरफटलेले असत.

आमच्या घरात नेपोलियन बोनापार्टची एक मोठी तसबीर माझ्या वडिलांनी लावली होती. का ? तर या माणसाने जग जिंकायचा निर्धार केला होता. पराक्रमी, महत्त्वाकांक्षी व हुशार नेता, झुंजार नेता आणि आभाळाएवढी मोठी झेप घेणारा कुशल सेनानी होता म्हणून, त्याच्या पराक्रमाचा व आकांक्षेचा आदर्श त्यांनी डोळ्यापुढे ठेवला होता. ध्येयवादी माणसाला 'आकांक्षा-पुढती दिसे गगन ठेंगणे' या काव्यपंक्तीप्रमाणेच नेहमी वाटते. माझ्या वडिलांची झेप अशीच होती. एल्‌एल्. बी. झाल्यानंतर त्यांनी वकिलीची सनद घेतली व वकिलीच्या धंद्याला सुरुवात केली.

आगाशेसाहेब या काळामध्ये पुणे व भोर संस्थान येथे वकिली करत असत. त्यांची वकिली आता चांगली चालू लागली होती. वकिली करत असताना त्यांच्या बुद्धिमत्तेची, तल्लख बुद्धिमत्तेची प्रचिती वारंवार येत असे. कोर्टात जाण्यापूर्वी प्रत्येक कागद संपूर्ण वाचून, अभ्यास करूनच ते कोर्टात जात असत. एखादे वेळी पक्षकार, फिर्यादी एखादी गोष्ट विसरत असे, पण माझ्या वडिलांच्या स्मरणातून लहानशी गोष्ट किंवा शब्दसुद्धा जात नसे. कोणत्याही गोष्टीचा सखोल व परिपूर्ण अभ्यास करणे हा माझ्या वडिलांचा स्थायीभाव होता. वकिलीचा व्यवसाय उत्तम चालत होताच व भोर संस्थानात सरकारदरबारी त्यांना खूप मान होता. कायदे-मंडळात निवडून आलेले सभासद म्हणून त्यांना मान्यता मिळाली होती. भोरच्या राजेसाहेबांच्या समोर प्रजेची वकिली भक्कमपणे करणारा प्रतिनिधी म्हणून मुद्दाम निवडून आणले होते. ते भोर संस्थानच्या विधिमंडळाचे उपाध्यक्ष होते. तेथेसुद्धा त्यांची नेमस्त व विवेकी वागणूक सर्वांच्या मनात आदराचे स्थान मिळवून गेली.

भोरच्या राजकारणात लोकांचा असा 'प्रजासभा' नावाचा देशमुख पक्ष होता. त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना चळवळीत संयमाचे भान राहिले नाही,- दंगे झाले. तेव्हा लोकांची वागणूक अयोग्य असल्यामुळे लोकप्रतिनिधी असूनसुद्धा लोकांच्या हिंसाचारी वागणुकीचा माझ्या वडिलांनी निषेध केला होता. हा त्यांच्या स्वभावाचा एक विशेष. कै. तात्यासाहेब केळकरांनी देखील केसरीमधून जाहीर निषेध केला. या गुंडगिरीचा बंदोबस्त राजेसाहेबांनी स्वबळावर करावा याला मान्यता दिली. शांततेच्या मार्गाने सत्तापरिवर्तन घडवून आणण्यासाठी 'लोकपक्ष' नावाचा पक्ष स्थापन केला आणि संस्थानी प्रजेला मार्गदर्शन केले. १९२० ते १९३० पर्यंत माझ्या वडिलांचा सर्व तऱ्हेच्या म्हणजे सामाजिक, औद्योगिक, धार्मिक वगैरे गोष्टींचा अभ्यासकालच होता. वकिली करत असताना, त्या व्यवसायात करावे लागणारे खऱ्याचे खोटे, खोट्याचे खरे अशा कोलांटयांचे त्यांना वावडे होते. अतिशय सरळ वृत्तीचे असल्यामुळे वकिलीतल्या अनेक गोष्टी आगाशांना – माझ्या वडिलांना – खटकत असत. 'ही माणसे भांडतातच का ?' असे ते म्हणत. सरळ मनाच्या माझ्या वडिलांना वकिली मानवेनाशी झाली. वकिलीपेशा सोडून देण्याचे चक्र सुरू झाले. त्याच वेळी आपल्या महाराष्ट्रात स्वातंत्र्यसंग्रामाच्या तीव्र लढ्याला सुरुवात झाली होती. लोकमान्य टिळक, नामदार गोखले, वीर सावरकर, सेनापती बापट अशी अनेक मान्यवर पुढारी मंडळी राष्ट्रप्रेमाने प्रेरित होऊन जनजागृती करीत होती. वीर सावरकर, सेनापती बापटांसारखी मंडळी 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले' या मतप्रणालीची. लोकमान्य म्हणत, 'स्वराज्याची तहान सुराज्याने भागणार नाही,' तर नामदार गोखले सनदशीर मार्गाने सुराज्याची मागणी करीत. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधींनी तो वारसा घेतला.

त्या वेळी लोकमान्य टिळक आपल्या भाषणात आपल्या देशाला उद्योगाशिवाय तरणोपाय नाही हे आवर्जून सांगत. नामदार गोखले भाषणात सांगत, अन्न-वस्त्र, धुणे, सफाई, दिवाबत्ती या रोजच्या

जीवनोपयोगी वस्तूंचा व्यापारसुद्धा आपण परकीयांच्या मदतीने करतो. आपल्या राजकीय वर्चस्वाबरोबर आपण उद्योगधंदे व कलाकौशल्य ह्याही गोष्टी गमावल्या आहेत.

माझ्या वडिलांचा – आगाशेसाहेबांचा – तरुणपणाचा काळ असा प्रेरणादायक होता. स्वदेशीच्या व्रताचा अंगीकार करण्याबद्दलचा ध्यास घेतला जात होता. तरुणांनी उद्योगधंद्यात शिरावे, यशस्वी व्हावे व समाजोन्नती करावी. महाराष्ट्र उद्योगात मागे आहे, उद्योगाच्या प्रगतीशिवाय महाराष्ट्राची प्रगती अशक्य आहे. तेव्हा " तरुणांनो, कष्ट करा, उद्यमशील व्हा, महाराष्ट्रोद्धार करा. देश, प्रदेश संपन्न करा " असे लोकमान्य टिळक भाषणात सतत सांगत असत. त्यांच्या भाषणांचा, केसरीतील लेखांचा आगाशेसाहेबांच्या मनावर अतिशय प्रभाव पडला. लोकमान्य टिळकांचे विचार हे माझ्या वडिलांना उत्तम शक्तिवर्धक ठरले. अशा स्वातंत्र्यलढ्याच्या संधिकालात माझ्या वडिलांचे मन सदैव अस्वस्थ असले तर नवल नाही. देवाने त्यांना अत्यंत तल्लख बुद्धी व तीव्र स्मरणशक्ती दिली होती. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचे आकलन त्यांना चटकन होत असे. लोकमान्यांचे विचार ऐकून, त्यांच्या विचारांमुळे, माझ्या वडिलांच्या मनाची प्रगल्भता वाढली. आपल्या महाराष्ट्राच्या उन्नतीसाठी आपण उद्योगात शिरलेच पाहिजे ही खूणगाठ मनात बांधली व त्या दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केली. सर्व पुढारी माणसांबद्दल त्यांना आदर होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मत-प्रणालीशी त्यांचे विचार जुळत असत. परंतु सक्रिय राजकारणा-पासून मात्र ते दूर होते. माझे काका गांधीवादी असून ते प्रत्यक्ष स्वातंत्र्यलढ्यात उतरले होते. त्यांनी कारावासही भोगला होता. त्यांनी ब्रह्मचर्याची शपथ घेतली होती. ते अखेरपर्यंत ब्रह्मचारीच राहिले. दोघेही भाऊ स्वदेशप्रेमी खरे. माझ्या वडिलांनी साखर-कारखाना काढून उद्योगातून महाराष्ट्राची प्रगती साधली व काकांनी पण प्रत्यक्ष राजकारण सोडून माझ्या वडिलांना त्यांच्या उद्योगात सर्वतोपरी साहाय्य केले. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो ही जाणीव सतत होती. सामाजिक बांधिलकीची जाणीव

म्हणजे त्यांना स्वानुभवच होता. या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणजे त्यांच्या हातून स्थापन झालेली 'बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट' व यशस्वीपणे बाहेर पडलेली शुभ्र दाणेदार साखर. त्यांच्या धडपड्या, कर्तृत्ववान व संवेदनाक्षम मनाला कोणीतरी साद घालीत होते. कुठूनतरी प्रेरणाशक्ती रणशिंग फुंकून निनादत होती—

मन शुद्ध तुझं गोष्ट हाये पृथवीमोलाची ।
तू चाल पुढं तुला रे गड्या भीती कुणाची
पर्वा बी कुणाची ।।

१९३२ ते १९३४ पर्यंतचा हा कालखंड वैचारिकदृष्ट्या, औद्योगिकदृष्ट्या व त्यांच्या जीवनाच्या दृष्टीने क्रांती करणारा, जीवनाचा सांधा बदलणारा ठरला. वकिलीत स्थैर्य आले होते. कायद्याचे ज्ञान झाल्यामुळे त्यांच्या भाऊबंदांकडून स्वतःच्या जमिनीचा ताबा त्यांनी मिळविला होता. वयाची चाळिशी आली होती. सामान्यतः कोणताही माणूस आपली सांसारिक परिस्थिती चांगली राखून या वयानंतर शांतपणे आयुष्य घालविण्याचा विचार करतो. पण माझे वडील सामान्यांतले नव्हतेच.

त्यांची प्रज्ञा व प्रतिभा जगावेगळी होती आणि म्हणूनच ते साखरकारखाना काढण्याचा विचार नक्की करू शकले. थोडे दिवस काकांच्या मदतीने त्यांनी वकिलीचे ऑफिस चालू ठेवले. वैद्य कै. श्री. गणेशशास्त्री जोशी यांच्या वाड्यात त्यांचे ऑफिस होते. काका पक्षकारांना जबानी देण्यासाठी तयारी करून घेत आणि माझे वडील आयत्या वेळी कोर्टात जाऊन केस चालवीत असत. हे ऐकताना नवल वाटते, परंतु दोघांच्याही बुद्धीचे तेज आणि धार सारखीच असल्यामुळे ही गोष्ट शक्य झाली. कारखान्याच्या एकंदर कामकाजाची जुळणी करेपर्यंत अशा तऱ्हेने त्यांनी वकिलीचा व्यवसाय चालू ठेवला होता.

माझे वडील भोर संस्थानात वकील व जन्मगाव मांगदरी; त्यामुळे याच भागात कारखाना काढावा म्हणजे या प्रदेशाची प्रगती होईल. आपल्याच लोकांना रोजगार मिळेल ही दूरदृष्टी. देशाचे

स्वातंत्र्य हे आर्थिक विकासाशिवाय पूर्ण होणार नाही व शेतकरी-जीवनात आर्थिक परिवर्तन होण्याकरिता केवळ उसाच्या नगदी पिकाचे उत्पादन करून भागणार नाही, तर त्याची साखर करून बाजारात आणली पाहिजे हा विचार त्यांच्या मनात ठाण मांडून बसला. कर्मधर्मसंयोगाने एका ज्योतिषाने याच सुमारास 'पांढरा रंग हा तुमच्या जीवनाला वळण देणारा रंग आहे' असे भविष्य त्यांच्यापाशी वर्तविले. पांढऱ्या रंगाची साखर व साखरकारखाना हाच विचार त्यांच्या मनात दृढ झाला. साखरकारखाना काढण्याचा त्यांच्या मनाचा निर्धार झाला. वकिलीच्या कामाकरिता ते भोरला जात, तेव्हा कै. श्री. अण्णासाहेब काळे या स्नेह्यांच्या घरी उतरत असत. भोरच्या जुन्या आमराई भागातील गर्द हिरव्यागार छायेच्या साक्षीने माझे वडील अण्णासाहेब काळे यांच्याशी या विषयावर चर्चा करीत. राजकारण, धर्मकारण या विषयांवरही त्यांच्या गप्पा होत; या गप्पांचा शेवट होई तो गरीब शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन कसे होईल या मुद्यावर. ती संधी लगेचच आली. दि. २७–१०–१९२८ रोजी भोरजवळचा भाटघरचा बंधारा पूर्ण झाला. जगातील सर्वांत लांब व शेतीला पाणी देणारा हा बंधारा आहे असा अभिप्राय तत्कालीन गव्हर्नर लेस्ली विल्सन यांनी दिला. भाटघर धरण पूर्ण झाल्यावर त्यातल्या पाण्याचा वापर करण्यासाठी दोन दोन हजार एकरांचे ब्लॉक्स पाडण्यात आले व ते सरकारने विकायला काढले. आगाशे-साहेबांच्या मनात साखरकारखाना भोर संस्थानातच शिरवळ या गावी काढायचा होता. सरकार त्या वेळी अडीचशे टन ( २५० टन ) ऊस गाळणारी साखर मशिनरी आणावयास परवानगी देणार होते. शिरवळजवळ भोरच्या राजेसाहेबांची आणि इतरांची मिळून दोन हजार एकर, उसाला उपयुक्त अशी जमीन उपलब्ध होती. परंतु भोरच्या अधिपतींना ती कल्पना पसंत पडली नाही, किंवा संस्थानने नेमलेल्या लोकनियुक्त प्रतिनिधींना आवडली नाही म्हणून म्हणा, आगाशेसाहेबांच्या मनात असणारा साखरकारखाना भोर संस्थानात निघू शकला नाही. 'प्रथम

ग्रासे मक्षिकापात:' म्हणतात तसेच झाले. परंतु आगाशेसाहेबांनी आपले स्वप्न साकार करण्याचा चंगच बांधला. भोरच्या स्नेह्याच्या घरी सारखी चर्चा, आकडेमोड, विचार सुरू होते; व एके दिवशी ठरले की 'बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट' या नावाने साखर-कारखाना काढायचा. आणि एकवीस सप्टेंबर १९३४ रोजी याच नावानें कंपनी रजिस्टर झाली. 'बृहन्महाराष्ट्र' हे नाव देण्यामागे त्यांचा विचार व्यापक होता. दिल्लीपासून मद्रासपर्यंत जेवढे मराठी बांधव आहेत त्या सर्वांचा हा कारखाना आहे, तुम्हा सर्वांसाठी हा साखरकारखाना मी काढीत आहे, हीच भावना होती व ती त्यांनी सत्यस्वरूपात आणली. अगदी नावापासून असा विशाल व व्यापक दृष्टिकोन ठेवूनच त्यांनी हा कारखाना यशस्वी केला. 'बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट' ही कंपनी स्थापन झाली. तिला कागदावर अस्तित्व आले. पण पुढील काम सोपे नव्हते.

या अवघड कार्याकरिता त्यांच्या मनाची तयारी होती. समाज-कल्याणासाठी कुणाला तरी मातीत पाय रोवून उभे राहावे लागते; कुणाची तरी प्रज्ञा, कुणाचे तरी व्यक्तित्व फुलविण्यासाठी आपण अंधारात वाट चालून दुसऱ्याला प्रकाश द्यावा लागतो, देश कीर्तिवंत व्हावा, यशवंत व्हावा म्हणून ध्यास घ्यावा लागतो, प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते ह्याची त्यांना जाण होती. ह्या गोष्टी सुसंस्कारित मनच करू शकते. समाजकल्याणाकरिता समर्पणाची तयारी लागते. ह्या सर्व गोष्टी माझ्या वडिलांजवळ होत्या.


लग्नाचे ठरले की घरच्या कर्त्या माणसाला पळभर वेळ मिळत नाही. हळकुंडापासून बनारसी शालूपर्यंत सर्व गोष्टी नजरेसमोर खेळू लागतात. त्यातल्या त्यात या सर्व गोष्टींना मुबलक पैसा जवळ असेल तेथे प्रश्न येत नाही. पण जेथे पैशाची वानवा तेथे प्रश्नांचा वणवा पेटलेला असतो. आणि आगाशेसाहेबांजवळ नेमकी पैशाचीच वानवा. कंपनीचे सारे भांडवल म्हणजे दुर्दम्य महत्त्वाकांक्षा, प्रचंड आत्मविश्वास आणि त्यासाठी लागणारी बुद्धिमत्ता व अपार कष्ट घेण्याची तयारी एवढेच. या साऱ्याचे रूपांतर एखाद्या कारखान्यात




वै. चंद्रशेखर गोविंद आगाशे



श्री चंद्रशेखर गोविंद आगाशे / सौ. इंदिराबाई चंद्रशेखर आगाशे



साहेबांच्या मातोश्री कै. श्रीमती राधाबाई आगाशे



साहेबांचा आधार धाकटे बंधू कै. नारायणकाका



जगदिश चंद्रशेखर ऊर्फ पंडितराव आगाशे
एक अकाली लोपलेले उमदे व्यक्तिमत्व

होणे ही गोष्ट फार अवघड व दुरापास्त होती. काही मंडळींच्या मते तर ती अशक्यकोटीतील गोष्ट होती. पण आगाशेसाहेब स्थिरबुद्धीचे होते. आपल्या ज्या श्रद्धा आहेत किंवा जीवन जगण्याची जी तत्त्वे आहेत त्यांवर त्यांची अढळ निष्ठा होती. ध्येयनिष्ठा असली की मनाची जडणघडण आपोआप तयार होते. गुणावगुणांची पारख करता येते. त्यांची ध्येयावरची निष्ठा बाह्यपरिस्थितीवर अवलंबून नव्हती, तर त्यांच्या अंतःप्रेरणेवर अवलंबून होती. म्हणून त्यांचे मनोधैर्यही अफाट होते.

सर्व कामे एकदम हातात घ्यावयाची होती. त्यांनी आपल्याजवळ असलेल्या थोड्याशा पुंजीवर सुरुवात केली. पण कारखान्याचा व्यापच मोठा. काही लाखांची भाषा सुरू झाली. कारखान्याकरिता जागा, यंत्रसामग्री, सेवकवर्ग, लोकांना विश्वास देईल असे संचालक-मंडळ, अशा अनेक कामांना सुरुवात झाली. माझ्या वडिलांची कल्पना अशी की, भाटघर धरणातले पाणी मिळणार, जन्मभूमी भोर संस्थानच्या हद्दीत दोन हजार एकरांचा ब्लॉक सहज मिळणार, साखरकारखाना ही भविष्यात भोर संस्थानला सोन्याची खाण ठरणार, भोरचे राजेसाहेब भाग घेतील, दारिद्र्याने गांजलेल्या शेतकऱ्यांचा सहभाग मिळेल आणि आपला हा कारखाना, इतर अनेक उद्योगांचा जनक बनेल. पण भोरच्या राजेसाहेबांच्या नकाराने हे स्वप्न धूसर झाले. राजेसाहेबांना आणि इतर कोत्या बुद्धीच्या लोकांना आगाशेसाहेबांची झेप समजलीच नाही. पण ते अजिबात निराश झाले नाहीत. त्यांच्या संकल्पावर त्यांची दृढ श्रद्धा होती. आमच्या घरी दारातून आत शिरल्याबरोबर समोरच एक पाटी वडिलांनी लावलेली होती– 'सत्य संकल्पाचा दाता भगवान.'

सत्य संकल्पाला परमेश्वराचे अधिष्ठान, साहाय्य असतेच. त्यांची ध्येयावरची, संकल्पावरची निष्ठा अतिशय जबरदस्त होती. ज्ञानेश्वरीतील आध्यात्मिक विचारांची बैठक, त्यांच्या आईचे आशीर्वाद व पंढरीच्या पांडुरंगावरील अढळ श्रद्धा या त्रयीच्या साहाय्याने त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा चालू ठेवली. प्राप्त

परिस्थितीचा आनंदाने स्वीकार म्हणजेच अध्यात्म हे त्यांनी जाणले होते. पांडुरंगाच्या भक्तीने त्यांचे मनोधैर्य वाढले होते. त्यांची पांडुरंगावरची भक्ती ही डोळस होती. तो पांडुरंग त्यांना 'चिन्मय' असे. पांडुरंगाच्या दर्शनाने त्यांचे मन शांत होत असे, अनेक प्रश्न सुटत असत व ते पुढील कामाची प्रेरणा घेत असत. पुण्यामध्ये कंपनीच्या कामांना सुरुवात झाली होती, पण कारखान्याच्या जागेसाठी आगाशेसाहेबांना पुण्यापासून एकशेदहा मैल दूर पंढरपूर भागात 'बोरगाव' या माळरानावर यावे लागले. पण त्याला इलाजच नव्हता. त्यांना नीरा धरणाच्या उजव्या पाटावर एकवीस क्रमांकाच्या फाट्यावर ब्लॉक मंजूर झाला. दारिद्र्यात खितपत पडलेल्या लोकांचा उद्धार होणार होता. पिण्याचे पाणी नसलेल्या भागात नवजीवन प्राप्त होणार होते. एकापरीने आगाशेसाहेबांना हे वरदानच मिळाले होते. पण त्यासाठी केवढे अग्निदिव्य करायचे होते ते त्यांनाच ठाऊक ! म्हणून त्यांनी त्या वेळी परमेश्वराला आळविले असेल,

"सत्यं शिवं सुंदरा  
प्रगतीचे पंख दे विश्वंभरा  
यशोधन दे आम्हांस  
एक छंद एक ध्यास  
नाव ने पैलतीरी दयासागरा  
कीर्तीचा कळस जाओ उंच अंबरा ।। "

# की घेतले व्रत न अम्ही अंधतेने

आगाशेसाहेबांच्या मनात घोळणाऱ्या साखरकारखान्याला अधिक चालना देणारी संजीवनी म्हणजे १९३२ मध्ये भारत सरकारने देशी साखरकारखान्यांना संरक्षण देण्याचा केलेला कायदा. १९३२ च्या कायद्याने भारतात येणाऱ्या परदेशी साखरेवर संरक्षक जकात बसविण्यात आली. एवढेच नव्हे तर या कायद्याने असे अधिकार गव्हर्नर जनरलला दिले की, वेळोवेळी पाहणी करून परदेशातून येणाऱ्या साखरेमुळे देशी साखरउद्योग धोक्यात येतो आहे असे दिसले तर ही जकात वाढविण्यास हरकत नाही. या कायद्याने या संरक्षणाचा भारतीय साखरकारखानदारीला खूप फायदा झाला. या संरक्षण कायद्याने आगाशेसाहेब भलतेच प्रभावित झाले. मनातील स्वदेशी कारखानदारीची ऊर्मी त्यांना स्वस्थ बसू देईना. वास्तविक पाहता माझे वडील पेशाने वकील. त्यांना साखरउद्योगातील काहीही माहिती नव्हती व कळतही नव्हते. शेतकरीजीवनाचा अनुभवही नव्हता. पण एखादी गोष्ट करायची ठरविल्यानंतर त्याचा पिच्छाच पुरवावयाचा हा स्वभाव. त्यांनी शेतीविषयक पुस्तके, यंत्रसामग्रीची माहिती देणारे वाङ्मय, इंजिनिअरिंगमधील पुस्तके आणून वाचून सखोल अभ्यास केला. चिकित्सक बुद्धी व अभ्यासू नजर याद्वारे त्यांनी साखरेचा उद्योग महाराष्ट्रात जरी नुकताच सुरू झाला असला तरी त्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे, हे ओळखले होते.

साखरउद्योगाने आज महाराष्ट्राच्या ग्रामीण जगातील अनेकांना सम्राटपदाला पोहोचविले. आगाशेसाहेबांना हे सम्राटपद

कधी मिळालेही नाही व त्यांची तशी अपेक्षाही नव्हती. उलट, मध्यमवर्गीय माणसांसाठी व माणसांकरवी हा उद्योग उभा करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. धनिकांनी अधिक धनासाठी काढलेल्या एखाद्या कारखान्यापेक्षा आपला कारखाना निराळा पाहिजे अशी त्यांची इच्छा होती, तसे त्यांचे प्रयत्न होते.

आगाशेसाहेबांना समाजकार्याची आवड. मराठी समाज व महाराष्ट्राचा त्यांना खूप अभिमान. त्यांचे म्हणणे असे की, सामान्य माणसाच्या मदतीने, मध्यमवर्गीयांच्या सहकार्याने आपण हा धंदा सुरू करावा. त्याची आखणी दूरदृष्टीची व कायम-स्वरूपाची असावी. कारखान्याचे मुख्य पीक ऊस. ते आपल्या येथील शेतकऱ्यांच्या अंगवळणी पडलेले नाही, तेव्हा ऊस-शेती व त्या उसाची साखर करणारी यंत्रसामग्री असे या कारखान्याचे जोडरूप असावे. कारखान्यासाठी जी जागा मंजूर झाली होती तो भाग अत्यंत ओसाड व दुष्काळी. जमिनीचे मालक ५०–६० एकरांपेक्षाही जास्त जमीन असलेले, पण उत्पन्न मात्र एकरी ५–५० पेक्षा जास्त नाही. बहुतेकांची शेती कर्जात बुडलेली किंवा मालकाला पोटापुरतेही उत्पन्न न देणारी. अशा या ओसाड जमिनी निश्चित खंड देऊन किंवा बऱ्यापैकी किंमत देऊन खरेदी करणारा एखादा माणूस किंवा एखादी कंपनी भेटली तर येथील शेतकऱ्यांना आनंदच होता.

एकवीस क्रमांकाच्या फाटचातून पाणी आल्यावर या शेतीचा कायाकल्प होणार होता. ज्यांना या विकासाची माहिती होती, त्यांना ओसाड जिरायत जमिनीची ऊस-शेती करण्यास प्रचंड पैसा, कष्ट व नियोजन आवश्यक आहे हेही माहिती होते. १९३५ मध्ये ऊसउत्पादन करण्यासाठी मशागत, शेतीला पाणी, नंतर त्या उसाची साखर असा अतिशय अवघड प्रवास होता. मिळेल तेथे व मिळेल तशी जमीन घेऊन कारखाना उभारणारच ही आगाशेसाहेबांची जिद्द होती. हे अग्निदिव्य करण्याची त्यांची तयारी होती. सध्या उभ्या असलेल्या कारखान्याचा परिसर हा

ऊसउत्पादनाला योग्य असा जमिनीचा भाग आहे असा अभिप्राय तज्ज्ञांकडून आला. या सर्व कामात कै. विष्णू नारायण वर्तक इंजिनिअर यांचे मार्गदर्शन आगाशेसाहेबांना मिळाले. मुंबई सरकारच्या इंजिनिअरिंग खात्यात पोहोचलेले ते पहिले भारतीय इंजिनिअर. त्यांनी सिंधमधील सक्कर बराज योजनेवर काम केले होते. त्यामुळे पाटबंधारे खात्यात त्यांच्या शब्दाला मान होता, वजन होते. त्यांच्या पाठीशी खूपसा अनुभव होता. त्यांचे एक स्नेही श्री. परांजपे इंजिनिअर हेही बृहन्महाराष्ट्राकडे आले व एका हुशार माणसाला दुसऱ्या हुशार माणसाची जोड मिळून, अशा हुशार लोकांची एक साखळीच जणू तयार झाली. बोरगावच्या जमिनींचे व्यवहार, जडणघडण, देखभाल व कारखान्याच्या उभारणीच्या दृष्टीने काम करणारा, तन-मन-धन वेचणारा, तितक्याच आत्मीयतेचा माणूस हवा होता. पण माझ्या वडिलांना असा माणूस शोधण्याची जरूर भासली नाही, कारण बोरगाव येथील सर्व कामांची जबाबदारी माझे काका म्हणजे कै. ती. नारायण-काका यांनी स्वतःचे शिरावर घेतली. ते नुकतेच कारावासातून आले होते. ते स्वतः अविवाहित होते. त्यांचे ब्रह्मचर्य अतिशय कडक होते. आपल्या बंधूचा वैयक्तिक व साखरकारखान्याचा संसार तोच आपला संसार असे त्यांनी मानले.

माझे काका वडिलांच्या इतकेच हुशार, प्रगल्भ बुद्धिमत्तेचे, अतिशय मेहनती, करारी, धीट व कर्तृत्ववान होते. मुख्य म्हणजे दोघेही भाऊ एकविचाराने वागणारे होते. कोणत्याही बऱ्या किंवा वाईट परिस्थितीत माझ्या वडिलांच्या बरोबरीने उभे राहणारे नारायणकाका म्हणजे फार मोठी शक्तीच माझ्या वडिलांना लाभलेली होती. भावाचे सुख तेच आपले सुख, त्याचे दुःख तेच आपले दुःख अशी त्यांची भावना होती. दुसऱ्याचे कर्तृत्व फुलविण्याकरिता आपण दुय्यम भूमिका घेऊन कर्तव्य-पालन करणे ही गोष्ट फार अवघड आहे. त्याकरिता मनाची फार मोठी उंची गाठावी लागते. ही पण अवघड गोष्ट. काकां-सारखे समर्पित जीवनाची जाणीव असणारे लोकच हे करू

शकतात. माझे वडील व माझे काका दोघेही एकमेकांसाठी त्याग करणारे होते; म्हणूनच एवढ्या मोठ्या कारखान्याच्या कामाचा डोंगर पार करू शकले. कारखान्याकरिता ऊस पाहिजे. उसाकरिता शेती हवी. ती विकत किंवा खंडाने घेण्याकरिता माझे वडील व काका उभे राहिल्याबरोबर शेतकऱ्यांना आनंद झाला. नाहीतरी त्या जमिनीतून उत्पन्न मिळत नव्हतेच. त्या विकत किंवा खंडाने ही मंडळी घेणार म्हटल्यावर त्यांचा आनंद द्विगुणितच झाला. उद्याचे बदलणारे चित्र बुद्धीने जाणणाऱ्या माळी समाजामधील व्यक्ती उपहासाने बोलू लागल्या की शेती-बागायती, कारखाने ही कामे भटा-ब्राह्मणाची नव्हेत.

माझ्या वडिलांना भोरच्या राजकारणापासून कै. श्री. अण्णा पांडुरंग कोंडे देशमुख या मित्राचे पाठबळ होते. पुढे ते संचालक मंडळातही होते. त्यांचे या भागात बरेच नातेवाईक, सगेसोयरे होते. त्याचा माझ्या वडिलांना फायदा झाला. माझे काका हे अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे आणि लोकांचे हित जाणणारे होते. वेळप्रसंगी कडक पण एरवी प्रेमळ होते. ह्या लोकांकडे जाताना या अज्ञानी माणसांचे हित आपणच जपले पाहिजे, त्यांची लुबाडणूक होता कामा नये ह्यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यामुळे 'नारायणकाका' हे त्या भागातले लोकमित्र झाले. गरिबांची तर त्यांच्यावर देवासारखी श्रद्धा होती. श्री. नारायणराव कुलकर्णी, येनबा कदम, भीमराव भांडगे अशा लोकांनी स्थानिक शेतकऱ्यांना गाठून, त्या लोकांना कारखान्याची कल्पना देऊन नारायणकाकांना भेटविण्याचें काम केले. एकदा का शेतकरी काकांना भेटला की तो त्यांचाच होऊन जात असे. कारण त्याने मागितलेला खंड कमी वाटतो आहे असे दिसल्यास आपणहून स्वतःच त्याचा खंड ते वाढवून देत असत. काकांच्या या दूरदृष्टीचा कारखान्याला फायदा झाला. आगाशेसाहेब व माझे काका या दोघांची जीवनाची बैठकच मुळी विश्वस्ताची होती. या भागातल्या अनेक बड्या कारखानदारांना पुढे शेतकऱ्यांचे मोर्चे, निदर्शने, संप अशा गोष्टींना सामोरे जावे लागले. पण तसा प्रसंग आमच्या

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटवर कधीच आला नाही. इतका लोकांचा गाढ विश्वास होता, आणि आजही आहे. अकलूजच्या भाईचंद नेमिचंद व्होरा या व्यापारी व सावकारी पेढीचे सहकार्य कारखान्याला, माझ्या वडिलांना खूप मिळाले. आगाशेबंधूंनी ज्या लोकांच्या जमिनी चालू भावाने घेतल्या त्यात या पेढीचे हित-संबंध होते. थकलेली कर्जे आपोआप वसूल होण्याची व्होरा-बंधूंना संधी प्राप्त झाली.

हा कारखाना मागास भागात होणार असल्यामुळे जेथे काहीच काम नाही, शेतकरी अर्धपोटी राहून, लोटाभर पाणी पिऊन (तेसुद्धा दुर्लभ) उपाशीच झोपणार अशा या ठिकाणी नवा रोजगार निर्माण झाला. आजच्या मानाने अडीचशे टनांचा हा कारखाना तसा लहान, त्यामुळे ऊसतोडणी, वाहतूक इत्यादी सर्व कामे बैलगाड्यांमार्फत होत असत. साखरेची वाहतूकसुद्धा बैल-गाड्यांतूनच होत असे. त्या बैलगाड्या कारखान्याला जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांच्याच होत्या. म्हणजे या भागात कामाशिवाय सदैव नुसते भटकणाऱ्या मंडळींना बाराही महिने काम मिळाले. शिवाय या शेतकऱ्यांच्या घरातील कोणी ना कोणी कारखान्यात कामाला लागणार होते. तेथील लोकांना नवजीवन देण्याची संधी, नवजीवन प्राप्त करण्याची संधी माझ्या वडिलांनी व काकांनी दिली.

आगाशेबंधुद्वयांची दृष्टी साधु-संतांसारखीच होती. ही त्यांची दृष्टी म्हणजे सामाजिक बांधिलकीची साक्षच आहे. कारखान्यापूर्वी या अक्षरशः ओसाड असणाऱ्या माळरानात सात-आठ मैलांच्या परिसरात कोठेही पाणी नाही अशी स्थिती. अशा जागी माझे वडील व काका यांच्या प्रयत्नांच्या अग्निदिव्यामुळे कारखान्या-करिता उपलब्ध केलेला नीरा उजव्या कालव्याचा एकविसावा फाटा हा तेथील लोकांना जल-जीवन देणारा ठरला. परंतु काही हितसंबंधी लोकांचा विरोधही माझ्या वडिलांना व काकांना सहन करावा लागला. 'हे पुण्याचे ब्राह्मण कसला कारखाना काढणार! तुमच्या जमिनी पण जातील, मग कसला खंड? ना मिळेल खंड,

ना राहील मालकी.' असा उलट प्रचार भरपूर चालू होता. पण माझे काका चतुर होते. आपण एवढ्या दूर आलो आहोत, कारखाना तर उभा करावयाचा आहे. मग भेटतील तशी माणसे व येईल ती परिस्थिती निभावून नेली पाहिजे, अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली. कुणाचीही रास्त अपेक्षा ते मान्य करीत. सर्व व्यवहार बिनबोभाट पार पाडीत. पण कुणी अवास्तव दमबाजी आणि गावगुंडी करेल तर त्याला सरळ करण्याची धमकही त्यांच्याजवळ होती. भित्रेपणा वगैरे नव्हताच. त्या माळ-रानावर एका बाजूला पत्र्याची शेड बांधून वर्षानुवर्षे ते राहत होते. कुठल्याही सुखसोयी तेथे नव्हत्या. त्यांच्या सेवेला अमृता नावाचा एक नोकर होता. जेवण करायला एक भागवत नावाचा स्वयंपाकी. ते एकटे कसे राहत असतील ते त्यांचे त्यांनाच ठाऊक ! आणि माझे वडील पुण्यातील कामे करून केव्हाही कारखान्यावर येत. वकिलीपासून त्यांनी मोटार घेतलेली होती. तरीसुद्धा कच्चे रस्ते, रस्त्यात प्यायला पाणीसुद्धा मिळणार नाही; मोटारीचे टायर सारखे पंक्चर होत; आठ-दहा तास जायला लागत; पण अहर्निश कष्ट करणे एवढेच ध्येय कारखाना उभा होईपर्यंत व नंतरही होतेच. त्या दोघांचे कष्ट आठवले तरी आजही मनाची उलघाल होते. मन व्याकुळ होते. काकांनी तेथील शेतकऱ्यांकडून स्वतःच्या कणखर धोरणामुळे कारखान्याला ऊस लावण्याकरिता लागणारी, तीसुद्धा थोडी नाही तर दोन हजार एकर ऊस लावण्या-करिता बारा हजार एकर जमीन उपलब्ध केली. त्यातील काही खंडाने व काही मालकीने अशी होती. योग्य काळात या सर्व जमिनीची सुधारणा केली व एकरी पन्नास ते साठ टन उसाचे उत्पादन सुरू झाले. या कारखान्याच्या दृष्टीने, त्याच्या उभारणीच्या दृष्टीने काकांनी एका बाजूला शेतीची तयारी केली, तरी दुसरी भांडवल गोळा करण्याची लढाई बाकीच होती. कंपनीचे भागभांडवल खपविणे हेच मोठे अग्निदिव्य होते. कारण आगाशेसाहेबांचा एक वेगळाच ध्यास होता. तो हा की, कंपनी मध्यमवर्गीय माणसाची झाली पाहिजे आणि राहिली पाहिजे.

त्या काळात अशी अनेक मराठी कल्पक मंडळी होती की, त्यांनी योजना तयार करण्याचे श्रेय घ्यावयाचे व पुढे पुरेसा पैसा उभा न राहिल्यामुळे कुणातरी धनिकाला ती योजना देऊन टाकावयाची. १९३५ ते १९५५ या वीस वर्षांत अनेक लोकांच्या हातात प्रयत्न करूनही आज ते धंदे राहिले नाहीत. अशा परिस्थितीत आगाशे-साहेबांचा अट्टाहास होता की, हा कारखाना मध्यमवर्गीय मराठी माणसाच्या मालकीचाच झाला पाहिजे. म्हणूनच मध्यमवर्गीयांनाच त्यांनी आपले भांडवलदार बनविले. सुरुवातीच्या काळात त्यांना श्री. मुकुंदराव परांजपे यांची जोड मिळाली. भाग-भांडवलविक्रीचे काम तर सुरू झाले. विशिष्ट वर्गाकडून भाग-भांडवल मिळावे या हेतूने आगाशेसाहेब महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर जेथे जेथे मराठी मंडळी होती अशा अनेक ठिकाणी, गावोगावी हिंडत असत. ते आपल्या बॅगेत उसाच्या दोन-तीन कांडी नेत. मराठी माणसाला सांगत, "या उसाची साखर मी करणार आहे. महाराष्ट्रातला वर्तकी साखरेचा कारखाना बंद झाला आहे. पण मॉरिशसची साखर बंद करण्याकरिता मी साखरकारखाना काढीत आहे." मराठी माणसाच्या स्वदेश-भक्तीबरोबरच मराठी अस्मितेला हात घातल्यासारखे होई. आगाशेसाहेबांच्या बोलण्याचा व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडत असे आणि जवळ फारसे पैसे नसतानाही तो माणूस शेअर घ्यावयास तयार होई.

या कारखान्याच्या योजनेची प्रेरणाच मुळी देशाभिमान आणि देशभक्तीची होती. आगाशेसाहेबांना पैसे मिळविण्यासाठी कारखाना काढण्याची काही गरज नव्हती. त्यांचा वकिलीचा धंदा उत्तम चालू होता. भोर संस्थानात लोकप्रतिनिधी म्हणून मानमान्यता मिळाली होती. वडिलोपार्जित जमिनीचा हिस्साही मिळाला होता. इतर सुखवस्तू कुटुंबाप्रमाणे त्यांना ऐषारामात राहता आले असते. पण स्वसुखापेक्षा देशाच्या, महाराष्ट्राच्या हिताची ओढ लागलेल्या आगाशेसाहेबांचे मन कारखानदारीकडे ओढ घेत होते.

# एक अद्वैत : सिंडिकेट आणि आगाशेसाहेब

आगाशेसाहेबांनी संकल्पित साखरकारखान्याच्या उभारणीची पूर्वतयारी वेगाने आरंभिली. १९३४ च्या सुमारास इतरत्रही देशाला व महाराष्ट्राला उद्योगी बनविण्यासाठी अनेक विचारवंत प्रयत्नशील होते. आगाशेसाहेब स्वतः कारखानदार बनणार होते. पण कारखानदारीला समाजाचे मन तयार करावयास लागते. मराठी माणूस शेती, नोकरी, शिक्षण, वैद्यकी, वकिली या व्यवसायांत पिढ्यान्‌पिढ्या गुंतलेला होता. तरुणांना संपत्ती निर्माण करणाऱ्या व वाढविणाऱ्या उद्योगाकडे वळविण्याचे, त्यांना उत्तेजन देण्याचे, मार्गदर्शन करण्याचे क्रांतदर्शी काम करणाऱ्या एखाद्या संघटनेची गरज या विचारवंतांना वाटत होती. त्यातूनच 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज'ची स्थापना १६ मार्च १९३४ रोजी पुण्यात झाली. १९३५ च्या फेब्रुवारीमध्ये मराठा चेंबरने व्यापारी व कारखानदार परिषद बोलावली होती. या परिषदेत आगाशेसाहेबांनी एक ठराव मांडला. त्याला चेंबरचे एक सक्रिय कार्यकर्ते आणि माझ्या वडिलांचे एक स्नेही श्री. दामुअण्णा पोतदार यांनी अनुमोदन दिले. महाराष्ट्रातील साखरकारखान्यांना सर्व तऱ्हेच्या 'सवलती देऊन' ते यशस्वी करण्यासाठी साहाय्य करणे हे मुंबई सरकारचे कर्तव्य आहे, असे त्या ठरावात म्हटले आहे. त्याकरिता सरकारने काय काय करावे हेही ठरावातच नमूद केले आहे. (१) कालव्याच्या पाण्यासंबंधी पाटबंधारे खोदणे. (२) आगगाड्यांची व वाहतुकीच्या इतर साधनांची सोयीस्कर

आखणी करणे, जेणेकरून महाराष्ट्रातील साखरउद्योगास हानिकारक होणार नाही. (३) साखरेच्या धंद्यात उत्पन्न होणाऱ्या मळीसारख्या पदार्थांचा फायदेशीर उपयोग करण्यास सवलत देणे इत्यादी मार्गांनी मुंबई सरकारने आपले धोरण आखावे अशी या परिषदेची विनंती होती.

आगाशेसाहेबांनी आपल्या संकल्पित कारखान्याच्या योजनेला मराठी चेंबरच्या प्रतिनिधी संघटनेची पसंती व मान्यता मिळावी म्हणून प्रयत्न केला. त्यानुसार चेंबरने सर्वश्री धोंडुमामा साठे, गो. द. आपटे, दा. ग. बापट, रा. न. अभ्यंकर (साहेबांचे भाचे-जावई) व श्री. र. राजगुरू यांची उपसमिती नेमून सिंडिकेटच्या उसाच्या लागवडीची, जमिनीची व उत्पादनाच्या योजनेची प्रत्यक्ष पाहणी करून सिंडिकेटची योजना किफायतशीर असल्याची शिफारस केली आणि तसा अहवाल चेंबरला सादर केला. तेव्हा मराठा चेंबरने महाराष्ट्रीय जनतेला जाहीर आवाहन केले की, सिंडिकेटचे उरलेले तीन लाखांचे शेअर्स खरेदी करावेत.

मराठा चेंबरचे प्रमाणपत्र मिळाले तरी सिंडिकेटला भाग-भांडवल जमविणे सोपे नव्हते. १९३० ते ४० पर्यंतचा काळ मंदीचा होता. त्याच वेळी देशातल्या ८७ बँका बुडाल्या होत्या. पुण्यातच पुणे बँक, शिलोत्री बँक या बँकादेखील या लाटेत वाहून गेल्या होत्या. अशी परिस्थिती असली तरी त्याच सुमारास कारखानदारीचा मात्र अरुणोदय होत होता असे दिसते. स्वदेशी मालाची प्रदर्शने भरविली जात होती. त्यामध्ये किर्लोस्कर, ओगले, भांडीवाले तारकर, सिरॅमिक उद्योगातील मोरवीचे काका गणपुले, भिवंडीचे भातयंत्रवाले दांडेकर, सांगलीचे धनी वेलणकर, धूत-पापेश्वरचे नानासाहेब पुराणिक, सांडू ब्रदर्स, बालामृतचे डोंगरे अशी नावे कानी येत असत. किर्लोस्कर, ओगले सोडल्यास या बहुतेकांच्या उद्योगाचे स्वरूप छोट्या कारखानदारीचे होते. यातील बरेचसे उद्योग दक्षिणेकडील औंध, सांगली, इचलकरंजी वगैरे संस्थानिकांच्या दूरदर्शीपणातून मिळालेले प्रोत्साहन, आश्रय व सवलती या बळावर निघाले होते.

असे असले तरी बऱ्याच बँका बुडाल्यामुळे भागधारक फारच बिथरलेले होते. अशा कठीण परिस्थितीत माझे वडील मध्यमवर्गीय लोकांकडून भागभांडवल जमा करून साखरकारखाना काढण्यास निघाले हे धाडसाचे तर होतेच पण लोकांच्या दृष्टीने एक नवलच होते.

अखेर २१ सप्टेंबर १९३४ रोजी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट स्थापन झाली. तेव्हा तिचे अधिकृत भांडवल होते २० लाखापर्यंतचे. पंचवीस रुपयांचे ४०-४५ हजार शेअर्स आणि पन्नास हजार प्रत्येकी दहा रुपयांचे, पाच टक्क्यांचे प्रेफरन्स शेअर्स असे विभागून विक्रीस काढले. या शेअर्सचे पैसेसुद्धा एकदम भरावयाचे नव्हते. प्रथम अर्जासोबत पाच रुपये व पुढे चार हप्त्यांत एकंदर पंचवीस पुरे करावयाचे. कंपनीच्या स्थापनेबरोबर संचालकमंडळ स्थापले गेले. त्यामध्ये पुढील व्यक्ती होत्या– (१) श्री. नरसिंह चिंतामण केळकर, B. A., LL. B., विश्वस्त, केसरी व मराठा (पुणे); (२) श्री. विष्णू नारायण वर्तक, M. A., L. C. E., रिटायर्ड चीफ इंजिनियर (P. W. D.) (पुणे); (३) श्री. प्रो. वामनराव काळे, M. A., एक्स मेंबर ऑफ इंडियन ट्रॅफिक बोर्ड (पुणे); (४) ऑ. श्री. जगन्नाथ महाराज पंडित, फर्स्ट क्लास सरदार व इनामदार, कौन्सिल ऑफ स्टेटचे मेंबर, भाऊ महाराज हाऊस, (पुणे); (५) सर गोविंद बलवंत प्रधान, अॅडव्होकेट, (O. I. S.) मुंबई; (६) डॉ. व्ही. डी. फाटक, L. R. C. P., M. R. C. S., L. M., पुणे; (७) डॉ. रघुनाथ गणेश ठकार, L. M. S., स्टेट सर्जन, सांगली; (८) श्री. अण्णाजी पांडुरंग कोंडे देशमुख, लँडलॉर्ड व व्यापारी, अध्यक्ष, देशमुख समाज, भोर.

कंपनीची पहिली कचेरी आयुर्वेदाचार्य गणेशशास्त्री जोशी यांच्या वाड्यात होती. नंतर बेलबागेसमोर भिडे यांचे वाड्यात व नंतर कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या इमारतीत (लक्ष्मी रोड, पुणे) येथे आली. आजही कचेरी तेथेच आहे. कंपनीचे मॅनेजिंग एजन्ट्स म्हणून श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे व श्री. परांजपे यांची बोर्डाने नेमणूक केली.

कंपनीच्या माहितीपत्रकामध्ये मुद्दाम नमूद केले आहे की, कंपनी साखर करण्याबरोबरच त्याला लागणारा ऊस स्वतःच्या जमिनीत स्वतः पिकविणार आहे. प्रथम दररोज २५० टन गाळणशक्तीची यंत्रे बसवून पुढे सहाशे टनाची वाढ करणार आहे. ऊस-उत्पादनाला द्यावयाची जमीन मालकी हक्काने खरेदी करून किंवा खंडकरी म्हणून मूळ मालकाशी करार करून घेण्यात येईल. सरकारने पाण्यासाठी मंजूर केलेला जमिनीचा तुकडा साधारण १३ हजार एकरांचा असून उत्पादनाला योग्य आहे. हे सर्व ठरले. याला भवितव्यही मोठे होते. पण प्रवास अतिशय कठीण व लांब पल्ल्याचा होता. या कंपनीचे पहिले वीस भागधारक पाहिले तर श्री. न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर, सर गोविंदराव प्रधान, वामनरावजी काळे, सरदार जगन्नाथ महाराज पंडित, पुढे मुंबईचे मुख्यमंत्री झालेले श्री. बाळासाहेब खेर अशी मंडळी होती. ही मंडळी खूप मोठी धनिक होती असे नाही, पण ध्येयवादी होती. त्यामुळे अशा मंडळींची जोड आगाशेसाहेब आपल्या कंपनीला मिळवू शकले. तसेच सिंडिकेटची सर्वांगीण पाहणी करून, योजनेची शिफारस करून, मराठी जनतेला सिंडिकेटचे शेअर्स घेण्याचे आवाहन मराठा चेंबरने करणे हे आगाशेसाहेबांच्या दृष्टीने गौरवास्पद आहे. त्या वेळी इतर अनेक कंपन्यांतून संचालकमंडळावर सेवानिवृत्त इंजिनियर्स किंवा आय. सी. एस. सनदी नोकर हे येण्यास तयार असत. पण त्यासाठी लागणारे शेअर्स मॅनेजिंग एजंटनीच स्वतःचे पैसे भरून द्यावेत व इतरही काही मिळाले तर त्यांना हवेच होते. कारण आपण आपले नाव कंपनीच्या मदतीसाठी देतो ही उपकाराची भावना. पण बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटला ध्येयवादी माणसे संचालकमंडळात मिळाल्यामुळे ही कंपनी अशा स्वार्थीपणाला अपवाद ठरली. याला कारण कारखान्याची देशाभिमान व देशभक्तीची प्रेरणा असलेली योजना.

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट ही एकच अशी कंपनी म्हणावी लागेल की, जिच्या उद्देशात 'महाराष्ट्रात व इतरत्र ज्या सेवाभावी संस्था आहेत किंवा असतील त्यांना मदत करणे' हे कलम अंतर्भूत

केलेले आहे. या अधिकाराच्या बळावर आगाशेसाहेबांनी अनेक छोट्या व मोठ्या देणग्या दिल्या. व्यक्तिश: आगाशेसाहेब व बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट कंपनी आर्थिक अडचणीतून जात असतानाही या देणग्या त्यांनी दिल्या, असे अनोखे दृश्य महाराष्ट्राने पाहिले आहे. या सर्वांच्या मागे आगाशेसाहेबांचे महाराष्ट्राबद्दलचे प्रेम व आत्मीयता हीच होती.

आगाशेसाहेब म्हणजे बृहन्महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट म्हणजे आगाशे असे जणू अद्वैतच होते. ह्या बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटकरिता, साखरकारखान्याच्या शेअरविक्रीकरिता त्यांनी जिवाचे रान केले. साऱ्या देशभर त्यांची भ्रमंती चालू झाली. आता खरी कसोटीची वेळ आली होती. आपली योजना उत्तम आहे, त्याला देशभक्तीची झालर, नाती-गोती भरपूर, ओळखी पण खूप, तेव्हा भागभांडवल लोक सहज देतील ही अपेक्षा. पण मराठी माणूस अतिचिकित्सक. तो पैशाची गुंतवणूक सावधपणे करतो. त्याला व्याजापेक्षा पैशाची– आपल्या पैशाची– सुरक्षितता अधिक हवी असते. माझ्या वडिलांना या गोष्टीची पुरेपूर जाणीव होती. आपल्या कंपनीच्या भावी भागधारकांचा अचूक अंदाज होता. त्यांनी मध्यमवर्गीय माणसालाच आपला भांडवलदार करावयाचे ठरविले होते. खरे म्हणजे एखाद्या व्यक्तीकडे काही मागायला जाणे कठीण. त्यात पैसे मागणे आणि तेसुद्धा भावी काळात उभ्या राहणाऱ्या एका कारखान्यासाठी मागणे म्हणजे तर अतिकठीण ! परंतु आगाशेसाहेबांना मनुष्य-स्वभावाची अचूक जाण होती. दुसऱ्याला पटेल असे बोलण्याचे कौशल्य त्यांच्यापाशी होते. याचबरोबर भव्य देहयष्टी, प्रसन्न मुद्रा, माझ्या वडिलांची वेशभूषा त्या काळची आदरयुक्त प्रतिष्ठा मिळवून देणारी होती. पांढरेशुभ्र धोतर, पांढरा शर्ट, त्याच्यावर लांब कोट, पगडी, उपरणे, पायांत जोडे किंवा चपला अशी त्यांच्या उमद्या व्यक्तिमत्त्वाची मूर्ती प्रथम दृष्टिक्षेपातच दिलासा देणारी होती. त्यांची चालसुद्धा जंगलच्या राजासारखी दमदार. प्रत्येक पाऊल आत्मविश्वासाचे. बऱ्याच वेळा समोरचा माणूस भारावून

जात असे. त्याच्या मनात कंपनीची योजना, मिळू शकणारे व्याज याहीपेक्षा हा एक मित्र आपल्याजवळ चांगल्या कामासाठी पैसे मागतो आहे, त्याची कंपनी नव्हे तर तो स्वत: आपल्या पैशाचा विश्वस्त आहे, अशी भावना निर्माण होई. आपल्याला झेपेल तेवढे पैसे तो आगाशेसाहेबांना काढून देई. आगाशेसाहेबांना पैशाची जरुरी होती म्हणून त्यांच्या एका मित्राने तर आपल्या बायकोचे दागिने गहाण ठेवून पैशाची मदत केली.

बृहन्महाराष्ट्र कंपनी पुण्यातील, तिचा कारखाना शंभर-सव्वाशे मैलांवर सोलापूर जिल्ह्यात बोरगावला आणि त्याचा पहिलावहिला भागधारक रत्नागिरी जिल्ह्यातल्या देवरूख गावचा. त्यांचे नाव श्री. जयराम शिवराम देसाई. त्यांच्या अर्जाची तारीख ६-१-१९३५ अशी आहे. यावरून आगाशेसाहेबांची शेअरविक्रीसाठी कुठपासून कुठपर्यंत भ्रमंती चालू होती याची कल्पना येते. एकीकडे शेअर-विक्रीची धडपड व दुसरीकडे पाणी उपलब्ध झाल्याबरोबर दोन हजार एकर उसाची शेती, आणि या उसापासून शुभ्र दाणेदार साखरेचे उत्पादन करण्याची मनीषा बाळगणाऱ्या आगाशेसाहेबांच्या नजरेचा पल्ला व झेप निराळीच होती.

शेअरविक्री चालू होती तरी तिला अपेक्षित वेग येत नव्हता. आगाशेसाहेब धारवाड-हुबळीपासून इंदूर-ग्वाल्हेरपर्यंत हिंडत होते. त्यांच्या डोळ्यांसमोर दूरचा मराठी माणूस व मध्यमवर्गीय माणूस होता. या मराठी अभिमानाचा अंत:प्रवाह त्यांनी ओळखला होता, एवढेच नव्हे तर त्या प्रवाहातील ते स्वत: एक प्रवासी होते. त्यांचे प्रयत्न अव्याहत चालू होते. डॉक्टर, वकील, इंजिनियर व इतर निवृत्त अधिकाऱ्यांनी बृहन्महाराष्ट्राला सहकार्य दिले पण ते पुरेसे पडेना. शेअरची किंमत केवळ २५ रुपये. वर्षभराच्या मुदतीत ती पुरी करायची. शेअरवरचा नफा, कारखाना सुरू होऊन, चांगला चालून, पहिल्या दोन-चार वर्षांतला खर्च निघून नंतर डिव्हिडंड वाटणार. त्यापेक्षा निश्चित व्याजाची ठेव ठेवण्याकडे मध्यमवर्गाचा कल होता. अशी परिस्थिती असताना कंपनीच्या

संचालकमंडळाच्या सभा होत, पण त्या केवळ विकलेल्या शेअर्संना मंजुरी देण्यासाठी, त्याही प्रत्यक्ष न होता परिपत्रके फिरवून, नंतर सर्वांच्या उपस्थितीत त्या परिपत्रकांना मान्यता मिळे. अशी साठ परिपत्रके फिरवून एकूण शेअर्सची विक्री झाली. आवक शेकड्यांनी व खर्च हजारांनी असे चालू होते. हे हजारो रुपये कोठून आणावयाचे व कसे आणावयाचे या विचाराअंती माझ्या वडिलांनी ठेवी घेण्याची कल्पना प्रत्यक्षात आणली. कंपनीच्या स्थापनेनंतर चार वर्षांनी १९३७च्या नोव्हेंबरमध्ये संचालक-मंडळाने ठराव केला की मशिनरीची ऑर्डर दिलेली आहे व तिची किंमत देण्याकरिता कंपनीने ठेवी घ्याव्यात व मॅनेजिंग एजंटना ठेवी मिळविण्यासाठी एक टक्का कमिशन द्यावे. तसेच पन्नास हजारांचे शेअर्स खपविणाऱ्याला पाच टक्के कमिशन व दोन टक्के प्रवासखर्च द्यावा. हा ठराव ३०-५-१९३७ चा.

स्कोडा कंपनीच्या मशिनरीची किंमत ७२१८ पौंड होती. तेवढी रक्कम रुपयांत जेवढी होईल तेवढी रक्कम ठेवीमधून जमवावी, असे ५-११-३७ ला ठरविण्यात आले. पाण्याची सोय झाली तरी जमिनी ऊसपिकाला योग्य झाल्या होत्या असे नाही. या जमिनींच्या मशागतीलाही खर्च होतच होता. पैशाची रस्सीखेच चालूच होती.

आगाशेसाहेब बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या उभारणीकरिता पैशासाठी सरकारदरबारी गेले नाहीत. मराठी माणसाला आपली वाटणारी बँक ऑफ महाराष्ट्र हीपण त्या वेळी मोठी झालेली नव्हती. भविष्यात मात्र या बँकेने खूपच अर्थसाहाय्य केले. आगाशे-साहेबांनी मनोमनी सुस्थितीतला मराठी माणूस हा आपला आश्रयदाता निश्चित केला होता. या वर्गात खोलपर्यंत पोहोचण्याला लोकमान्यांच्या 'केसरी'सारखे साधन त्यांनी उपलब्ध करून घेतले होते. केसरी पत्राचे वैशिष्ट्य असे की ते प्रथम साप्ताहिक व नंतर द्विसाप्ताहिक स्वरूपात प्रसिद्ध होई. हा केसरी रत्नागिरीपासून कलकत्त्यापर्यंत मराठी घराघरात पोहोचत असे. 'काय म्हणतोय केसरी ?' किंवा 'केसरीत अमुक एक लेख आला आहे' अशी




श्रीपूर फॅक्टरी व परिसरातील शेतकऱ्यांची देवता म्हाळुंगची देवी




श्रीपूर साखर कारखाना परिसर






पंडितसाहेब फॅक्टरी पूजा करताना.



साहेबांची चिरंजीव स्मृती
'चंद्रशेखर महाविद्यालय' श्रीपूर




'बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे.
स्वतःचे नाव न देता कंपनीला दिलेला मोठेपणा!

भाषा सुशिक्षित मराठी भाषक घरात ऐकू येई. आगाशेसाहेबांनी केसरी हे माध्यम आणि ही भावना उत्कृष्ट तऱ्हेने कंपनीच्या कामाला जोडली. आगाशेसाहेबांनी दिलेल्या कंपनीच्या जाहिराती केसरीमध्ये आकर्षक रीतीने ठळकपणे प्रसिद्ध होत असत. ठेवी घेणे ही गोष्ट त्या वेळच्या लोकसंकेतात न बसणारी होती. परंतु आगाशेसाहेबांनी तीच कल्पना व्यवहारात आणली, व यशस्वी केली. त्यालाच 'आगाशे पॅटर्न' म्हटले जाते. भारतात ही योजना प्रथम त्यांनीच सुरू केली.

कंपनीने १९३७ च्या सुरुवातीला मशिनरीची ऑर्डर दिली. याच वेळी युरोपात अस्थिरतेची छाया पसरत होती. जर्मनीत हिटलरचा उदय झाला होता. १९३७–३८ साली सर्व जर्मन कारखाने युद्धोपयोगी साहित्य निर्माण करण्यात गुंग होते. कंपनी प्रथम जर्मन कंपनीला मशिनरीची ऑर्डर देण्याच्या विचारात होती. १ सप्टेंबर १९३९ ला हिटलरने युद्ध-घोषणाही केली. फेर-विचाराअंती स्कोडा कंपनीला मशिनरीची ऑर्डर दिली आणि मशिनरी भारतात वेळेवर पोहोचू शकली.

ठेवीसाठी केसरीत जाहिराती येतच होत्या. शेअर्सच्या जाहि-रातीवर चेअरमन श्री. वर्तक यांची सही, ठेवींच्या जाहिरातीवर आगाशेसाहेबांची सही. या ठेवींना व बृहन्महाराष्ट्राच्या ठेवीदारांना कंपनीची मिळकत नव्हे तर आगाशेसाहेबांचा शब्द, त्यांचे वैयक्तिक जीवन व वित्त जामीन होते. त्यांची भूमिकाच एका विश्वस्ताची होती. त्यांची वृत्तीच अशी होती की ते संपत्तीकडे साध्य म्हणून पाहत नव्हते तर समाजाच्या विकासाचे एक साधन म्हणून पाहत.

त्यांची आठवण सांगताना भोरपासून परिचित असलेले व अनेक वर्षे कंपनीचे चेअरमन असलेले श्री. शंकरराव लिमये म्हणतात, "कोट्यावधी रुपयांची उलाढाल करणारा हा माणूस शेवटपर्यंत भाड्याच्या घरात राहिला. त्याने बंगला बांधला नाही. कंपनीच्या घटनेमध्ये (१२१–१६, १६ अ) आपल्या कंपनीच्या

विद्यमान आणि माजी सेवकांना सुविधा पुरविण्याची तरतूद आहे. त्यांना वैद्यकीय, शैक्षणिक सर्व तऱ्हेची मदत देण्याची तरतूद आहे. त्याच कलमाच्या पुढील भागात आमजनतेसाठी सेवाभावी, दानधर्मशील, धार्मिक व वैज्ञानिक, राष्ट्रीय हिताच्या ध्येयाने प्रेरित होऊन निघालेल्या संस्थांना मदत करण्याचे ध्येय नोंदवलेले आहे. त्याला भाषिक, प्रांतिक, प्रादेशिक किंवा विशिष्ट धर्माची मर्यादा घातलेली नाही. त्यानंतरच्या पुढील भागात राजकीय पक्ष वा राजकीय ध्येयवादाला पोषक अशा कामाला पंचवीस हजार रुपयांपर्यंत मदत देण्याची तरतूद आहे."

या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार केला तर आगाशेसाहेबांच्या योजना स्वयंपूर्ण, निर्दोष व विशाल दृष्टिकोन असलेल्या आहेत, हेच लक्षात येते. ते कारखाना म्हणजे आपले विशाल कुटुंब मानत व त्याची काळजी घेत. त्यांच्या शब्दाच्या सच्चेपणाला ईश्वर-निष्ठेची आणि भक्तीची जोड होती. 'कारखाना माझा नाही, मी कारखान्याचा आहे. हे सर्व काम नियती माझ्याकडून करून घेत आहे' अशी त्यांची भावना होती.

# मोगरा... कळीयासी आला

उत्कृष्ट योजना, सखोल ज्ञान, धंद्याचे उज्ज्वल भवितव्य आणि जोडीला विश्वास देण्याची व घेण्याची शक्ती या बळावर जमतील तसे शेअर्स व जमतील तशा ठेवी घेत, आर्थिक बाजू लढवीत आगाशेसाहेब १९३७ साल अखेरपर्यंत देशभर हिंडत होते. अल्पावधीत दहा लाखांच्या ठेवी जमा झाल्या. भाग-भांडवलावर कारखाने काढावेत या संकेताला ठेवींसह शेअर्स हा नवीन पर्याय आगाशेसाहेबांनी सुरू करून यशस्वी करून दाखविला. १९३७ च्या अखेरीस व १९३८ च्या प्रारंभी ही योजना थोडी नाखुषीची वाटत होती. पण मशिनरीचे पैसे देणे तर क्रमप्राप्तच होते. त्यामुळे संचालकमंडळाने मशिनरीसाठी ठेवी घेण्यास परवानगी दिली. आगाशेसाहेबांच्या प्रयत्नाला लोकमान्यांच्या केसरीची म्हणजे एका नैतिक शक्तीचीच जोड मिळाली. केसरी म्हणजे समाजप्रबोधन करणारे वृत्तपत्र. त्यामध्ये सत्य तेच छापले जाते, असा जनमानसात विश्वास होता.

भागभांडवलाला ठेवीची जोड देण्याची आगाशेसाहेबांची कल्पना संचालकमंडळाकडून मान्य झाल्यामुळे अर्थपुरवठ्याची अवस्था सुधारली. संचालकमंडळात अधून-मधून थोडेफार मतभेद होत असत.

याच काळात कंपनीचे अध्यक्ष श्री. न. चिं. ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांनी कंपनीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्याच वेळी अनेक संस्थांतून ते निवृत्त झाले होते, पण विरोधकांना संधी मिळाली, अनेक प्रवाद उठले.

याच सुमारास माझ्या भावाचे (चि. रंगनाथ) टायफॉईडने निधन झाले. डॉ. फाटकांसारखे निष्णात डॉक्टर उपचार करीत होते. पाण्यासारखा पैसा खर्च केला. जेवढे शक्य तेवढे उपचार केले. पण उपयोग झाला नाही. ज्या मुलावर माझ्या वडिलांच्या आशा-आकांक्षा होत्या त्या माझ्या भावाच्या जीवनज्योतीबरोबरच मालवल्या. दु:खाने जीव होरपळून निघाला. माझ्या वडिलांवर व सर्व कुटुंबावरच दु:खाचा डोंगर कोसळला. एका बाजूला पुत्र-निधनाचे दु:ख होतेच, तरीसुद्धा त्याही परिस्थितीत कंपनीच्या कारभाराचा गाडा वडील ओढतच होते.

सर्व गोष्टीत एक गोष्ट नक्की झाली की लिमिटेड कंपन्यांनी ठेवी घ्याव्यात या नव्या विचाराची बैठक, परिस्थिती, वस्तुस्थिती व ध्येय याचा साकल्याने विचार करून, सर्वांकडून मान्य करवून घेण्यात आगाशेसाहेब यशस्वी झाले. याचे उदाहरण म्हणजे 'लक्ष्मी-नारायण शेतकी संघा'च्या केसच्या प्रकरणी त्या वेळचे भारताचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख यांचेकडे जावे लागले. कायद्यात न बसणाऱ्या गोष्टी कराव्या लागल्याचे सांगावे लागले. आगाशेसाहेबांचा सद्हेतू, प्रामाणिकपणा आणि कारखान्यावरची नि:स्वार्थी निष्ठा पाहून प्रकरण देशमुखांनी दप्तरी दाखल तर केलेच आणि "महाराष्ट्रात एक कोटी दहा लाखांच्या ठेवी मिळविणाऱ्या 'आगाशे' या व्यक्तीस मला पाहावयाचे आहे" अशी इच्छा प्रदर्शित केली. श्री. चिंतामणराव देशमुख यांचे हे उद्गार म्हणजे माझ्या वडिलांना मिळालेले शिफारसपत्रच होय. १९३७ ते १९३९ मार्च ही दोन वर्षे आगाशेसाहेबांच्या कसोटीचीच वर्षे होती. निधी उभारणे, मशिनरीची ऑर्डर देणे, ती उभारणे, मशिनरीच्या उभारणीनंतर २५० टन ऊस रोज पुरवून त्याची साखर, तीही शुभ्र व दाणेदार ही सर्व लढाई ते जवळजवळ एकटेच लढत होते. शेतीकडे माझे काका व फॅक्टरी उभारणीकडे आपल्या निवडीचे तंत्रज्ञ यांची साथ होती; परंतु श्री. तात्यासाहेब केळकरांच्या जागी दिवाणबहादूर लिमये यांची नियुक्ती झाली होती. आता कारखाना, कंपनी उभी राहणार

अशी हवा निर्माण झाली. केसरीतल्या जाहिरातींमधून खुलासे व दिलासावजा उत्तरे आगाशेसाहेब देत असत. ऑर्डर दिलेल्या मशिनरीचे 'जून महिन्यात आगमन होणार' अशी जाहिरात प्रसिद्ध झाली. माळावर फॅक्टरी उभी करण्याची सुरुवात. एकोणीसशे अडतीस (१९३८) मार्च महिन्यातील गोष्ट. खिशात पैसे नसताना हजारांच्या, लाखांच्या गोष्टी चालत. पुण्यात पैसा आणण्याचे काम आणि बोरगावात तो खर्च करून इमारत उभी करण्याची घाई, केसरीतील जाहिराती हे त्यांचे जनतेला पैशासाठी आवाहन. "आम्ही ठेवी घेतो. मशिनरीची ऑर्डर दिली, मशिनरी निघाली, मशिनरी आली, ऊस तयार झाला" अशा जाहिराती केसरीत प्रसिद्ध होत होत्या. ठेवीदारांना विश्वासात घेण्याची ही आगाशेसाहेबांची खास पद्धत होती. प्रसिद्धीचे तंत्र हे माझ्या वडिलांना उपजतच ज्ञात होते. मोजके पण वेधक शब्द, विरोधक व जिज्ञासू यांना चार वाक्यांत शांत करण्याची कला. आगाशे-साहेबांच्या केसरीतील जाहिरातींवर रोज हजारापासून पन्नास हजारांपर्यंत ठेवी येत असत व इकडे फॅक्टरीच्या उभारणीचे काम मार्गी लागे.

मशिनरी येऊ लागली. मशिनरी भिगवण रेल्वे स्टेशनवर रेल्वेने येई व फॅक्टरीच्या जागेवर ५२ मैल आणण्यासाठी खास गाड्या आणविल्या होत्या. श्री. विनायकराव पटवर्धन हे तेथील वाहतुकीचे काम करीत. मुंबईला मशिनरी बंदरात उतरविणे, कस्टमचे काम करणे हे सर्व मे. पुसाळकर कंपनी करीत असे. पैशाची अडचण असल्यास आगाशेसाहेबांकडे हे लोक पैशाची मागणी तर करीत नसतच, शिवाय स्वतःच्या खिशातून खर्च करीत असत. हे आपलेच काम आहे, आगाशेसाहेबांकडचे पैसे मिळतीलच, याविषयी त्यांच्या मनात गाढ विश्वास होता.

१९३८ च्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर त्या वेळचे कंपनीचे चेअरमन श्री. वर्तक यांचे हस्ते पायाभरणी समारंभ झाला. त्या वेळी छायाचित्रे घेण्याची किंवा प्रसिद्धीची फारशी पद्धत नव्हतीच. त्यामुळे त्या वेळची छायाचित्रे उपलब्ध नाहीत.

आता साहेबांच्या कामाचा केंद्रबिंदू खऱ्या अर्थाने बोरगावकडे सरकला होता. आजवर कागदावर आखलेली आणि कौशल्याने लोकांना पटवून दिलेली योजना प्रत्यक्षात आणावयाची होती. आमच्याजवळ पाणी आहे, ऊसउत्पादनाला योग्य अशा जमिनी मिळविल्या आहेत, साखर ही रोजच्या गरजेची गोष्ट असल्याने बाजार खुला आहे हे सांगणे व प्रत्यक्ष साखरेचे पोते आणून दाखविणे यात खूपच अंतर होते. आगाशेसाहेब जवळजवळ रोज बोरगावला जाऊ लागले. पुण्यातील कचेरीचे काम, सर्व व्यवहार सांभाळायचे, पैशाची व्यवस्था करायची व हे सर्व करून पुण्यापासून ११० मैल दूरचा प्रवास करायचा आणि तोसुद्धा रात्री-बेरात्री, कच्चे रस्ते, वाटेत कोणतीही सुविधा नसताना ! पण कारखाना-उभारणीच्या ध्येयापुढे त्यांनी कोणत्याही त्रासाची, कष्टाची तमा कधी बाळगली नाही. आगाशेसाहेब एखाद्या सेनानीसारखे त्या माळरानावर उभे राहत. कामाची आखणी करून सर्व तंत्रज्ञांना सूचना देत. मशिनरी उभी राहीपर्यंत व उसाचे पीक तयार होऊन त्याची साखर तयार होईपर्यंत आगाशेसाहेबांनी अविश्रांत श्रम केले. बोरगावला श्री. काकांचेही तसेच. शेतीची व्यवस्था पाहणे, फॅक्टरीच्या उभारणीच्या कामावर देखरेख करणे, कामगारांच्या अडचणी निवारून कामात खंड पडू न देणे ह्या सर्व गोष्टींसाठी ते भक्कमपणे उभे होते.

आगाशेसाहेब व काका पाच-पाच, सहा-सहा तास कामावर उभे असत. त्या सर्वांचे श्रमसाफल्य म्हणजे १९३९ च्या मार्चमध्ये बृहन्महाराष्ट्राच्या साखरेचा पहिला हंगाम सुरू झाला. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या स्वदेशी, मराठी माणसाच्या बळावर, मध्यमवर्गीयांच्या भांडवलावर शुभ्र दाणेदार साखरेची निर्मिती झाली. कारखान्याच्या साखरेचा ब्रॅण्ड 'श्री' असा ठरविण्यात आला. बोरगावचे नाव 'श्रीपूर' झाले. 'श्री' हा ब्रॅण्ड ठरविण्यात पण आगाशेसाहेबांनी खूपच औचित्य साधले आहे. कारण 'श्री' हे केवळ अक्षर नाही किंवा शब्दही नाही. 'श्री' ही सुसंस्कृत समाजाला नित्य नवीन प्रेरणा देणारी संकल्पना आहे.

'श्री' ह्या शब्दात मांगल्य आहे, पावित्र्य आहे, ऐश्वर्य आहे, वैभव आहे; परंतु त्याहीपेक्षा अधिक म्हणजे प्रत्येक व्यक्तीला व संपूर्ण समाजाला चैतन्य देणारी अशी महाप्रचंड शक्ती आहे. 'श्री'मुळे प्रतिष्ठा लाभते, 'श्री' म्हणजे लक्ष्मी, म्हणजेच समृद्धी. 'श्री'मुळेच मांगल्याचा उद्घोष होतो. 'श्री'मुळेच लक्ष्मीच्या पाऊलखुणांचा साक्षात्कार होतो. 'श्री' या अक्षरात प्रबोधन आहे. मनातील निराशा, अशुभता, अमंगलता पळून जाते, प्रसन्नतेची बैठक मनात घातली जाते. 'श्री' या अक्षरात लक्ष्मीच्या नूपुरांची मंदकोमल नादमाधुरी व सरस्वतीच्या वीणेचा झंकार आहे. 'श्री' म्हणजे जे जे सुंदर, उदात्त, उत्कट व कांतिमान, गतिमान ते ते सर्व ! अशा 'श्री'चा साखरेचा ब्रॅण्ड ठरविण्याची कल्पना म्हणजे आगाशेसाहेबांच्या बुद्धिमत्तेचा एक पैलूच होय. अशा सुंदर साखरेचे पोते पंढरपूरच्या पांडुरंगाला अर्पण करावयाचे होते. खरेच, असा विचार येतो की माझे वडील, काका व इतर सहकारी साखरेचे पोते घेऊन पंढरिनाथाला अर्पण करावयाला, त्यांच्या यशाचा नैवेद्य दाखवायला गेले होते, तेव्हा त्यांना केवढा आनंद झाला असेल ! त्या राजस, सुकुमार, मदनाचा पुतळा अशा पांडुरंगासमोर नतमस्तक होताना आनंदाश्रूंचा पूर वाहिला असेल. तो सोहळा अवर्णनीय व शब्दातीत आहे. त्यांच्या विनम्र स्वभावाप्रमाणे पांडुरंगाला हात जोडून ते म्हणाले असतील,

इवलेसे रोप लावियेले दारी ।
त्याचा वेलु जाये गगनावेरी ।।

# बिकट वाट वहिवाट

१९३८ ते ४० हा बृहन्महाराष्ट्राच्या यशाचा काळ होता. हंगाम चांगला चालला. मशिनरी उत्तम काम देऊ लागली. १९३९ च्या ऑगस्टमध्ये कंपनीची जाहिरात होती, त्यामध्ये 'स्वाभिमानी महाराष्ट्र' असे शीर्षक दिले होते. १९४० च्या हंगामात बारा लाख रुपयांची साखरउत्पादनाची हमी देण्यात आली होती. 'चंद्रशेखर आगाशे' यांच्या उपक्रमाचे कौतुक होऊ लागले होते. अशा यशाच्या पार्श्वभूमीवर २३ जानेवारी १९४० रोजी कंपनीची वार्षिक सभा पार पडली. त्यापूर्वी मराठी माणसाच्या स्वभावाप्रमाणे थोड्याफार शंकाकुशंका उमटत होत्याच; पण आगाशेसाहेबांच्या ठेवी घेण्याच्या कल्पनेला यश आले होते. जानेवारीच्या कंपनीच्या सभेचे वृत्त केसरीत पुढीलप्रमाणे प्रसिद्ध झाले होते.

"कंपनीच्या भागधारकांना कंपनीच्या व्यवहारासंबंधी काही माहिती हवी असल्यास डिसेंबरात तहकूब केलेली ही सभा भरून कंपनीचा ताळेबंद, संचालकमंडळाच्या कामकाजाचा अहवाल, नफातोटापत्रक एकमताने मंजूर झाले, हे ऐकून कंपनीच्या हजारो हितचिंतकांना आनंद होईल यात शंका नाही. कंपनीच्या संचालक-मंडळातर्फे प्रा. वामनराव काळे प्रभृतींनी सर्व प्रकारची माहिती देऊन कंपनीच्या कारभारात आक्षेपार्ह काहीही नाही अशी ग्वाही दिली. आश्वासन असे दिले की– कंपनीचा कारभार दिवसेंदिवस अधिक कार्यक्षम व नमुनेदार ठरेल. कारभारातील साधे तपशिलाचे

मतभेद उघडयावर आले, याबद्दल खेद व्यक्त झाला. पण वाइटातून चांगले निघते त्याप्रमाणे सर्वांचे समाधान होऊन संचालकमंडळ व ऑडिटर यांच्या नेमणुका एकमताने झाल्या व सर्वत्र समाधानाचे वातावरण निर्माण होऊन सभा संपली. कंपनी तावून सुलाखून निघाली. एका दृष्टीने फायदाच झाला. मध्यमवर्गीयांच्या भांडवला-वर निघालेल्या या कंपनीच्या संचालकमंडळावर सर्वश्री वामनराव काळे, दिवाणबहादूर लिमये, तांबे, रामभाऊ अभ्यंकर, बाबुराव साळवेकर, सोहोनी व जगन्नाथ महाराज पंडित यांसारखे नामवंत गृहस्थ आहेत. ही सर्व मंडळी कंपनीच्या उत्कर्षासाठी कसून प्रयत्न करतील आणि भागधारकांच्या हिताला जपतील. महाराष्ट्रीय जनता आपल्या परीने कारखान्याला हरतऱ्हेची मदत करेल असा विश्वास वाटतो." (केसरी ता. २३-१-१९४०)

पाच वर्षे अविश्रांत, जवळजवळ एकाकी प्रयत्न करणाऱ्या, कंपनीचे मॅनेजिंग एजंट 'श्री. चंद्रशेखर आगाशे' यांच्या कामाचे, श्रमाचे आणि ज्ञानाचे हे यश होते. या सभेनंतर नेहमीच्या रिवाजा-प्रमाणे आळंदीला जाऊन ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणांशी नत-मस्तक होऊन पुढच्या कार्यासाठी माझ्या वडिलांनी आशीर्वाद मागितला असेल. आता यानंतर अडीचशे टनांच्या कारखान्याचे रूपांतर हजार टनांच्या कारखान्यात करावयाचे होते. त्या मार्गातील अडचणी आणि संघर्ष नेहमीप्रमाणेच यांना सामोरे जावयाचे होते.

कारखान्याच्या दृष्टीने हा काळ जरा संथ होता. युद्ध सुरू होते. कारखान्याची वाढ करायची मनीषा असली तरी परिस्थिती अनुकूल नव्हती. परकीय सरकार प्रथमपासूनच प्रतिकूल, साखर-उद्योग वाढू नये या धोरणाचे. त्या वेळी मोजके दहापाच कारखाने होते. तेही तीन-चारशे टनांचे गाळण करणारे.

कंपनीच्या यशदायी काळात कारखान्याला दोन अडचणींतून जावे लागले. एक म्हणजे सरकारने घातलेली गूळबंदी. साखर-कारखान्याची मशिनरी फक्त अडीचशे टनांची. उसाचे क्षेत्र मोठे

व ते सदैव वाढविण्याची महत्त्वाकांक्षा. गाळप न होणाऱ्या जास्तीच्या उसाचा कंपनी गूळ करीत असे. पण १९४३ मध्ये मुंबई सरकारनें गूळबंदी केली. या कारखान्याला आपल्या उसाची साखरच करण्याची सक्ती केली. त्या आदेशावर स्वाक्षरी आहे श्री. स. गो. बर्व्यांची. ते मुंबई सरकारमध्ये सचिव होते. स्वातंत्र्यानंतर मात्र याच बर्वेसाहेबांनी महाराष्ट्रात उद्योगधंदे वाढावेत म्हणून अनेक बंधने शिथील केली. पण तत्पूर्वी कंपनीचे नुकसान व्हायचे ते होऊन गेले. दुसरे नुकसान म्हणजे बोजा अन्नधान्य पिकविण्याचा. युद्धकाळात धान्याची टंचाई होती. कृष्णा, गोदा, नीरा नद्यांच्या परिसरातल्या रयतेला ज्वारीऐवजी अमेरिकन मिलो खावा लागत होता. त्या वेळी सरकारने हुकूम जारी केला की, साखरकारखान्यांनी उसाखालच्या जमिनीव्यतिरिक्त जी जमीन राहील त्यात अन्नधान्य पिकविले पाहिजे. बृहन्महाराष्ट्राला या हुकुमाचा फार मोठा फटका बसला. अन्नधान्याला बाजारात भाव नाही व त्याचा खर्च मात्र ऊसउत्पादनासारखा होत होता. दरसाल नुकसानी येत होती. कंपनीचा ताळेबंद नुकसानीत दाखविला तर भागधारक रागावणार व ठेवीदारांच्या विश्वासाला तडा जाणार. यामुळे आगाशेसाहेबांची किती कठीण परिस्थिती झाली याची कल्पना करवत नाही. 'आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना' अशी अवस्था. त्यातून बाहेर पडण्याचा काहीतरी मार्ग तर काढावयास हवाच होता. म्हणून त्याला पर्याय म्हणून 'लक्ष्मी-नारायण शेतकी संघ' नावाची संस्था उभी केली. तिचे प्रमुख आपले बंधू – माझे काका यांना नेमले. बिगर उसाची, तोट्याची शेती करावयास सांगितली आणि सरकारी आज्ञा पाळली. वचन असे की आज या संघाला येणारा तोटा पुढे गूळबंदी उठली किंवा कारखान्याची गाळणशक्ती वाढून कारखाना फायद्यात आला की तुमचा तोटा भरून देऊ.

त्या वेळी जर हा संघ काढून, त्याचे येणे दाखवून, ताळेबंद नफ्यात दाखवून डिव्हिडंड वाटले नसते तर हा मराठी माणसाने काढलेला मराठी मालकीचा 'बृहन्महाराष्ट्र' कारखाना कुणा

धनिकांच्या हातात गेला असता, त्याच्या मालकीचा झाला असता. दुःखाची गोष्ट अशी, मराठी माणसाच्या कोत्या मनोवृत्तीमुळे याच गोष्टीचे विरोधकांनी भांडवल केले व आगाशेसाहेबांना अतिशय त्रास दिला, अक्षरशः छळले.

१९४५ मध्ये संघाच्या नावाने सिंडिकेटने १६,७९,२१९ रु.ची रक्कम लिहिली. सदर रक्कम येणे या सदरात ताळेबंदात दाखविली आहे. सिंडिकेटने जमिनी परत घ्यावयाच्या व सदर रकमेचा दुबेरजी जमाखर्च करावयाचा. कराराची मुख्य शर्त सिंडिकेट उसाकरिता जमिनी संघाकडून घेईल त्या वेळी बांध-बंदिस्ती, खते वगैरेंवर संघाचा झालेला खर्च कंपनी संघास देईल. ही शर्त १९४५ च्या वार्षिक सभेत भागधारकांना कळविली आहे व नंतर अहवाल, ताळेबंद, नफा-तोटापत्रक भागधारकांनी मंजूर केले आहे.

१९४५ मध्ये भरलेल्या भागधारकांच्या सभेत कंपनीचे त्या वेळचे अध्यक्ष श्री. जगन्नाथ महाराज पंडित यांनी "मुंबई सरकार-बरोबर झालेल्या पाण्याच्या करारात उसाचा गूळ करण्याची परवानगी आहे, तरीदेखील भारत संरक्षण कायद्याखाली गूळ करण्यास बंदी घालण्यात आली. ही गूळबंदी आणि साखर करण्यात अडचण म्हणजे आपली यंत्रसामग्री लहान, कमी क्षमतेची. दुसरे म्हणजे, सरकारची अधिक धान्य पिकविण्याची सक्ती. या सर्वांचा कंपनीवर फार मोठा अनिष्ट परिणाम झाला आहे. गूळ करण्यास यापुढेही परवानगी मिळेल असे वाटत नाही. तेव्हा जास्त क्षमतेची यंत्रसामग्री मागविणे हा एकच मार्ग कंपनीपुढे आहे" असे मत प्रतिपादन केले. हप्त्याहप्त्याने यंत्रसामग्रीची शक्ती न वाढविता एकदमच मोठ्या क्षमतेची यंत्रसामग्री आणण्याचा विचार ठरून खटपटीस सुरुवात झाली. या खटपटीला यश येऊन मुंबई सरकारकडून दोन हजार एकर उसाला पाणी व शिवाय पाझराचे पाणी वगैरे सवलती मिळाल्या. रोज एक हजार टन ऊस. गाळण-शक्तीची यंत्रसामग्री आयात करण्याचा परवाना आला.

नवीन यंत्रसामग्रीमुळे पूर्वीपेक्षा तिप्पट म्हणजे साठ लाखांची साखर तयार होणार होती. त्यामुळे साखरेचा उतारा वाढेल, खर्चाची बाजू बचतीची होईल आणि नफ्याचे प्रमाण वाढेल असा विचार व अशी योजना होती.

या नव्या यंत्रसामग्रीची ऑर्डर देण्यापूर्वी कंपनीचे सध्याचे भागधारक व त्यांचे मित्र यांनी बेचाळीस लाखांचे शेअर्स घेतलेले असले पाहिजेत अशी अट सरकारने घातली. आगाशेसाहेबांनी विद्यमान भागधारकांना शेअर्स घेण्याबद्दल कळविले. परंतु शेअर्स नकोत, ठेवी घ्या असे भागधारकांनी सांगितले. शेवटी खुद्द आगाशेसाहेबांना स्वतःच्या नावाने आठ लाख रुपयांचे शेअर्स घ्यावे लागले. एवढे पैसे तर स्वतःजवळ नव्हतेच, पण परत या नव्या उभारणीकरिता इतरांकडून कर्ज काढले व स्वतः शेअर्स खरेदी केले. काही ठेवीदारांना लेखी आश्वासन दिले की, "आपल्या ठेवींचे शेअर्स आज तुम्ही घ्या. उद्या म्हणजे नव्या यंत्रसामग्रीच्या उभारणीनंतर त्याचे रूपांतर तुम्हाला परत तुमच्या ठेवीत मी करून देईन."

साहजिकच, आगाशेसाहेबांच्या नावावर कंपनीच्या कागदपत्रांत लाखो रुपयांचे शेअर्स दिसले, आणि आपल्या या शेअर्सच्या मताचे दडपण आणून आगाशेसाहेब संचालकांकडून हवे ते काम करवून घेतात असा खोटा आक्षेप वाद व वादळ निर्माण करणाऱ्या विरोधकांनी घेतला. परंतु आगाशेसाहेबांनी कोणत्याही गोष्टीचा बाऊ न करता प्रयत्न चालू ठेवले. १९३९–४० प्रमाणेच आगाशे-साहेबांच्या जीवनात १९५० ला अतिशय महत्त्व आहे. त्या काळात त्यांच्या स्वप्नाचा दुसरा टप्पा म्हणजे रोज एक हजार टन ऊस गाळणारी यंत्रसामग्री श्रीपूरला उभारणे. ती आणताना त्यांना फारसे आर्थिक श्रम किंवा त्रास झाला नाही. कारण भाग-भांडवला-ऐवजी कारखाना ठेवींवर उभा राहू शकतो हे त्यांनी सिद्ध केले होते. या वेळी तर आगाशेसाहेबांच्या नुसत्या केसरीतल्या जाहिरातीवर ठेवींचा अक्षरशः पाऊस पडत होता. साठ-सत्तर लाखांच्या ठेवी मिळाल्याच होत्या. पुढे तर त्यांचा आकडा एक

कोटीच्या पुढे गेला होता. आणि यातूनच नवी हजार टनी यंत्रसामग्री पूर्णपणे ठेवींच्या निधीतून उभी राहिली.

पहिल्या माधवराव पेशव्यांच्या जीवनाचा मोठा भाग लढा आणि लढायांनी भरलेला आहे. तीच अवस्था आगाशेसाहेबांनी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट काढून करून घेतली होती. परंतु त्यात त्यांना आनंद होता. महाराष्ट्रात कारखानदारीच्या पाया-भरणीचा अभिमान होता. आपल्या शक्तीला व बुद्धीला आव्हान निर्माण करून ते पेलण्याचा त्यांचा स्वभाव होता.

आर्थिक अडचणी सततच्या होत्या. विरोधकांशी लढा ही बाब नित्याचीच होऊन बसली होती. परंतु त्यांना एकच आस होती. महाराष्ट्राच्या उद्योगाच्या यशोमंदिराचा कळस झगमगताना त्यांना दुरून दिसत होता. प्रयत्नांची पराकाष्ठा चालूच होती. त्यांचा 'खजांची' पंढरपुरात सदैव त्यांची पाठराखण करीत उभा होता. पण यशोमंदिरापर्यंतची वाट कधी संपणार? अनेक अडचणींच्या खाचखळग्यांची, विरोधकांच्या दुस्तर पत्थरांची, अनेक नागमोडी वळणांची ही वाट संपता संपेना! एक अडथळा दूर सारावा की दुसरे संकट समोर उभे ठाकलेच! आगाशे-साहेबांचे हृदय सिंहाचे. जंगलचा राजा थोडाच कोणाला भितो? कोणाच्या दयेची भीक पण तो कधी मागत नाही. स्वपराक्रमावर आपली शिदोरी तो मिळवितो. जग जिंकायला निघालेल्या नेपोलियनचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणारे आगाशेसाहेब दुप्पट उत्साहाने व आत्मविश्वासाने वाटचाल करीत होते. ती वाटचाल करीत असताना त्यांच्या मनात असे आले असेल का?!

दिस येतील, दिस जातील
भोग सरेल, सुख येईल
मन बहरेल, न पडेल सुखाला खळ
दैवासंगे झुंजायचं देऊ त्याला बळ ।।

# 'आगाशे पॅटर्न' एक आवाहन

आगाशेसाहेबांचे उभे आयुष्य म्हणजे त्यांच्या प्रत्येक चांगल्या गोष्टीला प्रतिसाद तर नाहीच पण जबरदस्त विरोधाचे आग्या-मोहोळ! मधमाशी आणि आग्यामाशी या दोन्ही एकाच जातीतल्या, पण किती फरक! मधमाशी ही सतत उद्योगी. किती कष्टांनी, किती प्रयत्नांनी या फुलावरून त्या फुलावर अखंड प्रवास करत कणकण मध गोळा करते व आपल्या अतिशय निसर्गसुंदर पोळ्या-मध्ये साठवून ठेवते! मधाने भरलेले ते सुंदर पोळे म्हणजे मधुर रसभांडार, सर्वांना आनंद, सुख देणारे व मनुष्यप्राण्याला उपयुक्त. पण या आग्यामाशा, गांधिलमाशा त्याच्या उलट. फक्त डंख मारणे एवढेच काम. दुसऱ्याला चावण्यातच यांच्या आयुष्याचा आनंद. दुसऱ्याच्या वेदनेचे यांना कसले आलेय सोयरसुतक! एखाद्या निरपराधी माणसाला सुद्धा त्या मरणप्राय यातना देतात. वास्तविक, तो त्याच्या सरळमार्गाने जात असतो. काही कारण नसताना या गांधीलमाशा त्याला पटकन डंख करून जातात. तसेच आगाशेसाहेबांनी रक्ताचे पाणी करून, रात्रंदिवस कष्ट करून सरळ मार्गाने हे 'बृहन्महाराष्ट्र'चे सुंदर शिल्प उभारले. स्वतःचे कर्तृत्व, कसब, बुद्धिमत्तेचे कौशल्य पणाला लावून सुमधुर, सुंदर असे जणू मधाचे पोळेच तयार केले. त्याचा लाभ आपल्या स्वकीयांना, महाराष्ट्राला व्हावा म्हणून, पण हे विरोधकांचे आग्यामोहोळ पिसाटासारखे सुसाट पसरले आणि त्यांनी संधी मिळेल तेथे विनाकारण डंख मारायला सुरुवात केली.

एकेकाच्या कुंडलीतच असे ग्रह असतात की काय कोण जाणे ! लहानपणीच नियतीने त्यांच्या सुखाशी विरोध करून पितृछत्र हिरावून घेतले. त्यातून ते बाहेर पडतात न पडतात तोच गरिबीच्या परिस्थितीने विरोध चालू ठेवला. पण या सर्व तऱ्हेच्या विरोधावर मात करून 'आगाशेसाहेब' आयुष्याची लढाई लढत होते. उसासाठी जमिनी घेताना शेजारच्या अकलूजच्या सासवड माळी शुगर फॅक्टरीवाल्यांपैकी काही हितशत्रूंचा विरोध. ते म्हणत, "हा भट कसला कारखाना काढणार!" चितळे गूळ कारखान्यातील चितळे व त्यांचे एजंट यांच्या कारवाया. शेतकऱ्यांना उलट काहीतरी सांगून चिथावणी, पण आगाशेसाहेब व काका या दोघा बंधूंनी या कारवायांना दाद दिली नाही. याही अडचणीतून ते बाहेर पडले. जमिनी मालकी हक्काने व काही खंडाने घेऊन झाल्या. फॅक्टरी उभारणीची वेळ आली. भांडवलासाठी शेअर-विक्री. शेअर्ससाठी अनेक गावी, अनेक घरी हिंडत असताना लोक काहीही बोलत, अपमानास्पद पण बोलत. एक जण म्हणाले, "तुम्ही म्हणजे महाराष्ट्राचे प्रतिशिवाजीच लागून गेला की नाही ! निघाले मोठे महाराष्ट्राचा उद्धार करायला !" कोणी म्हणे, "कारखाना काढणे हे काय भटा-ब्राह्मणाचे काम आहे का ?"

चांगला माणूस हा चांगलाच असतो. कोणी त्याच्याशी वाकडे किंवा कसेही वागले तरी त्याच्या चांगलेपणात काही फरक पडत नाही. त्यांच्याच आयुष्यातले हे उदाहरण आहे. त्यांचे काका— श्री. विष्णुकाका यांच्याशी मांगदरीच्या जमिनीवरून वाद होता. त्यांच्याशी दोन हात करावयाची वेळ आली. आगाशेसाहेब व काका वयाने लहान असल्यामुळे त्यांचे काका त्यांना जुमानीनात. ह्या जमिनीकरिता आगाशेसाहेब व काका यांना पुण्याहून मांगदरीला चालत जावे लागे. बरोबरची शिदोरी झाडाखाली बसून खायची व काकांशी सामना करायला तयार व्हायचे. पण पुढे हेच काका स्वर्गवासी झाले, तेव्हा त्यांच्या पत्नी गिरिजाकाकू यांना या आगाशेबंधूंनी आधार दिला. त्या काकूही स्वभावाने चांगल्या होत्या. त्यांना माझ्या वडिलांचा फार अभिमान होता, आम्हा

नातवंडांवर त्यांची फार माया होती. हे तर कौटुंबिक विरोधाचे उदाहरण, पण बृहन्महाराष्ट्राच्या कारकिर्दीतले विरोधक इतके अफलातून होते की त्याला तोड नाही !

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट हे आगाशेसाहेब स्वतःचे विशाल कुटुंब मानत व कुटुंबप्रमुखासारखी काळजी घेत. फॅक्टरीवर साहेबांना जेवढे समाधान व आनंद मिळे तेवढा आनंद पुण्याच्या कचेरीत मिळत नसे. संचालकमंडळापासून टंकलेखकापर्यंत तक्रारी, विरोध व कुरबुरी. त्यांचे स्वतःचे आप्त आणि कराचीपासूनचे स्नेही आणि कारखाना काढण्याच्या कल्पनेचे सहजनक श्री. परांजपे हे आगाशे-परांजपे संयुक्त मॅनेजिंग एजन्सी असताना, भागीदारी सोडून प्रतिस्पर्धी सासवड माळी शुगर वर्क्सकडे नोकर म्हणून गेले. मराठी माणसाची काय ही प्रवृत्ती ! मराठी माणसाचा स्वार्थही अल्प आणि धाडसही कमी, व दुसऱ्याच्या यशाचा हेवाही तितकाच. श्री. परांजपे प्रतिस्पर्धी कारखान्यात एक सेवक म्हणून गेल्याची खंत माझ्या वडिलांसारख्या स्वयंप्रज्ञेच्या माणसाला वाटणारच. हाही विरोधाचाच एक प्रकार. श्री. परांजपे सोडून गेल्यामुळे पुण्यामध्ये पैसा उभा करण्याचे जिकिरीचे काम माझ्या वडिलांवर एकट्यावर पडले.

बृहन्महाराष्ट्राच्या संचालकमंडळात कंपनीचे यशाचे सारे श्रेय हे 'आगाशेसाहेब' या व्यक्तीला मिळते, उद्या आर्थिक लाभही त्यांनाच जास्त मिळणार. आपल्याला त्यातले काहीतरी हवे ही भावना संचालकमंडळातील काही मोजक्या व्यक्तींमध्ये हळूहळू मूळ धरू लागली. 'मला पगारवाढ मिळाली नाही तर पाहून घेऊ' असे म्हणणारे एक सेवकही निघाले; आडनाव संत पण वृत्ती मात्र... ही दुफळीची बेणी पुढे त्रासाची व कटकटीची बीजे ठरली; आणि आगाशेसाहेबांच्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्यांना अतिशय त्रास सहन करावा लागला. ही कंपनी चालू करण्याचे ठरल्यापासून तिच्या मार्गातील अडचणी दूर सारायला एकजण पुढे सरसावल्यावर त्याला नाउमेद करावयास दहाजण सरसावावेत तसाच प्रकार होता. हा सर्व 'उद्वेगजनक' प्रकार होता.

ही कंपनी यशस्वी झाल्यास ज्यांच्या मक्तेदारीला किंचित आळा पडेल अशा मंडळींनी तर या कंपनीला व धोरणाला विरोध केलाच, पण त्याहून खेदाची गोष्ट अशी की, ज्यांचा अर्थाअर्थी या कामात नफातोटा काहीही नव्हता, अशांनीही निष्कारण विरोध आरंभिल्यामुळे सिंडिकेटचे काम अतिशय जिकिरीचे व दुर्घट झाले.

विचारी माणसांना आगाशेसाहेबांचे ठेवींबद्दलचे धोरण व म्हणणे पटत होते. त्यामुळे आस्ते आस्ते भांडवल जमत होते. भागभांडवलविक्री होऊन पुरेसे भांडवल जमेपर्यंत कारखाना उभारण्याचे तहकूब केल्यास नुकसान होईल हे जाणून भरपूर व्याज देऊन ठेवी घेण्याचे धाडस आगाशेसाहेबांनी केले. अशा तऱ्हेने भागभांडवलविक्री व ठेवी मिळून रक्कम उभी राहिली. उत्पादन सुरू झाले. सर्व सुरळित चालत होते तर काही लाभाकांक्षी मंडळींनी विरोधाची बीजे पेरण्यास सुरुवात केली. त्यालाही या सर्व व्यापाचे चालक-मालक नव्हे तर विश्वस्त असे आगाशेसाहेब उत्तरे देत असत. केसरीत जाहिरातीद्वारे ठेवीदार व भागधारक यांना दिलासा देत. पण हे सर्व शेवटी एकट्यानेच सांभाळायचे ! त्यांच्या त्रासात कोण भागीदार थोडेच होणार होते ! विरोधाच्या, निराशेच्या किंवा अपयशाच्या प्रसंगी ते गडबडून जात नसत. अतिशय धीरोदात्त असा त्यांचा स्वभाव होता. त्यांनी आपल्या जीवनात सुखसमाधान, सौंदर्यदृष्टी व चांगल्या गोष्टींचा उपभोगही घेतला. परोपकारवृत्ती तर होतीच. त्यांनी हजारो, लाखो रुपयांच्या देणग्या दिल्या. सर्व देणग्या नुसत्या दयेपोटी दिलेल्या नाहीत तर प्रत्येक ठिकाणी सदिच्छा व सद्हेतूने दिलेल्या आहेत.

बृहन्महाराष्ट्राच्या घटनेतील धोरणाप्रमाणे कंपनीला फायदा झाल्याबरोबर त्यांनी कॉमर्स कॉलेज काढण्याकरिता दोन लाख रुपयांची देणगी दिली. त्याला स्वतःचे नाव न देता ' बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स ' असे नाव दिले. या देणगी देण्यामागे इच्छा हीच की, महाराष्ट्र उद्योगात पुढे यावा, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना त्याचे चांगले ज्ञान मिळावे. दुसरी महत्त्वाची देणगी ' बृहन्महाराष्ट्र भुवन ' दिल्ली येथे एक लाख रुपये देऊन. आज नव्या दिल्लीत ही

इमारत उभी आहे. महाराष्ट्रापासून दूर असलेल्या दिल्लीसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी कामानिमित्त अनेकांना जावे लागते, तेव्हा त्यांची राहावयाची, उतरावयाची चांगली सोय व्हावी म्हणून त्यांनी 'बृहन्महाराष्ट्र भुवन' ही वास्तू उभी केली. त्यात श्री. काकासाहेब गाडगीळ यांचा खूपच सहभाग मिळाला. तिसरी मोठी देणगी सांगलीच्या इंजिनियरिंग कॉलेजची. त्यालाही बृहन्महाराष्ट्राचे नाव द्यावयाचे ठरले होते. पण माझ्या वडिलांनीच श्री. वालचंद हिराचंद शेठ यांना सांगितले की, पुढे पैसे लागल्यास आपणच देऊ शकाल, तेव्हा आपले नाव द्यावे. तेच 'वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली' हे होय. आगाशेसाहेब स्वत:कडे असे लहानपण घेत असत. स्वत:कडे लहानपण घेणे हे एवढे सोपे नाही.

आपण या जनसागराच्या सिंधूतला एक बिंदू आहोत ही त्यांची भावना होती. त्यामुळे नित्य जीवन जगत असताना कोणतेही अनित्य असेही कर्तव्यपालन करताना कधीही माघार घेतली नाही. रुपये आणि पैसे यांच्या पलीकडे एक तृप्ती दडलेली आहे, आणि ती पैशाने कधीच विकत घेता येत नाही, याचा साक्षात्कार त्यांना नेहमीच होत असे.

त्यांनी वैयक्तिकही अनेक देणग्या दिल्या. माझ्या निवर्तलेल्या भावाच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुण्याच्या नवीन मराठी शाळेत 'रंगनाथ पुष्करणी' नावाची पाण्याची पुष्करणी बांधून दिली. वेदाभ्यासाला चालना मिळावी यासाठी 'कौशिक व्याख्यानमाला' दहा हजार रुपये देणगी देऊन सुरू केली. आजोळी आधार मिळाला म्हणून त्यांच्या नावे (माझी आजी) अहिल्यादेवी हायस्कूल, पुणे येथे दोन वर्ग बांधण्याकरिता देणगी दिली. वाङ्मयाची भरभराट व्हावी, लोकांना चांगले वाङ्मय वाचावयास मिळावे म्हणून पुणे मराठी ग्रंथालय येथे त्यांच्या आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ रु. ५०००/- ची देणगी कंपनीने दिली आहे. अशा अगणित देणग्या चांगल्या कामासाठी त्यांनी दिल्या. त्यावरही विरोधक टीका करीत होते. 'हे स्वत:चा उदोउदो करून घेण्यासाठी या देणग्या देतात' अशीही

मुक्ताफळे विरोधकांच्या तोंडून निघत, पण बहुतेक देणग्यांतून त्यांनी स्वतःच्या नामोल्लेखही केलेला नाही.

वस्तुस्थिती अशी आहे की, लहानपणापासून त्यांना स्वतःला गरिबी आणि गरज ही काय चीज आहे याची जाणीव होती. एखादा गरिबी काढलेला माणूस श्रीमंती आल्यावर समाजावर सूड उगवतो, त्याला मिळालेल्या हीन दर्जाच्या वागणुकीचा वचपा काढतो. पण आगाशेसाहेब या सर्व गोष्टीला अपवाद होते. आपल्याला झाला तसा त्रास कोणाही गरीब माणसाला होऊ नये ही त्यांची वृत्ती होती. त्यामुळे अनेक गरीब विद्यार्थ्यांना, गरजू लोकांना त्यांनी सढळ हातांनी व झाकल्या मुठीने मदत केली आहे. ते म्हणत असत, " मला पैशाचा झरा सापडू दे, की मी त्याची पाणपोई घालीन."

आगाशेसाहेबांची राहणी चांगली होती. व्यवस्थित पोशाख, घरातही समृद्धीचे वातावरण. माझी आजी व आई या दोघीही संसारदक्ष. त्यामुळे कुठेही कमतरता दिसणार नाही, व जे करावयाचे ते व्यवस्थित, उच्च अभिरुचीचे, दिलदार वृत्ती ठेवून, निरपेक्ष वृत्तीने. वकिली असल्यापासूनच मोटार वगैरे घेतलेली होती. पण विरोधक मात्र 'आगाशे कंपनीच्या पैशाची उधळपट्टी करतात, चैन करतात' असा गैरसमज पसरवीत असत. आगाशे-साहेबांना त्रास देण्याची एकही संधी विरोधकांनी सोडली नव्हती. विशेषतः जी मंडळी अशा कारखानदारीच्या उभारणीत नाममात्र होती, त्यांना या समृद्धीचा वाटा कधी व कसा मिळेल याचीच ओढ लागलेली होती. कंपनीच्या १९४३ ते ४८ पर्यंतच्या वार्षिक सभा पाहिल्या तर भट, तांबे, बर्वे ही मंडळी स्वतःचे फक्त एक-दोन शेअर्स, पन्नास-शंभर रुपये फक्त गुंतविले असताना, 'चिंता वाहतो विश्वाची' असा आव आणून कंपनीच्या कारभारावर टीका करीत. त्यांचा हा वार्षिक उद्योगच होता. सभेत काहीतरी फालतू प्रश्न काढायचे, भागधारकांना, ठेवीदारांना उलट सांगून बिथरवायचे असले यांचे उद्योग. आगाशेसाहेबांना मिळणारा पगार, कमिशन, गाडी आणि मुख्य म्हणजे मालक ह्या दृष्टिकोनातून

त्यांना मिळणारा मान हे सर्व ह्या मंडळींच्या डोळ्यात सलत असे; व आपल्याला काही लाभांश नाही याची खंत या खोडसाळ मंडळींना होती. पण कर्तृत्वाला मान असतो हे ह्या दुष्टप्रवृत्तीच्या व अकर्तृत्ववान माणसांना कसे कळणार? आगाशेसाहेबांनी सुरुवातीची दहा-बारा वर्षे कंपनीच्या उभारणीसाठी केलेले कष्ट यांना आठवत नाहीत, ते हे विसरतात, नव्हे विसरण्याचे सोंग करतात. त्यातच कंपनी सोडून गेलेला संत नामक स्वतःच्या आडनावाला काळिमा लावणारा एक टंकलेखक त्यांच्या गोटात सामील होतो आणि त्या विरोधाला आणखीनच खतपाणी घालतो, अशी स्थिती होती. आगाशेसाहेबांचे यश हाच या विरोधकांचा हृद्रोग होता.

'आगाशे पॅटर्न' म्हणून रूढ असलेल्या ठेवींवर कारखाना उभा करण्याच्या प्रयत्नांना तात्त्विक व रूढ आर्थिक नीतीचा आधार घेऊन विरोध करणारे प्रा. पी. एस. लिमये व त्यांचे मित्र यांच्याशी झगडावे लागले. या लोकांचा सारखा आक्षेप की, लिमिटेड कंपन्या ह्या भाग-भांडवलावरच निघू शकतात, ठेवी घेणे हे अशास्त्रीय आहे; कंपनीला कसलेही तारण नसताना जर कंपनी डबघाईस आली तर ते साफ बुडतील. म्हणून एक कोटीच्या वर ठेवी घेणे धोक्याचे आहे व अशास्त्रीय आहे. आगाशेसाहेबांनी या सर्व आक्षेपांना सविस्तर उत्तरे दिली. केवळ उत्तरे दिली एवढेच नव्हे, तर या सर्व त्रासातून कंपनीची सदैव भरभराटच केली. कोणीही ठेवीदार बुडाले नाहीत व भागधारकांचा तोटाही झाला नाही.

कंपनीच्या नोकरीतून बाहेर पडलेल्या संत नावाच्या टंक-लेखकाने 'आगाशेसाहेबांनी लाखो रुपयांचा अपहार केला' असा आरोप केला. आठ लाखांचे शेअर्स त्यांच्या नावावर आहेत एवढीच माहिती असणाऱ्या माणसांना ते खरेही वाटणे स्वाभाविक होते. पण आगाशेसाहेबांना तेवढेच कर्ज आहे आणि ज्या मंडळींनी हा अपप्रचार चालविला होता, त्यांच्याकडूनच कर्ज घेतलेले आहे हे कळल्यावर ठेवीदार व इतर भागधारकांमध्ये हा अपप्रचार

करणाऱ्यांबद्दल चीड निर्माण होई. १९५४ मध्ये या प्रकरणातील श्री. तांबे व श्री. भट यांनीच आपणांस कर्ज म्हणून रक्कम कशी दिली व त्यांचे कर्ज फेडण्यासाठी दुसऱ्या फरवानी नावाच्या सिंधी माणसाकडे आपणाला कसे जावे लागले, याचे निवेदन आगाशे-साहेबांनी भागधारकांना पाठविले. याच भट आणि तांबे यांनी आगाशेसाहेबांना सांगितले की, "दहा टक्के नफा देण्याची तुमची खात्री आहे तर आमच्याकडून तुम्ही कर्ज घ्या, व्याज द्या आणि मुद्दल(कर्ज) तुम्हीच फेडा." ही कर्जे आगाशेसाहेबांनी १९४४–४५ मध्ये घेतली. त्यावर भट व तांबे यांना भरपूर व्याज दिले. आगाशेसाहेब आपल्या नाममात्र नावावर असलेल्या शेअर्सच्या बळावर संचालकमंडळावर कधीच दडपण आणीत नसत. म्हणून तर हे सदैव खोटे दोषदर्शन हे कर्तव्य मानणारे भट आणि तांबे कंपनीच्या संचालकमंडळावर बारा वर्षे राहू शकले.

१९५४ मध्ये हे आरोप करणारे तांबे व भट यांनीच अनुक्रमे तीन लाख बेचाळीस हजार व सत्तर हजार रुपयांचे कर्ज आगाशे-साहेबांना दिले आणि ते शेअर्स तुमच्या नावावर घ्या, आम्हाला धोका (शेअर्सचा) नको असे वर सांगितले.

संतमहाशयांनी आगाशेसाहेबांना थोडच्या मुदतीसाठी कर्ज देणाऱ्या श्री. फरवानी नावाच्या सिंधी माणसाला कळविले की, "मुंबईच्या एका व्यापाऱ्याने आगाशेसाहेबांनी त्याचे देणे दिले नाही म्हणून कंपनी गुंडाळण्याचा अर्ज मुंबई उच्च न्यायालयात केला आहे; ही माहिती आपणास मी अगदी विश्वासाने देत आहे." फरवानींना या टंकलेखकाचा सल्ला असा की, "तुम्ही आगाशे यांना उसने दिलेले दोन लाख रुपये धोक्यात आहेत, ते त्वरित वसूल करा." सावकार फरवानी हे अनुभवी. तेव्हा त्यांनी तेच पत्र आगाशेसाहेबांकडे पाठवून दिले. तेव्हा कंपनीने संत यांना कंपनीच्या अब्रुनुकसानीच्या दाव्याची नोटीस, पुण्यातील प्रसिद्ध फौजदारी वकील श्री. व. ना. भिडे यांच्या सहीनें दिली. तेव्हा हा मामला आपोआप थंडावला.

सर्व कांगाव्याचे प्रकार चालू होते. आगाशे कंपनीला लुटतात, जमिनी घेतात, आरामात राहतात, गाड्या उडवितात; ही कंपनी बुडणार, तेव्हा आगाशे यांना हाकलले पाहिजे असा अपप्रचार. आगाशेसाहेबांचे आयुष्य निष्कलंक असताना देखील त्यांच्या चारित्र्यहननाचे दुष्ट प्रकार आणि उद्योग ह्या मतलबी लोकांनी आरंभिले होते. ह्या संतमहाशयांनी 'प्रभात' वृत्तपत्रातून लेख लिहिले की, कंपनी तोट्यात असूनसुद्धा भागधारकांना नफा वाटला. संत म्हणतात त्याप्रमाणे ही भागधारकांची फसवणूक नव्हती तर त्यांना दिलेला विश्वास होता की, तुमची कंपनी शेवटी फायद्यातच येणार आहे. ठेवी मिळण्याच्या मागेदेखील आगाशे-साहेबांनी दिलेला विश्वासच कारणीभूत होता. आगाशेसाहेबांनी उत्पादन सुरू होईपर्यंत विनावेतन काम तर केलेच, पण नंतरही भागीदारांना किमान सव्वासहा टक्के डिव्हिडंड देण्याची परिस्थिती आल्यावाचून वेतनाव्यतिरिक्त फायद्यावर कमिशन न घेण्याचा त्यांनी कंपनीशी करार केला. इतर मॅनेजिंग एजन्सी करारांबरोबर तुलना केली तर आगाशेसाहेबांच्या त्यागवृत्तीचे मोल समजून येईल. पण विरोधकांजवळ त्यांचे मोठेपण समजण्याइतकी बुद्धी पाहिजे ना!

लक्ष्मी-नारायण संघाचा करार प्रा. लिमये व श्री. वर्वे ह्यांना माहीत असूनसुद्धा प्रत्येक वार्षिक सभेत त्यांनी तेच तेच प्रश्न विचारलेले आहेत. त्यांनी या विषयावर असे भाष्य केले आहे की, "आम्हाला हे सतरा लाखांचे देणे संशयास्पद वाटते, तेव्हा सरकारी इन्स्पेक्टर यावर काही प्रकाश पाडतील ते पाहावयाचे आहे." पण मूळ मुद्दा असा की, सिंडिकेट व संघ यांच्या करारात लवादाचे कलम आहे व लवादनिवाड्याप्रमाणे देण्याघेण्याची जबाबदारी ठरणार आहे. तेव्हा हा करार सरकारी इन्स्पेक्टर्स किंवा पोलिस यांच्या चौकशीचा विषय होत नाही. इतिहासातल्या माधवराव पेशव्यांच्या एका दुःखद अनुभवाची ह्या वेळी आठवण येते. ते आपल्याच घरातल्या भाऊबंदकीने वैतागले होते. राघोबादादांनी राज्याची वाटणी मागितल्याबरोबर माधवराव कडाडले होते की,

'राज्य कुणाचे? राज्य छत्रपतींचे, आपण त्यांचे कारभारी.' हा पेशवा प्रसंगी पुण्याच्या रयतेचे रक्षण करू शकला नाही. माधवरावांनी जातीने रयतेची चौकशी केली व नुकसानभरपाई देऊ लागले. शेजारी सखारामबापू होते. ते म्हणाले, 'सरकारी खजिन्याला अशी नुकसानभरपाई देणे परवडणार नाही.' माधवराव उत्तरले, 'आमची सर्व खासगी संपत्ती खर्ची घाला. रयतेचे रक्षण न करणाऱ्या राजाला या धनाचा अधिकार नाही.'

आगाशेसाहेब ज्या लोकांना आपले समजत होते, अशाच लोकांनी चालविलेल्या कारवाया व विरोध याला अतिशय वैतागले होते. ही सर्व कंपनीची देणी पाच वर्षात संपूर्ण परत करावयाची, ती कशी करणार हा मोठा बिकट प्रश्न प्रा. लिमये व बर्वे यांना पडला होता व त्यांनी तो भागीदारांपुढे मांडला. साखरविक्रीतून ठवी परत करून एक कोटी तीन लाखांच्या ठेवीचा बोजा ५९ लाखांवर आणला, त्याचप्रमाणे पुढील पाच वर्षात साखरविक्रीतून ५९ लाख रुपयांच्या ठेवी परत करता येतील, हे त्यांना आकलन झाले नाही. त्याचप्रमाणे ठेवी परत केल्यावर व्याज देण्याचे थांबेल व नफ्यात वाढ होऊन १० टक्क्यांपेक्षा जास्त नफा भागीदारांना देता येईल हेही त्यांना समजले नाही. अशी निरुपयोगी, कमी बुद्धीची माणसे कंपनीच्या भविष्यकालात कारभारात जर आली असती तर ठेवीदार बुडले असते व शेअरहोल्डरही. ह्या मंडळींना स्वार्थ सुटत नव्हता. ही यशस्वी कंपनी दुसऱ्या धनिकाच्या घशात घालण्याचा सर्व विरोधकांचा डाव होता.

आगाशेसाहेबांना कोणत्याही संकटाचे भय वाटत नव्हते. कारखाना उभारण्यात येणाऱ्या अडचणी नेहमी व सर्वांनाच येतात. पण आपल्याच संचालकमंडळाचे सभासद, एकंदर सर्व परिस्थिती माहीत असताना जेव्हा इतरांचे गैरसमज होणारे प्रश्न विचारत तेव्हा ते अतिशय दुःखी होत. ह्या कारखान्याची मालकी माझी एकट्याची नसून मराठी, मध्यमवर्गीयांची आहे. परमेश्वर फक्त माझ्याकडून हे सर्व करून घेतो आहे, अशी श्रद्धा होती. ठेवीदारांचे व भागधारकांचे हित करणे हे माझे कर्तव्य आहे, असे ते मानीत.

माधवराव पेशव्यांनी रयतेसाठी जशी खासगी संपत्ती देऊन त्याग केला, तद्वतच कंपनीच्या हिताकरिता, भागधारकांच्या लाभाकरिता लक्ष्मी-नारायण संघ स्थापला व ती. काकांनी लाखो रुपये उचलल्याच्या प्रॉमिसरी नोटा लिहून दिल्या, कंपनीला तोटयातून वाचविले. केवढा मोठा धोका आगाशेसाहेबांनी व काकांनी पत्करला, किती मनस्ताप सहन केले, त्याची खिजगणती नाही. या प्रकरणामुळे विरोधकांनी कोर्टकचेऱ्या, सरकारात केलेल्या तक्रारी, त्याच्या चौकशा, कागदपत्रांच्या जप्त्या आणि करमसी-भाईंनी ही कंपनी घशात घालण्याचा केलेला प्रयत्न या अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागले.

सरकारने चौकशीकरिता बाटलीबॉय कंपनीचे प्रतिनिधी देशपांडे यांना नेमले होते. त्यांनी वाटेल तसे शेरे कंपनी व आगाशे यांच्या-बद्दल मारले. पण पुढे या अहवालावर सरकारने काहीही कारवाई केली नाही. हे प्रकरण त्या वेळचे अर्थमंत्री मा. चिंतामणराव देशमुख यांच्यापर्यंत गेले. लक्ष्मी-नारायण संघ का काढला, कोणत्या परि-स्थितीत काढला, कंपनीच्या अस्तित्वासाठी हे सर्व केले असे स्पष्ट प्रतिपादन केले, त्यामुळे माझ्या वडिलांच्या खरेपणाबद्दल त्यांची खात्री झाली व चिंतामणराव देशमुखांनी ती फाइल बंद केली.

या सर्व प्रकरणाचा निकाल लागला. कंपनीच्या फायद्यासाठी केलेले हे संघाचे प्रकरण. जाहीरपणे ते कटुसत्य सांगितले, एवढेच नव्हे तर हा सर्व तोटा पुढे भरून देण्याचा प्रथमचा करार कंपनीच्या भागधारकांच्या सभेत मंजूर झाला. तो त्यांच्या जीवनातला नैतिक विजय होता. चार-पाच वर्षे डोक्यावर असलेला — असलेला म्हणण्यापेक्षा घेतलेला बोजा उतरला होता. पण ज्याच्या जिवावर व हिंमतीवर हे केले होते, ज्यांनी भाऊ सांगतोय म्हणून लक्ष्मी-नारायण संघातर्फे सह्या केल्या तो भाऊ (म्हणजे माझे काका) निवर्तलेला होता. भागधारकांनी मंजूर केलेला करार, हा झालेला नैतिक विजय, ही पांडुरंगाची कृपा असेच त्यांनी मानले. विजय विनयाने घ्यावा व पराजय धैर्याने सोसावा हे तर आगाशेसाहेबांच्या जीवनाचे सार होते.

१९५० नंतर आगाशेसाहेब कंपनीच्या कामात व्यग्र व विरोधकांच्या विरुद्धच्या लढ्यात आक्रमक झाले. आजवर कंपनी अडचणीत होती. ठेवीवर असे उद्योगधंदे करता येत नाहीत ही रूढ कल्पना खोडून काढून नवा प्रयोग यशस्वी केला. लोकांच्या शंका-कुशंकांना ते सौम्यपणे उत्तरे देत. जे कोणी ठेवीदार, भाग-धारक रागावून, संतापून येत त्यांचे समाधान करण्यासाठी हवा तो वेळ देत. कंपनीची नवी हजार टनी यंत्रसामग्री आली की १० टक्के फायदा कसा होईल ते समजावून सांगत. यामुळेच कंपनीचे ठेवीदार कधी उठाव करीत नसत. पण बृहन्महाराष्ट्र कंपनी यशस्वी होत आहे आणि आगाशेसाहेब आता धनिक उद्योगपती बनणार याची असूया निर्माण झालेले त्यांचेच स्नेही जेव्हा उलटू लागले, तेव्हा आगाशेसाहेब त्याच शब्दात उत्तरे देऊ लागले. त्यांनी एका निवेदनात अशा छिद्रान्वेषी मंडळींना उद्देशून म्हटले की, "कंपनीची वार्षिक सभा म्हणजे भागीदारांच्या पुढे यश मांडून त्यांच्या शेअरवर नफा जाहीर करण्याचा 'लक्ष्मीपूजनाचा' समारंभ. पण काही सभासद हा मंगलदिन होळीपौर्णिमेसारखा आरोपांची धुळवड खेळून साजरा करतात."

अजूनही विरोधकांच्या कारवाया कमी होत नव्हत्या. कंपनीच्या बोर्डातले भट व बाहेरचे तज्ज्ञ प्रा. लिमये यांचा व इतरांचा कमिशनच्या लोभाने कंपनी विकण्याचा हेतू सर्वच भागधारकांना किंवा ठेवीदारांना अर्थातच माहीत नसे. तेव्हा ठेवीदारांत घबराट उत्पन्न करून त्यांनी आपल्या ठेवी परत मागाव्या, त्यासाठी कोर्टात जावे, आगाशांना नोटिसा द्याव्यात व कंपनी बुडणार अशी हवा निर्माण करण्याचे जोरदार प्रयत्न सुरू होते.

विरोधकांची मोहीम तीन मोर्च्यांवरून सुरू होती. एक वैयक्तिक चारित्र्यहनन, दुसरे कंपनीचा आधार जे ठेवीदार त्यांच्यांत घबराट उडवून देणे आणि ठेवीदारांनी ठेवी मागण्यास गर्दी केली की, भागधारकांना आपले शेअर्स विकण्यास उद्युक्त करणे. ही तिसरी आघाडी पैशाच्या बळावर लढायची होती. ती साखरउद्योगातलेच

एक धनिक, गोदावरी शुगर मिलचे करमसीभाई यांचेकडून मिळाली. विरोधकांचे काम झाले. कोर्टकचेऱ्या करणे, पत्रके काढणे, यासाठी प्रचारसाधने उपलब्ध होणे हे सर्व करमसीभाईंच्या पैशावर शक्य झाले. नाहीतर पी. एम. लिमये म्हणतात, त्याप्रमाणे सव्वाशे रुपये पगारावर प्रोफेसरकी करणाऱ्याजवळ कुठले असे पैसे असणार! हेही परत ते स्वतःच सांगतात. धनिकांच्या जगातला हा न्यायच (आपल्या दृष्टीने अन्यायच) आहे की, इतरांनी कष्टाने उभारलेला उद्योगधंदा आपल्या पैशाच्या बळावर विकत घ्यायचा. पण विरोधकांच्या या कारवायाही काही यश मिळवू शकल्या नाहीत. बृहन्महाराष्ट्र कंपनीच्या मूळ नियमावली-मध्येच अशी तरतूद होती की कोणत्याही व्यक्तीने कंपनीचे शेअर्स कुणा व्यक्तीकडून खासगी रीतीने विकत घेतले तर ते त्याच्या नावावर चढविणे किंवा न चढविणे याचा हक्क कंपनीच्या संचालक-मंडळास आहे. शेअरबाजारात घेता किंवा विकता येतील असे हे शेअर्स नाहीत. प्रा. लिमये व भट यांच्या अपप्रचारामुळे भाग-धारकांत थोडी चलबिचल झाली. यांच्यासारख्या विद्वान मंडळींना उघडानागडा स्वार्थ दाखविता येत नाही. ते आपल्या स्वार्थालाच परमार्थाचा मुलामा चढवितात. आम्ही आमच्या एका शेअरच्या १००/– रुपयांसाठी भांडत नाही, तर हजारो मध्यमवर्गीय मराठी माणसांचे नुकसान होऊ नये म्हणून आम्ही हे धर्मयुद्ध लढत आहोत असा यांचा दावा. पण ही मंडळी, आपण कुणाच्या तरी हातातील, बाहुले-खेळणे होत आहोत हे समजू शकत नाहीत. जे जाणते असतात, त्यांना लोभ दाखवून मुखलेप केला जातो व मृदंग वाजू लागतो, त्याच्यावर थाप मारणारा हात मात्र निराळाच असतो.

तो धनिकाचा हात– एक मेसर्स भांबुरकर ॲण्ड को. आणि दुसरे सी. जी. काळे माजी इंजिनियर. पहिले स्वतःला औद्योगिक क्षेत्रातले अर्थतज्ज्ञ म्हणवीत असत. या दोघांची पत्रके अशी आहेत की, कंपनी प्रचंड तोटयात आहे. भांबुरकर आपल्या तातडीच्या व खासगी पत्रात लिहितात की, "ही कंपनी कमीत कमी तीस

लाखांच्या गुप्त तोटचात आहे. ही गुप्त तोटचाची खासगी बातमी आम्ही देत आहोत.'' भांबुरकर कंपनी आपल्या या पत्रात म्हणतात, ''आपली इच्छा असल्यास आपले शेअर्स मूळ किमतीत विकण्याचा आम्ही प्रयत्न करू. आपली रक्कम सुरक्षित करण्याची आणि त्या कामी मदत करण्याची ही सूचना देत आहोत.'' सी. जी. काळे म्हणतात, ''काही जबादार कारखानदार जुने शेअर्स मूळ किमतीत घेण्यास तयार आहेत व त्यांची माहिती मिळवून शेअर्स विकणे असल्यास त्यांना ते देणे समंजसपणाचे होणार नाही असे कोण म्हणेल ? तशी शेअरविक्रीची व्यवस्था मजकडे होऊ शकेल.''

हे दोघेही धनिकाचे म्हणजेच करमसीभाईंचे एजंट बनले होते. ह्या कटाच्या मागे करमसीभाई आहेत हे गुप्त राखण्यात आले होते. आगाशेसाहेबांचे हितचिंतक 'लोकशक्ती'चे संपादक श्री. नरूभाऊ लिमये यांना भांबुरकर म्हणतात, ''कंपनीच्या विरुद्ध तुम्ही लेख छापा, मी तुम्हाला आगाशे देतात त्यापेक्षा जास्त पैसे देईन.'' तेव्हा श्री. नरूभाऊंनी भांबुरकरांना विचारले, ''दीड-दोन कोटीच्या कंपनीस तीस लाख रुपये जर तोटा आहे तर तुमचा धनिक शेअरहोल्डरना मूळ पूर्ण रक्कम कशी देऊ करतो ? त्याच्या-जवळ पैसे जास्त झाले आहेत काय ?'' येथे त्यांची डाळ न शिजल्यामुळे भांबुरकर श्री. भाऊसाहेब हिरे यांचेकडे गेले. पण त्यांनी या प्रकरणाची पूर्ण माहिती घेतली व भांबुरकरांना वाटेला लावले. या विरोधकांचे पितळ अशा तऱ्हेने उघडे पडले.

श्री. नरूभाऊ लिमये एकदा आगाशेसाहेबांना म्हणाले, ''काही वृत्तपत्रे तुमच्या विरुद्ध लिहितात, तर त्यांना एखादी जाहिरात देऊन टाका ना !'' तेव्हा आगाशेसाहेबांनी सांगितले, ''मी अशा दमबाजीला भीक घालीत नाही. साखर विकायला जाहिरात द्यावी लागत नाही. माझे रक्षक हे पाहा येथे माझ्यासाठी उभे आहेत.'' असे म्हणून ज्ञानेश्वर, तुकाराम व पांडुरंगाच्या छायाचित्राकडे दृष्टी टाकली. ''आणि ठेवीदारांबद्दल म्हणाल तर त्यांचा माझ्यावर नितान्त विश्वास आहे. तो असल्या अपप्रचाराने ढळणार नाही.''

असे म्हणून श्री. नरूभाऊंच्या पुढे ठेवीदारांची यादी टाकली व सांगितले की, "यातील तीन टक्के लोकांनी जरी अविश्वासापोटी ठेवी परत मागितल्या तरी मी मॅनेजिंग एजन्सी सोडून देईन." ठेवीदारांचा आगाशेसाहेबांवरील विश्वास हे तर खरेच, पण आगाशेसाहेबांचा आत्मविश्वास किती जबरदस्त, किती दांडगा होता याचा प्रत्यय येतो. त्यांच्या बंधूच्या – माझ्या काकांच्या निधनानंतर ते कंपनीचा कारभार पाहत होते, पण अलिप्त मनानेच.

साखरकारखान्याला लागणारा कच्चा माल म्हणजे ऊस, स्वतःच्या जमिनीत उत्तम तऱ्हेने पोसलेला असताना त्याच्यातील शर्करांश भरपूर असताना, त्याचे गाळण समर्थपणे केले म्हणजे साखरेचा उतारा उत्तम पडतो. ह्याचाच परिणाम म्हणजे 'साखर-कारखाना' पैशाचा पाऊस पाडतो. हा सिद्धान्त दोन्ही बंधूंच्या श्रमामुळे पूर्णावस्थेला आला होता. बोरगावचा उजाड, ओसाड माळ हिरव्यागार शेतीने डोलत होता.

आता भरपूर नफ्याचा अहवाल भागधारक व ठेवीदारांना सादर करावयाचा असताना वडिलांच्या तपश्चर्येची सांगता व्हायची होती. त्याच वेळी सी. जी. आगाशे कंपनीची मॅनेजिंग एजन्सीची मुदत संपत होती. आणि त्याच क्षणाला त्यांचे विरोधक आगाशे-साहेबांना स्थानभ्रष्ट करण्याच्या कारवाया करीत होते. ही गाजलेली वार्षिक सभा अठ्ठावीस जून १९५३ रोजी भरलेली होती. त्यानंतर १९५४ मध्ये आगाशेसाहेबांची मॅनेजिंग एजन्सीची मुदत संपत होती. ती पुढे चालू करू नये याची ही नांदीच होती. १९५४ च्या सभेपूर्वी कंपनीच्या कारभाराबद्दल अनेक आक्षेप घेणारे पत्रक भागधारकांना पाठवून शक्य होईल तेवढा अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे आगाशेसाहेब पदभ्रष्ट होतील ही विरोधकांना खात्री. या खोडसाळपणाच्या प्रयत्नात श्रीधर फाटक, जठार, परांजपे, गुपचुप, नातू, महादेव विष्णू भिडे, कोल्हटकर, परशुराम म. लिमये, द. वा. बर्वे व विशेष म्हणजे रँग्लर र. पु. परांजपे हेदेखील सहभागी होते. ह्या सर्वांच्या पत्रकावर

स्वाक्षऱ्या होत्या. पत्रकावरचा पत्ता– प. म. लिमये, शीतल बंगला, पुणे ४ असा होता. अर्थात त्यांच्या या कारवायांना यश आले नाही, ही गोष्ट वेगळी. सरकारी धोरणप्रमाणे आगाशेसाहेबांची मॅनेजिंग एजन्सी पुढे चालू राहिली.

१९५० नंतर कंपनीला स्थैर्य येऊनसुद्धा 'लक्ष्मी-नारायण संघ', संतप्रभृतींनी कोर्टात व सरकारात केलेल्या तक्रारी, त्यातून निघालेल्या चौकशा, कागदपत्रांच्या जप्त्या आणि भरभराटीत आलेली ही कंपनी आयती घशात घालण्याच्या करमसीभाईंच्या कुटिल कारवाया यामुळे आगाशेसाहेबांना आत्मक्लेशाचे वाळवंट तुडवावे लागले. 'हेचि फल काय मम तपाला?' अशी त्यांच्या मनाची अवस्था झाली. तरी या समाजकंटकांचे उद्योग काही थांबत नव्हते.

आगाशेसाहेबांचे मन आणि शरीर या दुष्टांनी यातना देऊन पोखरून टाकण्याचा प्रयत्न सतत चालू ठेवला होता. परमेश्वराने आगाशेसाहेबांना एवढी शांत वृत्तीची देणगी कशी दिली होती कोण जाणे! त्यांच्या मनाची शांतता ढळली नाही; उलट, त्यांनी केसरीत जाहिरात दिली होती की, "आता शनीची साडेसाती संपली आहे. भाग गेला, शीणु गेला, अवघा झाला आनंद." यावरून त्यांच्या समतोल मनाची साक्ष पटते.

काही असले तरी आम्हा भावंडांना त्यांच्या आत्मक्लेशांची आठवण आजही मनाला अस्वस्थ करते.

# कल्पक प्रसिध्दी आणि वार्षिक 'आखाडे'

कोणताही उद्योग किंवा कोणताही धंदा भरभराटीस आणावयाचा म्हटला की त्याची योग्य रीतीने प्रसिद्धी करणे हे तंत्रसुद्धा नीटपणे अमलात आणावे लागते. आपल्या वस्तूचे, आपण तयार करणार असणाऱ्या मालाचे स्थान प्रसिद्धीच्या मार्गाने लोकांच्या मनात कसे पक्के ठसवायचे हेही एक कसब आहे. उद्योगाइतकेच जाहिरातीला व्यापारात अनन्यसाधारण महत्त्व आहे. ह्याला देखील कुशाग्र बुद्धिमत्ता, कल्पकता, नावीन्यपूर्ण व प्रभावी शब्दांची अचूक फेक अशा गोष्टींची नितांत आवश्यकता असते. मोठमोठ्या कंपन्यांमधून यासाठी स्वतंत्र विभाग व निष्णात माणसांची नेमणूक केलेली असते.

पण बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या जाहिरातीसाठी मात्र वेगळा माणूस किंवा स्वतंत्र विभाग काढण्याची अगर तसा माणूस शोधण्याची जरूर पडली नाही. आगाशेसाहेब स्वतःच जाहिराती लिहून प्रसिद्धीस देत असत. त्यांच्या जाहिराती अशा असत की, कंपनीच्या कामाची, प्रगतीची माहिती भागधारक, ठेवीदार यांच्याप्रमाणेच इतरेजनांनाही कळत असे. विशेष म्हणजे संतवचने, नाटकांतील संवादांचे संदर्भ देऊन, भागधारकांना दिलासा मिळेल, त्यांच्या शंका-कुशंकांचे निरसन होईल अशा जाहिराती ते देत असत. त्यांची जाहिरातीतील भाषा व उदाहरणे देण्याची पद्धत त्यांच्या हुशारीची, बुद्धिमत्तेची व कल्पकतेची एक झलक असे.

सुरुवातीला आगाशेसाहेब गावोगाव हिंडून, लोकांना प्रत्यक्ष भेटून, सांगून बृहन्महाराष्ट्राची जाहिरात करीत असत. १९३४ मध्ये

बृहन्महाराष्ट्राची स्थापना झाली असली तरी, प्रत्यक्ष साखर तयार होऊन बाजारात येण्यास १९३९ साल उजाडले होते. कंपनीच्या भाग-भांडवलासाठी केसरीत श्री. वर्तक यांच्या सहीच्या जाहिराती असत. १९३७–३८ मध्ये ठेवयोजना नाखुषीची वाटत होती; तरीदेखील आगाशेसाहेबांनी ती यशस्वी केली. ते ह्या सर्व गोष्टींचा खुलासा जाहिरातीत करत.

१९३८ मध्ये गुढीपाडव्याला कंपनीचा पायाभरणी समारंभ झाला. त्यानंतर १९३८ च्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात त्यांनी जाहिरात दिली– "कंपनीचा ऊस किंवा मशिनरी कोठेही गहाण ठेवलेली नाही." याचे कारण असे की, कंपनी भागभांडवलापेक्षा ठेवींवर भर देत होती. ह्या पद्धतीला जरी मान्यता मिळू लागली होती, तरी या ठेवी असुरक्षित असतात, तेव्हां ठेवीदारांच्या दृष्टीने कंपनीची मिळकत, मशिनरी कोठेही गहाण ठेवू नये असे श्री. आ. रा. भट यांनी प्रतिपादन केले होते; म्हणून या जाहिराती-द्वारे त्यांनी हा खुलासा केला. पुढे १९४० मध्ये लागवड पूर्ण झाल्यावर लगेच ठेवी घेणे बंद करण्यात येईल, असे नमूद केले व त्याचबरोबर जाहिरातीत कारखान्याचे छायाचित्र छापले होते. महाराष्ट्रातील साखरउद्योग हा प्राथमिक अवस्थेतून जात असल्या-मुळे बृहन्महाराष्ट्राच्या यशाचा व नफ्याचा दिलासा देण्याची गरज होती, म्हणून जाहिरातीद्वारे आगाशेसाहेबांनी कळंब व बेलापूर कारखान्याच्या नफ्याची आकडेवारी देऊन बृहन्महाराष्ट्राला एक लाखाहून कसा जास्त फायदा होईल हे जाहीर आश्वासन दिलेले आहे. ते प्रत्येक गोष्टीशी प्रामाणिक होते. ठेवीदारांची काळजी त्यांनी नेहमीच घेतली. प्रामाणिकपणे विचार करायची सवय लावून घेतली की सर्व अडचणी, संघर्ष, अनेक प्रश्न चुटकीसारखे सुटतात; हे आयुष्यातील एक गमक होते. याच महिन्याच्या १४ तारखेस (१९३९) पूर्ण पानाची जाहिरात देऊन कारखान्याची सर्व छायाचित्रे प्रसिद्ध केली. १९३९ मध्येच पहिला हंगाम सुरू होऊन मराठी माणसाच्या बळावर उभारलेल्या या स्वदेशी कारखान्याच्या साखरेचा ब्रँड 'श्री' ठरविण्यात आल्याची जाहिरात ३१-१-३९ ला

प्रसिद्ध करण्यात आली. यश व श्रम 'श्री' बोधचिन्ह देऊन साखरेचे पोते श्रीचरणी अर्पण केल्याची ती जाहिरात होती. भागधारक व ठेवीदारांचा आनंद द्विगुणित व्हावा यासाठी ह्या प्रयत्न. ह्या व अशा जाहिरातींमुळे कारखान्याच्या प्रगतीचा मागोवा भागधारक व ठेवीदारांना लागत असे. प्रत्येकजण अतिशय उत्सुकतेने जाहिराती वाचत असे.

ठेव-योजनेवर संचालकमंडळाच्या संमतीचे शिक्कामोर्तब झाल्यावर ठेवीरूपाने भांडवल गोळा करण्यासाठी आगाशेसाहेबांनी जाहिरातींचा धडाका चालू ठेवला होता. ते शब्दाचे अतिशय पक्के, त्यामुळे ठेवीदारांचा त्यांच्यावर गाढ विश्वास, त्यामुळे केवळ जाहिरातींवर ठेवींचा झरा कायम वाहत होता.

एका वार्ताहराने त्यांच्याबद्दल असे लिहिले आहे की, प्रसिद्धीचे तंत्र हे आगाशेसाहेबांचे उपजत अंग होते. मोजके पण वेधक शब्द, विरोधक व जिज्ञासू यांना चार वाक्यांत शांत करण्याची कला त्यांना अवगत होती.

त्यांनी दिलेल्या ह्या जाहिरातीच पाहा म्हणजे कल्पना येईल.

"THE NATION HAD A LION HEART,
I ONLY ROARED

११ जानेवारी १९५५ च्या जाहिरातीत लायन हार्ट मध्यमवर्गाने कोणतेही तारण न मागता लक्षावधी रुपयांचे भांडवल देऊन एक हजार टनांची मशिनरी उभी केली व उत्पादन सुरू करून दिले आहे. साखरेच्या उत्पादनातून लायन हार्ट अशा मध्यमवर्गाने दिलेल्या ऋणातून सिंडिकेट मुक्त होईल.

कमिशनच्या लोभामुळे मध्यमवर्गाचा फायदा,
शेटजींच्या पदरात बांधण्याचे अमहाराष्ट्रीय कर्म
काही तज्ज्ञ म्हणविणारे लोक करीत आहेत–"

या जाहिरातीद्वारे भागधारक व ठेवीदारांचा गौरव तर केला आहेच, पण विरोधकांच्या कारवायांना प्रकाशात आणले आहे.

श्री. भट नामक विरोधक असाच प्रयत्न करीत असताना त्यांना उद्देशून एक जाहिरात दिली होती–

" गोधन हरावयास आले, भट कोणकोण ते पाहू ! "

१९४० च्या सुमारास बृहन्महाराष्ट्राचा यशदायी काळ. मशिनरी उत्तम काम देत होती. यशप्राप्तीसाठी अंतरी शुद्धभावना लागते. शुद्धभावनेमुळेच आगाशेसाहेबांना यश मिळत होते. त्यांनी जाहिरात दिली, त्याला शीर्षक होते, ' स्वाभिमानी महाराष्ट्र '. त्याच वेळी बारा लाख रुपयांच्या साखरउत्पादनाची हमी देण्यात आली होती. आगाशेसाहेबांचे महाराष्ट्रप्रेम अशा अनेक जाहिरातींमधून व्यक्त होत असे. सुदैवाने त्यांचा उपक्रमच असा होता की, कष्ट किंवा संकटे उद्योगाला अपयश देणारी नव्हती. त्यांना त्यांच्या उद्योगा-बद्दल विलक्षण आत्मविश्वास व अभिमान होता. त्यांची एक जाहिरात तर फारच सुरेख आहे. त्यांनी त्रिवेणी संगमाचे प्रतीक दिले आहे. ते जाहिरातीत म्हणतात–

" तलवार-बहादूर मराठ्यांनी जमिनी दिल्या,
शिवरायांच्या तोरणा, राजगड या किल्ल्यांना पर्जन्याच्या होणाऱ्या अभिषेकाचे पाणी सिंडिकेटच्या उसाला सरकारने दिले,
महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचा अंतःकरणात जिव्हाळा असलेल्या मध्यमवर्गाने सिंडिकेटला भांडवल दिले आहे."

या त्रिवेणी संगमाने सिंडिकेट यशाची घोडदौड करणार हे नक्कीच होते. सर्वांचे ऋण जाणणारे असे आगाशेसाहेब हे व्यक्तिमत्त्व नक्कीच वेगळे होते.

विरोधकांच्या कारवायांमुळे ठेवीदार विचलित होऊ नयेत म्हणून १९५० पासून जास्त आक्रमक व जोरदार जाहिरातींच्या तोफा धडाडत ठेवल्या होत्या. २३ मे १९५० रोजी केसरीत जाहिरात होती–

"काकासाहेब खाडिलकर म्हणतात–
प्रथम 'धैर्यधर' नंतर 'लक्ष्मीधर' !
कारखाना उभा करण्यासाठी
'धैर्यधर' शेअर्स घेतील, ठेवी देतील.
'धैर्यधर' मिळाले म्हणून
३६ लाखांची मशिनरी आली,
उभारणीकरिता 'धैर्यधर' मिळत आहेत."

त्यांचे चौफेर वाचन, मनन व अभ्यास यांमुळेच आगाशेसाहेब अशा जाहिराती लिहू शकत होते.

३० मे १९५० रोजी हजार टनी कारखान्याची प्रगती कळावी म्हणून जाहिरात दिली. एक हजार टनी कारखाना सुरू झाला होता.

"कारखाना सुरू होता यामुळे जाहिरातीने भेट घ्यावी लागत आहे. आता समक्ष भेट घेता येईल, त्यामुळे जाहिरातीचे जोडलेले घाट इंजिन सोडले आहे. ठेवी स्वीकारल्या जातील, पण जाहिरात येणार नाही. जाहिरातीच्या भेटीने शेअर घेतले व ठेवी दिल्या त्यांचे आभारी आहोत."

वेळोवेळी असे आभार मानून ठेवीदारांचे ऋण मान्य करीत असत. त्यानंतर १२ डिसेंबर १९५१ या दिवशीच्या जाहिराती-मध्ये आगाशेसाहेब लिहितात–

"साखरकारखाना यशस्वी करणे म्हणजे
स्वराज्यप्राप्ती किंवा ब्रह्मसाक्षात्कार नव्हे."

जमिनी, कॅनॉलचे पाणी, मशिनरी एवढे भांडवल असले म्हणजे साखरकारखाना ही कमीत कमी दहा टक्के नफ्याची कॅश इंडस्ट्री. यावरूनच त्यांना त्यांच्या कर्तृत्वाचा थोडासाही गर्व, दंभ नव्हता हे अनुभवास येते. ते अत्यंत सरळ, साधे; पण सिंहासारख्या हृदयाचे होते. शरीराच्या रंगापेक्षाही हृदयाचा रंग हा महत्त्वाचा.

ज्याप्रमाणे फुलाच्या बाह्यआकारापेक्षा त्यातून दरवळणारा सुगंध महत्त्वाचा असतो. बाह्यसौंदर्यापेक्षाही आत्मिक सौंदर्य श्रेष्ठ, कारण आत्मिक सौंदर्य मृत्यूनंतरही नष्ट होऊ शकत नाही. आगाशे-साहेबांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या या सहृदयीपणामुळे आजही त्यांच्या कर्तृत्वाचा सार्थ अभिमान व आदर याच आमच्या भावंडांच्या त्यांच्याबद्दल भावना आहेत.

१ फेब्रुवारी १९५२ रोजी त्यांनी जाहिरात दिली–

" भाग गेला, शीण गेला ।
अवघा झाला आनंद ।। "

कारण या वेळी कारखाना सुस्थितीला आला होता. पण विरोधकांच्या, आगाशेसाहेबांना नाउमेद करावयाच्या कारवायांना खळ नव्हती. मॅनेजिंग एजंट म्हणून आगाशेसाहेबांना मिळत असलेले यश विरोधकांना सलत होते. ठेवीदार बुडणार म्हणून हाकाटी चालू होती. जाहिरातींवर आगाशेसाहेब भरमसाट खर्च करतात म्हणून टीका होत होती. बृहन्महाराष्ट्राची साखर-विक्री करण्याकरिता जाहिरातीची गरजच नव्हती. पण ठेवीदार व भाग-धारक यांची जी दिशाभूल लिमये, भट, बर्वे यांच्यासारखे विरोधक करीत असत, त्याला जाहिरातींद्वारे उत्तर देऊन ठेवीदार-भागधारकांच्या शंकानिवारणाचे कर्तव्य करावे लागत होते.

२ ऑगस्ट १९५३ रोजी दिलेल्या जाहिरातीत खुलासा आहे की,

अगा उपाय बले पंगु । पहाड नको ।। –ज्ञानेश्वरी

ठेवीच्या भांडवलाच्या उपायबलाने एक हजार टनांचा कारखाना सुरू होऊन ९६०५५ पोती साखरउत्पादन झाले. कोणाही ठेवीदाराची ठेव बुडाली नाही. अशा खुलाशाने ठेवीदार शांत होत असत हे खरे, पण आगाशेसाहेबांची शक्ती या त्रासदायक विरोधकांमुळे कमीच होत नव्हती का ? या लोकांनी जर त्रास दिला नसता तर आगाशेसाहेब महाराष्ट्राची आणखी जास्त सेवा करू शकले असते. पण लक्षात कोण घेतो !

३ नोव्हेंबर १९५३ ची ही जाहिरात पाहा—

"शेअरवर नफा हा स्वार्थ
संस्थांना नफ्यातून देणगी हा परमार्थ ।"

कंपनीच्या घटनेतच शेअरचा नफा वाटून उरलेल्या नफ्यातून देणग्या देण्याबद्दल लेखी नमूद केले आहे. त्यांचे वेगळेपण इथेच आहे. आपले मन शुद्ध व स्वच्छ असल्याशिवाय जीवनाचा अर्थ कोणालाही नीट समजणार नाही. पण आगाशेसाहेबांचे मन शुद्ध व स्वच्छ, त्यामुळे दुसऱ्याचे जीवन सुखी करणे, त्यासाठी आपण प्रयत्न करणे, हृदयाची ऋजुता ठेवणे हाच त्यांच्या जीवनाचा अर्थ होता, म्हणून त्यांचे जीवन अर्थपूर्ण होते.

२५ डिसेंबर १९५३ च्या जाहिरातीत ते म्हणतात—

प्रश्न : कठीण समय येता कोण कामास येतो ?

उत्तर : अन्य न कामास येतो, मित्र जसा संकटात कामास येतो.

त्यामध्ये असा खुलासा केला आहे व ठेवीदारांना विश्वास दिला आहे की, सिंडिकेटवर कोणताही कठीण प्रसंग आलेला नाही. मानवी मित्राप्रमाणे 'उत्पादनमित्र' हा साहाय्य करणारा असल्याने एक्केचाळीस लक्ष रुपयांच्या ठेवी परत केल्या असून ठेवीदारांचा एकही पैसा बुडणार नाही.

१४ जानेवारी १९५५ रोजी जाहिरात देऊन विरोधकांच्या भाडोत्री प्रचाराला खिंडार पाडले असून, त्यांचे पितळ उघडे पाडले आहे. ४ जानेवारी १९५५ ला भट, संत वगैरेंनी 'बृहन्महाराष्ट्राची मालमत्ता अखेर लिलावात निघणार' असा खोटा व बदनामी-कारक मजकूर लिहिला. आगाशेसाहेबांनी या अपप्रचाराबद्दल योग्य ती कायदेशीर तजवीज कंपनीकडून होईल, हे जाहीर केले व कंपनीने परत केलेल्या ठेवींचा तपशील जाहिरातीत छापला व ठेवीदारांच्या मनातील निर्माण झालेला अविश्वास दूर झाला. त्यानंतर लगेच १८ जानेवारी १९५५ या दिवशी मोठी व सविस्तर जाहिरात दिली—

प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीही निवळे
सशाचेही लाभे विपिन फिरता शृंगही जरी
परंतु मूर्खाचे हृदय धरवेना क्षणभरी ।। (वामनपंडित)

स्वदेशीची मोहीम १९०५ पासून जोरात होती. त्या वेळी परदेशी साखरेचे पक्वान्न खात नाही, पुरणपोळी वाढा, असा आग्रह धरणारे स्वदेशीचे अभिमानी तरुण होते.

१. सिंडिकेटचा कारखाना स्वदेशी साखरेचा आहे व साखरेचा धंदा दहा टक्के नफ्याचा आहे.

२. सिंडिकेटची नवीन एक हजार टनांची मशिनरी उभी राहून साखरेचे उत्पादन सुरू झाले आहे.

३. मध्यमवर्गाला महिना पाच रुपये (१९५५ साली) म्हणजे वर्षाला साठ रुपयांची साखर लागते.

४. सहा टक्क्यांनी १०००/– रु. भांडवल स्वदेशी साखर-कारखान्याला म्हणजे वर्षाच्या साखरेच्या साठ रुपयांची विमा पॉलिसी घेणे आहे.

५. बृहन्महाराष्ट्रात बंगले, वाडे, बागाईत, व्यापार यांचे मालक असलेले एक लक्ष लोकांपेक्षा जास्त मध्यमवर्गीय आहेत.

६. मध्यमवर्गातील दहा हजार लोकांनी प्रत्येकी एक हजार रुपये दिले तरी एक हजार कोटी रुपयांचे भांडवल जमविता येते. त्याला शेटजी किंवा लक्षाधीश यांची जरूर नाही.

७. इतर कारखान्यांचे मॅनेजिंग एजंट्स 'भस्मभूषण' नाहीत. अंगाला लावायला भस्म दिले म्हणजे पुरे हे त्यांना मान्य नाही. सिंडिकेटच्या मॅनेजिंग एजंट्सपेक्षा त्यांना लठ्ठ पगार व कमिशन मिळते.

८. सिंडिकेटचे वार्षिक उत्पन्न एक लाख पोती होऊ शकते. ७० रुपये भाव धरला तरी ७० लाख रुपये साखरविक्रीचे मिळू शकतात.

९. साखरेचा धंदा नफ्यात असल्यामुळे व साखरउत्पादन सुरू झाल्यामुळे ठेवी सुरक्षित आहेत, हे चिकित्सक महाराष्ट्राला समजते. नवीन ठेवी येतात. जुन्या ठेवींची मुदत वाढवून मिळते. मंगलकार्य, शिक्षण वगैरेसाठी परत मागितलेल्या ठेवी परत दिल्या जातात.

१०. कृष्णद्वैपायन याला उत्तर देण्यासाठी सिंडिकेटजवळ कालियामर्दन आहे पण सरकारी इन्स्पेक्टर्स यांच्या रिपोर्टाची बाब Subjudice आहे. शिवाय उत्तर देण्यास व्यर्थ वेळ जाईल, याचे कारण भर्तृहरीने संस्कृतात व वामनपंडिताने सुबोध मराठीत सांगितले आहे ते सिंडिकेटच्या भागीदार व ठेवीदारांच्या स्मरणार्थ दिले आहे.

'परंतु मूर्खाचे हृदय धरवेना क्षणभरी.'

श्री. संत नावाचे विरोधक 'कृष्णद्वैपायन' या टोपणनावाखाली 'प्रभात' या दैनिकामध्ये सिंडिकेटच्या विरुद्ध लेख लिहीत-असत; त्याला या जाहिरातीद्वारे आगाशेसाहेबांनी उत्तर दिले आहे. असा सतत साधत असलेला सुसंवाद, शंकांचे निरसन व ठेवीदारांना त्यांच्या पैशाच्या सुरक्षिततेबद्दल दिलेला दिलासा यामुळे दररोज पन्नास हजार किंवा कित्येक वेळा त्याहीपेक्षा जास्त रकमेच्या ठेवी सिंडिकेटकडे येत असत. अक्षरशः ठेवींचा पाऊस पडत असे. यात कणभरही अतिशयोक्ती नाही; तर शंभर टक्के सत्य आहे. आगाशेसाहेबांचा शब्द म्हणजे ठेवीदार व भागीदारांना सी. डी. देशमुखांच्या सहीची रिझर्व्ह बँकेची नोट असेच वाटत असे. देवावर अढळ श्रद्धा होती, त्या दृष्टिकोनातून त्यांनी ३ जून १९५५ रोजी जाहिरात दिली—

'भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा ।
कृपावंत ऐसे कळो आले ॥— तुकाराम महाराज'

त्याच जाहिरातीत १० टक्के डिव्हिडंड देण्याचे जाहीर केले व

पुढती, पुढती, पुढती । अशीच होऊ दे प्रगती ।

अशी सदिच्छा व्यक्त करून पुढे आगाशेसाहेब लिहितात—

CO–EXISTANCE AND NOT AGRESSION

ह्या शांततावादी तत्त्वाचा प्रचार आज सर्वत्र आहे. ह्या तत्त्वाप्रमाणे मध्यमवर्गाचे सहकार्य असलेल्या सिंडिकेटवर भांडवलदारांनी आक्रमण करू नये. कंपनीच्या इतर सर्व कामांच्या व्यापाबरोबर आगाशेसाहेबांना हितशत्रूंच्या कारवायांना तोंड देणे क्रमप्राप्तच होते. त्यासाठी जाहिरातीद्वारे संपर्क साधणे हेच सोपे व हितकारक साधन असल्यामुळे दर आठवड्याला कमीत कमी एकदा तरी जाहिरात द्यावीच लागे. २५ डिसेंबर १९५५ रोजी परत एक मोठी जाहिरात दिली. या जाहिरातीबद्दल सविस्तर लिहिण्याचा उद्देश एवढाच की, विरोधकांचा विरोध किती होता व त्याला आगाशेसाहेब किती पुरून उरले व कंपनीची भरभराट केली हे कळावे. १९५५ मध्ये डिस्टिलरी पण सुरू होणार होती. त्याची इमारत बांधून तयार झाली तेव्हा आगाशेसाहेबांनी जाहिरात दिली–

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।।

– श्रीमद्‌भगवत्‌गीता

# कर्म-फल-त्याग

साखरेचें उत्पादन महाराष्ट्राला अतिशय फायद्याचे आहे हे मध्यमवर्गाला पटवून देण्यासाठी 'मतपरिवर्तन' व 'हृदयपरिवर्तन' ह्या साधनांचा उपयोग करावा लागला व भांडवल सुरक्षित राहिले. भांडवलावर दहा टक्के नफा व व्याज देऊन, जादा नफ्यातून 'विद्याधनं सर्वधनंप्रधानम्' याकरिता शिक्षणसंस्थांना जादा नफ्याचा भाग अर्पण करण्याचा संकल्पही सांगावा लागला.

भांडवल जमले. रोज हजार पोती साखर निघू लागली.

१९४३ ते १९५५

या बारा वर्षांनंतर आता **वीस टक्के** नफा हा होणारच व जादा नफ्याचा भाग शिक्षणसंस्थांना अर्पण करण्याचा संकल्प सिद्धीस जाणार.

Where There Is A Will, There Is A Way.
WAIT AND SEE.

यानंतर त्यांनी प्रगतीचे टप्पे नमूद केले आहेत–

| सुरुवातीस | व आज |
|---|---|
| अधिकृत भांडवल १५ लाख रु. | अधिकृत भांडवल १ कोटी रु. |
| मशिनरी दररोज २५० टन ऊस गाळणारी | मशिनरी दररोज १००० टन ऊस गाळणारी सेमी इलेक्ट्रिक मशिनरी |
| साखरउत्पादन ५० ते ५५ हजार पोती | साखरउत्पादन १ लाख २० हजार पोती |

ठेवींचा तक्ता दिलेला आहे. त्याचप्रमाणे १९३९ ते १९५५ या काळातील साखर-विक्रीचे आकडे, सरकारला दिलेली साखरेवरील जकात, मुंबई सरकारला दिलेला उसावरील कर, मुंबई सरकारला भरलेली पाणीपट्टी, ठेवींवर दिलेले व्याज, भागधारकांना दिलेला नफा आणि बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सला दिलेली देणगी, एकूण ठेवी, परत केलेल्या ठेवी या सर्व गोष्टी जाहिरातीत जाहीर केल्या असून कारखान्याचे छायाचित्रही छापले आहे.

सर्व भागधारक व ठेवीदारांनी सहकार्य दिल्यामुळे यश आल्याचे नमूद करून असाच लोभ सिंडिकेटवर ठेवावा ही विनंती आहे. आगाशेसाहेब हे शिक्षणप्रेमी होते. त्यामुळे शिक्षणसंस्थांना जास्तीत जास्त मदत करणे हा हेतू त्यांनी बाळगला होता. शिक्षणाचा उद्देश निरोगी मनाची जोपासना करणे हाच असतो. त्यामुळे नाना प्रकारच्या समस्यांना सामोरे जाण्याची ताकद येते. याच विचाराने ते मदत करीत असत. त्यांचे विचार अतिशय योग्य असे होते. आणि योग्य क्रिया योग्य विचारांशिवाय होणारच नाहीत.

पण विरोधकांना मात्र त्यांचे मन कळलेच नाही; कळले नाही म्हणण्यापेक्षा मुद्दाम द्वेषाचा बुरखा पांघरला होता. कसेही असले तरी आगाशेसाहेब विरोधकांना हार गेले नाहीत. त्यांचे प्रामाणिक प्रयत्न व परमेश्वराचे अधिष्ठान यामुळे प्रयत्नांची हार किंवा यशस्वी माघार हे शब्द त्यांच्या शब्दकोशातच नव्हते. आपण व परमेश्वरी अभिव्यक्ती या दोन नाहीत हे अद्वैत त्यांना कळले होते. त्यामुळे हृदयातून फक्त आनंदाच्या धाराच प्रकट होत असत. निराशा, अपयश यांना थारा नव्हता. या असल्या गोष्टींना स्थान मिळणारच कसे! कारण आगाशेसाहेब म्हणजे सात्त्विकतेचा नमुना होते. फुलांचा सुगंध वाऱ्याच्या दिशेनेच वाहत असतो, धावत असतो; परंतु सात्त्विकतेचा सुगंध मात्र चौफेर वाहत असतो. म्हणून आगाशेसाहेबांचा कीर्ति-परिमल सर्वत्र पसरला आहे. यानंतर महत्त्वाच्या जाहिराती १८ जानेवारी १९५६, २२ फेब्रुवारी १९५६, ७ मे १९५६ व २१ मे १९५६ रोजी दिलेल्या आहेत.

१ जानेवारी १९५३ रोजी श्री. आर. बी. भट यांनी आगाशे-साहेबांना पत्र पाठवून कळविले की, "एक भांडवलदार बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट कंपनीत अठ्ठावीस लाख रुपये शेअर्समध्ये आणि पंचाहत्तर लाख रुपये डिबेंचर्समध्ये गुंतवण्यास तयार आहेत. तरी तुमचा होकार असेल तर बोर्डाची सभा बोलवा, म्हणजे मी माझे प्रस्ताव (Proposals) सविस्तर सादर करीन."

शेठ करमसी सोमय्या हे श्री. भट यांचे भांडवलदार. मध्यम-वर्गाच्या मालकीचा कारखाना शेठजींच्या ताब्यात देता येणार नाही, असे संचालकांनी आणि आगाशेसाहेबांनी सांगितल्यामुळे आर. बी. भट यांचा विरोध अधिकच तीव्र झाला. शेठजींनी कंपनी ताब्यात मिळावी म्हणून सिंडिकेटच्या भागधारकांचे शेअर्स विकत घेण्याचे ठरविले व भागधारकांवर वजन पडावे म्हणून मुंबई सरकारचे निवृत्त पी. डब्ल्यू. डी. चीफ इंजिनिअर व शेठजींनी नियुक्त केलेले जनरल मॅनेजर सी. जी. काळे यांची भागधारकांचे शेअर खरेदी करण्याकरिता योजना केली.

बॉटलीबॉय कंपनीचे चौकशी अधिकारी श्री. डब्ल्यू. एच. देशपांडे यांनी चारशे पानांचा त्यांचा रिपोर्ट सरकारकडे सप्टेंबर १९५४ ला पाठविला. त्याला तितक्याच पानांचा लेखी जबाब आगाशे यांनी सरकारकडे पाठविला असून श्री. डब्ल्यू. एच. देशपांडे यांच्या सिनॉप्सिस (Synopsis) मधील विधाने खोडून काढली आहेत.

ही जाहिरात १८ जानेवारी १९५६ या दिवशीची आहे. यानंतरची २२ फेब्रुवारीची जाहिरात महत्त्वाची व श्री. करमसी सोमय्या यांना सुयोग्य विचार सांगणारी आहे,

" पुढती पुढती पुढती । इया ग्रंथपुण्यसंपत्ती ।।
सर्वसुखी सर्वभूतीं । संपूर्ण होईजे ।। –ज्ञानेश्वरी

सिंडिकेट म्हणजे मध्यमवर्गाची पुण्यसंपत्ती–

पुढती पुढती पुढती

सिंडिकेटच्या भागधारकांना व ठेवीदारांना कायमची द्रव्यप्राप्ती ज्यांनी सदैव उमेद दिली, म्हणजे त्या वेळेला आर्थिक मदत दिली, सिंडिकेट यशस्वी होण्यात ज्यांनी आनंद मानला,

अशा सिंडिकेटच्या नामवंत भागीदारांच्या शेअरविक्रीचे
अ-महाराष्ट्रीय कृत्य काळे एजंट यांच्याकडून
१९५४ च्या सप्टेंबर महिन्यात घडले
समाजवादी समाजरचनेच्या तत्त्वावर
सिंडिकेटची उभारणी केलेली आहे.

विरोधी प्रचाराने ज्यांच्याकडून शेअर खरेदी केले ते शेअर्स त्यांस परत करणे हा न्यायाचा व नीतीचा मार्ग आहे, हे शेठ करमसी सोमय्या यांनाही मान्य होईल.

सिंडिकेट आता वीस टक्के नफ्यात चालणारच
WAIT AND SEE."

यानंतर ७ मे व २५ मे १९५६ ला कंपनीच्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या. त्याच त्यांच्या – आगाशेसाहेबांच्या – आयुष्यातल्या अखेरच्या जाहिराती.

'दग्धं दग्धं पुनरपि पुनः काञ्चनं कान्तवर्णम्'

पुनःपुन्हा सोने अग्नीमध्ये जाळले तरी ते नव्या झळाळीने चमकू लागते, तसे विरोधकांच्या विरोधाग्नीत आगाशेसाहेबांचे कर्तृत्व व सद्गुण जास्तच चमकदार ठरले.

त्यांच्या जाहिराती जशा गाजल्या तशाच सिंडिकेटच्या वार्षिक सभाही गाजत असत. अनेक सभा वादळी, विरोधकांचा गदारोळ, त्यावर आगाशेसाहेबांची उत्तरे, प्रतिपक्षावर मात अशा होत असत.

कंपनीची वार्षिक सभा २३ जानेवारी १९४० रोजी पार पडली. मराठी माणसाच्या स्वभावाप्रमाणे शंका-कुशंका उमटत होत्याच. परंतु आगाशेसाहेबांच्या 'ठेवी' घेण्याच्या कल्पनेला यश आले होते. या सभेचे वृत्त 'केसरी' या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले—

" भागधारकांना कंपनीच्या व्यवहारासंबंधी काही माहिती हवी असल्यास डिसेंबरमध्ये तहकूब केलेली सभा आत्ता भरून कंपनीचा ताळेबंद, संचालकमंडळाचा अहवाल व नफातोटापत्रक ह्याची माहिती घ्यावी हे कळविले व हे सर्व एकमताने मंजूर झाले.

संचालक मंडळातर्फे प्रा. वामनराव काळेप्रभृतींनी सर्व प्रकारची माहिती देऊन कंपनीच्या कारभारात आक्षेपार्ह काहीही नाही, अशी ग्वाही दिली; आणि आश्वासन दिले की, कंपनीचा कारभार दिवसेंदिवस नमुनेदार ठरेल. संचालकमंडळ व ऑडिटर यांच्या नेमणुका एकमताने झाल्या. सर्वत्र समाधानाचे वातावरण निर्माण होऊन सभा संपली.

संचालकमंडळात सर्वश्री वामनरावजी काळे, दिवाणबहादुर लिमये, जगन्नाथमहाराज पंडित, रामभाऊ अभ्यंकर, बाबुराव साळवेकर, सोहनी, तांबे यांच्यासारखे नामवंत गृहस्थ आहेत. ही सर्व मंडळी कंपनीच्या उत्कर्षासाठी कसून प्रयत्न करतील व शेअर-होल्डर्सच्या हिताला जपतील. महाराष्ट्रीय जनता आपल्यापरीने कारखान्याला हरतऱ्हेची मदत करेल असा विश्वास वाटतो." (केसरी, २३ जानेवारी १९४०)

यानंतर महत्त्वाची सभा म्हणजे १९४३ सालची.

" १९४३ च्या वार्षिक सभेत पुणे येथील बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या संचालकमंडळाने डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वाणिज्य महाविद्यालयास दोन लाखांची उदार देणगी देण्याचा संकल्प जाहीर केला. या पैशातून कॉलेजची इमारत बांधली जावयाची असून त्या कॉलेजला 'बृहन्महाराष्ट्र वाणिज्य कॉलेज' असे नाव देण्यात येणार असल्याचे जाहीर केले. शुगर सिंडिकेटच्या मूळ उद्देशात अशा देणग्या देण्याची योजना असल्याने कोणी हरकत घेण्याचा प्रश्न आला नाही. सिंडिकेटच्या सर्व भागधारकांना त्यांच्या भागावरील भरपूर व्याज देण्याची व्यवस्था केली होती, व कामगारांच्या सुखसोयीसाठी पन्नास हजार रुपये राखून ठेवलेले होते. औद्योगिक संस्थांनी पक्षभेदातीत सार्वजनिक कार्याला मदत

करण्याची स्तुत्य प्रथा या देणगीने पडत असून तिचा श्रीगणेशा केल्याबद्दल कोणीही बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचे संचालक व मॅनेजिंग एजंट श्री. चंद्रशेखर आगाशे यांचे अभिनंदनच करेल. बृहन्महाराष्ट्राचे हे उदाहरण इतर महाराष्ट्रीय औद्योगिक संस्थांनी गिरविल्यास महाराष्ट्रातील सार्वजनिक कार्याला द्रव्याची अडचण भासणार नाही," हे केसरीने दिलेले स्फुट आहे. याच सभेत देणगीला भागीदारांची संमती मिळाली.

'केसरी'ने दिलेले हे स्फुट म्हणजे आगाशेसाहेबांच्या ध्येय-धोरणांचा पाठपुरावा व त्यांच्या पाठीवर पसंतीची थाप होय.

१९४३ नंतरच्या वार्षिक सभांतून तांबे, भट, बर्वे ही मंडळी स्वतःचे फक्त ५०–१०० रु. चे एक-दोन शेअर्स असताना 'चिंता वाहतो विश्वाची' या आविर्भावात कंपनीच्या कारभारावर टीका करीत. हा त्यांचा वार्षिक उद्योगच होऊन बसला होता.

१९४५ साली भरलेल्या भागधारकांच्या अकराव्या सभेत अध्यक्ष श्री. जगन्नाथ महाराज पंडित यांनी सांगितले की, "कंपनीच्या मुंबई सरकारबरोबर झालेल्या पाण्याच्या करारात उसाचा गूळ करण्याची परवानगी आहे, तरीदेखील भारत संरक्षण कायद्या-खाली गूळ करण्यास बंदी घालण्यात आली आहे. ही गूळबंदी, साखर करण्यात अडचण, आपली कमी क्षमतेची मशिनरी आणि सरकारची अधिक धान्य पिकविण्याची सक्ती याचा कंपनीवर फार मोठा अनिष्ट परिणाम झाला आहे. यापुढे गूळ करण्यास परवानगी मिळेल असे वाटत नाही." तेव्हा अधिक क्षमतेची मशिनरी मागविणे हाच एकमेव मार्ग कंपनीसमोर होता. ह्या सभेमध्ये हजार टनांच्या मशिनरीची ऑर्डर देण्याची परवानगी मिळविण्याचा ठराव झाला. मशिनरी मागविण्याचे निश्चित झाले. पण ऑर्डर देण्यापूर्वी सध्याचे भागधारक व त्यांचे मित्र यांनी बेचाळीस लाखांचे शेअर्स घेतले पाहिजेत असा निर्बंध सरकारने घातला. त्याप्रमाणे भागधारकांना कळविले. परंतु शेअर्स नकोत ठेवी घ्या, असे भागधारकांनी कळविले. शेवटी आगाशेसाहेबांनी

स्वत: कर्ज काढून आठ लाखांचे शेअर्स घेतले. ते कर्ज भट व तांबे यांनीच आगाशेसाहेबांना दिले होते, त्यावर भरपूर व्याजही घेतले होते. तरी प्रत्येक वार्षिक सभेत आगाशेसाहेबांच्या नावावर असलेल्या शेअर्सबद्दल हाकाटी करून इतर भागधारकांची दिशाभूल करणे, निष्कारण खोटे आरोप करणे व निरर्थक प्रश्न विचारणे चालूच असे. आगाशेसाहेबांच्या शब्दात म्हणजे त्यांची 'धुळवड' चालूच असे.

काही लाभेच्छू, काही पुस्तकी तज्ज्ञ आणि काही कारणामुळे दुखावलेल्या मंडळींनी वार्षिक सभा गाजविल्या. इतर कंपन्यांच्या सभा खऱ्या-खोटच्या मुद्यांवरून गाजतात. त्यात काहीतरी तथ्य असते. परंतु बृहन्महाराष्ट्रच्या सभा विरोधकांच्या पोरकट विधानांनी गाजलेल्या आहेत. १९४९ च्या वार्षिक सभेला श्री. व्ही. एन. दाते नावाचे भागधारक हजर होते. ते म्हणतात–

"मी आज प्रथमच बृहन्महाराष्ट्राच्या सभेला हजर राहत आहे. आतापर्यंत ज्या पद्धतीने सभेचे कामकाज चालले, तसेच कामकाज येथे चालत असेल असे मला वाटते. या सभेला मी प्रथमच आलो असलो तरी इतर ठिकाणी अशा काही वार्षिक सभांना हजर राहण्याचा प्रसंग मला आलेला आहे. पण तेथील कामकाज आणि आज येथे होत असलेले कामकाज यात फरक आहे. ही कंपनी म्हणजे एकटयादुकटयाची, त्याच्या मालकीची नव्हे; ही कंपनी बृहन्महाराष्ट्राची आहे. बृहन्महाराष्ट्राला ललामभूत अशी आहे, आदर्श आहे आणि अशा कंपनीचे कामकाज अशा तऱ्हेने चालावे हे दुर्दैव आहे. संचालकमंडळाने तयार केलेला अहवाल, ऑडिटर्सनी तपासलेला जमाखर्च आपल्या मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे. त्यावर एवढे खुलासे करण्याची पाळी यावी हे बरोबर नाही. हा निव्वळ पोरकटपणा चाललेला आहे. अशा ठरावावरील चर्चा बंद करावी."

एवढे शालजोडीतले मिळाल्यावरही श्री. बर्वे म्हणतात, "मला वाटते ते मी बोलतो, त्यात पोरकट काही नाही." पण समजणारे त्यांचा पोरकटपणा समजत होते.

बृहन्महाराष्ट्राच्या सभा अशा चालत. पत्रके, वृत्तपत्रांत टीकास्पद लेख, आगाशेसाहेबांच्या व्यवहारावर टीका-टिप्पणी आणि आरोपांची बरसात होत असे. पण आगाशेसाहेब ठामपणे उभे राहून विरोधकांना गप्प करीत असत. कृष्णद्वैपायन या टोपण-नावाने प्रभात दैनिकात टीका करणाऱ्या एका लेखकास साहेबांनी एका जाहिरातीद्वारे कालियामर्दनाची आठवण दिली आहे. तरीही श्रीकृष्णासमोर सतरा वेळा पराभूत होऊन आणि जनरल बॉडीत साहेबांचे ठराव एकमताने मंजूर होऊन फजित झालेले हे जरासंध, शिशुपाल, रुक्मी पुन्हा टीकेची शस्त्रे परजत पुढे येत.

याच १९४९ च्या पंधराव्या वार्षिक सभेत अध्यक्ष डॉ. वि. दा. फाटक यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "नोकरीसाठीच धडपडणाऱ्या मराठी माणसांत कारखानदारीची गोडी निर्माण करणे एवढे सोपे काम नव्हते. प्रत्यक्ष ज्ञान व पुस्तकी ज्ञान यांत खूप अंतर आढळते. आतापर्यंत मराठी पांढरपेशा वर्गाला कारखानदारीचे वावडे होते. उद्योगधंद्यात सहन करावे लागणारे टक्केटोणपे त्यांना सहन होत नाहीत. कुठे काही खुट् वाजले की लोकांत धावपळ सुरू होते. त्यांचा गैरसमज करण्यात अनेकांचा हात असतो." डॉ. फाटक यांनी एवढी समज देऊनही प्रा. लिमये, वर्वे वगैरेंवर काही परिणाम झाला नाही. त्यानंतरच्या सभांतूनही ह्या लोकांच्या प्रश्नांची सरबत्ती चालूच राहिली. त्या सर्वांना आगाशेसाहेबांनी आपल्या निवेदनाद्वारे सविस्तर उत्तर दिले.

"१९४५ मध्ये संघाच्या नावाने सिंडिकेटने १६,७९,२१९ रुपयांची रक्कम लिहिली. सदर रक्कम चालू ताळेबंदात 'येणे' या सदरात दाखविलेली दिसेल. सिंडिकेटने जमिनी परत घ्यावयाच्या व सदर रकमेचा दुबेरजी जमाखर्च करावयाचा. कराराची मुख्य शर्त सिंडिकेट उसाकरिता जमिनी संघाकडून घेईल, त्या वेळी बांध-बंदिस्ती, खते वगैरेंवर केलेला, संघाचा झालेला खर्च कंपनी संघास देईल. ही शर्त १९४५ च्या वार्षिक सभेत भागधारकांना कळविलेली आहे; आणि नंतर नफा-तोटापत्रक, अहवाल व ताळेबंद भागधारकांनी मंजूर केला आहे.

"संघाचे मुख्य भागीदार माझे दिवंगत बंधू यांनी सिंडिकेटला १९४५ च्या सप्टेंबरमध्ये वरील शर्तीप्रमाणे १६,७९,२१९ रुपयांची प्रॉमिसरी नोट लिहून दिली व सदर रकमेवर १,६८,००० रुपये ते २,३२,००० रुपयांपर्यंत सिंडिकेटला शेतीचे उत्पन्न म्हणून १९४५ ते चालू ताळेबंदापर्यंत दिले. १९५२ मध्ये माझे कनिष्ठ बंधू दिवंगत झाल्यावर वरील रकमेची प्रॉमिसरी नोट मी लिहून द्यावी, असा एका संचालकाने आग्रह धरला. त्या वेळी उसाचा योग्य भाव ठरवून उसासह सर्व लागण १० वर्षे द्या असे संचालकांना कळविले. वरीलप्रमाणे लागण दिल्यास प्रॉमिसरी नोट लिहून देतो; या १९,७९,२१९ रुपयांपैकी २ लाख रुपये व शेतीचे उत्पन्न १ लाख रुपये मिळून ३ लाख रुपये मी सिंडिकेटला देतो. म्हणजे सिंडिकेटच्या २६ लाख रुपयांच्या शेअरभांडवलावर तीन लाख रुपयांतून शेअरवर १० वर्षे १० टक्के नफा देता येईल; व १०० रुपयांच्या शेअरवर १०० रुपये भागधारकांना मिळेल हे जर मान्य असेल तर मी मॅनेजिंग एजन्सी सोडून देतो. डायरेक्टर बोर्डावर डायरेक्टर म्हणूनही राहत नाही. साखरेचा उतारा ११ टक्के किंवा जास्त मिळावा म्हणून तुमची इच्छा असल्यास सल्लागार म्हणून कारखान्याला माझी गरज असल्यास काम पाहीन."

वरीलप्रमाणे उसाच्या लागवडीच्या ठरावाची कारणपरंपरा आहे. आगाशे यांचा फायदा व सिंडिकेटचा तोटा असला ओंगळ प्रकार लिमये किंवा बर्वे म्हणतात तसा नाही; पण त्यांची तोकडी बुद्धी कशी समजू शकणार? त्यांची चर्पटपंजरीसारखी प्रश्नावली चालूच असे. वर्षानुवर्षे वार्षिक सभेत हे उगाळत असलेला वाद म्हणजे कारखाना भागभांडवलावर चालावा की भागभांडवल पुरेसे जमत नसेल तर ठेवी घ्याव्यात की नाही? फर्गसन कॉलेजचे अर्थशास्त्र विषयाचे प्रा. लिमये यांचा ठेवी घेण्याला सक्त विरोध.

श्री. आगाशेसाहेब यांच्या वैयक्तिक विश्वासावर एक कोटीच्या वर ठेवी बृहन्महाराष्ट्राला मिळून दरसाल दहा टक्के नफा आपल्या शेअरवर देणारी कंपनी असूनही महाराष्ट्रातील लोक ९ टक्के व्याजाची ठेव देणे पसंत करतात हे, अनेक वेळा सिद्ध झाले

होते. तरीपण आ. रा. भट यांचे म्हणणे बँकांची कर्जे व डिबेंचर्स यांना कंपनीची मिळकत गहाण असते. ठेवीदारांच्या ठेवी असुरक्षित असतात. जो कारखाना प्रामुख्याने ठेवींवर उभा राहतो, त्याने आपल्या जिंदगीवर बँका वा इतर कुठलेही कर्ज काढू नये. ती ठेवीदारांची अलिखित सिक्युरिटी समजावी व नैतिक जबाबदारी मानावी. याअनुषंगाने प्रा. लिमये प्रश्न विचारीत. १९५१ च्या सतराव्या आमसभेत श्री. लिमये प्रश्न विचारत होते व आगाशे-साहेब, चेअरमन व ऑडिटर उत्तरे देत होते. आगाशे यांनी जाहिरात दिली होती, 'पन्नास लाखांचे पीक उभे आहे, सिंडिकेटच्या पाच लाखांच्या जमिनी आहेत. वरील रक्कम (इस्टेट) कोठेही गहाण टाकून बोजा केलेला नाही. म्हणून ठेवीदारांचा विश्वासघात केलेला नाही.' या जाहिरातींचा उल्लेख करून प्रा. लिमये यांनी सतराव्या वार्षिक अहवालातील जुना कारखाना व जमीन यावर बोजा केलेला आहे, जाहिरातीतले विधान निरपवाद नाही, असे विधान केले. तेव्हा मॅनेजिंग एजंट आगाशेसाहेब यांनी खुलासा केला की, "प्रा. लिमये यांचा आक्षेप असा आहे की, ठेवीतल्या पैशाने बांधलेल्या इमारती आणि विकत घेतलेली मशिनरी यांच्या तारणावर कर्जे काढून ठेवीदारांचे पैसे 'अनसिक्युअर्ड डिपॉझिट्स' या पंक्तीला बसविले आहेत; व ठेवीदारांचा उघड उघड विश्वासघात केला आहे. हा लिमये यांचा आक्षेप नवीन मशिनरी व नवी इमारत यासंदर्भात आहे. त्याचा खुलासा असा की नवीन मशिनरी किंवा नवी इमारत तारण देऊन सिंडिकेटने कर्ज काढलेले नाही." तरीही लिमये यांनी ताणून धरले. ते म्हणतात, जमीण गहाण आहे असे लिहिले आहे, त्याचे काय ? त्याला त्याच सभेत स्पष्ट उत्तर दिले आहे की, साखरकारखान्याची जमीन म्हणजे प्रामुख्याने उसाखालील जमीन समजली जाते. अध्यक्षांनी तो खुलासा केला. जुन्या मशिनरीवरील बोजासंबंधीही स्पष्टीकरण या सभेत झाले. स्कोडा कंपनीची जी नवीन मशिनरी घेतली तिची किंमत तीस हजार पौंडांनी स्कोडा कंपनीनें वाढविली आणि तेवढी रक्कम पाठवा तर मशिनरी पाठवू असे कळविले.

त्यावर तुमची मशिनरी येऊ द्या, ती आल्यावर तीस हजार पौंड देऊ, तोपर्यंत तुमचा बोजा कंपनीच्या जुन्या स्कोडानेच पुरविलेल्या मशिनरीवर राहील, असे कळविले. बोजा बोजा म्हणतात तो हा. आणि ही जुनी मशिनरी नव्याने घेतलेल्या डिपॉझिट्समधून घेतलेली नाही, तर दहा वर्षांपूर्वी जमविलेल्या भागभांडवलामधून घेतलेली आहे.

प्रा. लिमये केव्हाही आगाशेसाहेबांची भेट घेऊन, चर्चा करून शंकानिरसन करून घेऊ शकले असते. पण विरोधासाठी विरोध करण्याची वृत्ती असल्यावर चांगल्या गोष्टीची निर्मिती कशी होणार ?

ही सतरावी सभा संपली व अठराव्या सभेची तारीख होती २८ जून १९५३. २८ जून रोजी सभा भरली. त्यानंतर १९५४ साली आगाशेसाहेबांची मॅनेजिंग एजन्सी संपणार होती. ती पुढे चालू राहू नये याची नांदी विरोधकांनी १९५२ सालापासूनच केली होती.

१९५३ च्या सभेत अध्यक्ष डॉ. वि. दा. फाटक यांनी सुनावले की, "कंपनीची इभ्रत कमी करण्याचा लिमयेसाहेब, आपण कितीही प्रयत्न केलात तरी तो साध्य होणार नाही. जरा धीर धरलात तर सारे सुरळित होईल. कंपनी बंद पाडलीत तर रुपयाचे चार आणेदेखील मिळणार नाहीत. तुम्हाला २७-६-५३ चा अहवाल वाचून दाखवितो. कंपनीने गेल्या सात-आठ महिन्यांत सुमारे तीस लाखांच्या ठेवी परत केल्या आहेत. आपणांस हे माहीत असताना कांगावा आणि तोही खोटा का करता ?" याच सभेत एका नामवंत भागधारकांनी वरून कीर्तन आतून तमाशा अशा छापाचे भाषण केले. ते म्हणतात, "कंपनीचा ताळेबंद तोट्याचा असल्यामुळे भागधारकांची निराशा झाली असेल. परंतु आज आपणांस भविष्यकालाचा विचार करावयास पाहिजे. संचालकमंडळात एकोपा नसल्यामुळे, हे समजल्यामुळे, लोकांना धास्ती वाटते. तेव्हा संचालकमंडळ कार्यक्षम नसल्यास ते बदला व कार्यक्षम संचालक-मंडळ व मॅनेजिंग एजंट नेमा. स्वार्थत्याग करावयाची त्यांची तयारी

असावी. कंपनीला धोका येईल असे कोणी काही करू नये." ही कंपनी महाराष्ट्राने पुढे आणली आहे असे यांचे म्हणणे.

याचा अर्थच असा होता की, श्री. आगाशे यांना मॅनेजिंग एजन्सीतून काढावे. वास्तविक कष्ट, त्याग आगाशेसाहेबांचे होते. महाराष्ट्रात कंपनी पुढे आणली नाही, तर आगाशेसाहेबांनी अपार कष्टाने कंपनीची भरभराट करून महाराष्ट्र पुढे आणला. सिंडिकेटला महाराष्ट्राचे भूषण ठरविले, आणि अशी खोटी विधाने करणारे, महाराष्ट्राचा खोटा पुळका आलेले लोक कोण, तर ज्यांनी कसलाही धोका नको म्हणून भागभांडवल उभे केले नाही, मोठ-मोठ्या मंडळींची नावे संचालकमंडळावर असताना शेअर्स न घेता ठेवी ठेवण्याची तयारी दर्शविली. ह्याच लोकांनी पत्रके छापली, धनिकांच्या घशात कंपनी घालण्याचा आटोकाट प्रयत्न केला. तेव्हा पण आगाशेसाहेबांनी सभांतून, जाहिरातींतून खुलासा केला.

दररोज १००० पोती साखर निर्माण होईल अशी मशिनरी उभी आहे. सरकारी 'धान्य पिकवा' नियंत्रण नाही. त्यामुळे नुकसानीतले अन्नधान्य पिकविण्याची सक्ती नाही. १० टक्के नफा खात्रीचा आहे. ठेवीदारांना कोणताही धोका नाही. इतक्या नफ्याची कंपनी मिळत असेल तर धनिक लोक ६० लाख किंवा त्यापेक्षाही जास्त रकमेचे शेअर्स घेण्यास तयार आहेत. अशा एका धनिकास ६० लाखांचे शेअर्स जर मंजूर केले तर बृहन्महाराष्ट्र हा मध्यमवर्गीयांच्या मालकीचा कारखाना भांडवलदाराचा होईल. संचालकमंडळ पण तो त्याच्या पसंतीचेच घेईल. या कारणास्तव कंपनी एका धनिकाला शेअर्स देणार नाही; मंजूर करत नाही. मला देखील कमिशनचा लोभ दाखविण्यात आला; आणि इतक्या नफ्याचा कारखाना मिळवून देणाराला खासगीरीत्या का होईना कमिशन मिळणारच. पण हे कशाला? १० टक्के नफा भाग-धारकांना वाटल्यानंतर इतर सार्वजनिक संस्थांना मदत देण्याच्या ध्येयाने सिंडिकेट उभी केली आहे त्याचे काय? म्हणून कमिशनचा लोभ किंवा दुसऱ्या कोणत्याही स्वार्थापोटी या ध्येयाच्या

(मदतीच्या) विरुद्ध ही कंपनी भांडवलदाराच्या स्वाधीन करता येणार नाही. इतके सांगूनही विरोधकांना सुबुद्धी होत नव्हतीच. पण एकच गोष्ट झाली की, या १९५३–५४ च्या वार्षिक सभेत लक्ष्मीनारायण संघाचा तोटा कंपनीने भरून देण्याचा प्रथमचा करार कंपनीच्या भागधारकांच्या सभेत मंजूर झाला. कंपनीचे सर्व हिशोब व अहवाल मंजूर झाला. आगाशेसाहेबांच्या बंधूंनी व त्यांनी स्वतः डोक्यावर घेतलेला बोजा उतरला. तो पण त्यांचा नैतिक विजय ठरला. पण दुःखाची गोष्ट अशी की हे सर्व घडले बंधूंच्या – माझ्या काकांच्या – मृत्यूनंतर.

पुढची जुलै १९५४ ची सभा अगदी वादळी ठरणार अशा अफवा होत्या. कारण आगाशेसाहेबांच्या मॅनेजिंग एजन्सीची मुदत संपणार होती. पण मुदतवाढीचा ठरावच सभेपुढे आला नाही. त्यासाठी खास सभा बोलावण्यात येईल, असे अध्यक्षांनी जाहीर केले. अध्यक्ष जगन्नाथ महाराज पंडित यांनी मॅनेजिंग एजन्सीच्या मुदतवाढीचा विषयच सभेपुढे मतासाठी नाही, असे सांगितले व श्री. आगाशे यांनी पण प्रतिपादन केले. त्यामुळे मूळ वादाचा मुद्दाच संपला असे जाहीर केले तरीसुद्धा यामध्ये काहीतरी डाव आहे, वार्षिक अहवाल व हिशोब वार्षिक सभेत मंजूर झाले की विरोधकांची वासलात लागते, सर्व कारभारास भागधारकांची मान्यता आहे असा अर्थ निघतो म्हणून विरोधकांनी ताणून धरले की, पंधरा सदस्यांनी काढलेले पत्रक रेकॉर्डवर ठेवावे. या लोकांमध्ये श्रीधर फाटक, जठार, परांजपे, गुपचुप, नातू, म. वि. भिडे, कोल्हटकर, प. म. लिमये, द. बा. बर्वे व रँग्लर परांजपेदेखील होते. पण अध्यक्षांच्या विधानानंतर विरोधकांच्या विरोधाची बरसात, आगाशेसाहेबांच्या भाषेत 'धुळवड' अंधारातच राहिली. आणि ५३ सालचे अहवाल मंजूर झाले. प्रा. लिमये यांच्या उपसूचनेला फक्त पाच मते मिळाली. बाकी सर्व 'मंजूर मंजूर' म्हणून मान्य झाले. सभेतील नवल म्हणजे सदैव विरोध व टीका करणारे बर्वे बोलते झाले की, "श्री. आगाशे यांनी वीस वर्षे जे कर्तृत्व दाखविले व रक्ताचे पाणी केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद

देईन." आगाशेसाहेब म्हणाले, "माणसाने सुसंगत बोलावे." या सभेत पाचजण सोडून सर्वांची संमती व गैरहजर असणाऱ्या भागधारकांच्या चौतीस हजार शेअर्सच्या प्रॉक्सीज आल्या.

१९५४च्या काळात आगाशेसाहेब वरचेवर म्हणत असत की, आपल्या शब्दाबरोबर लोकांनी दिलेल्या ठेवी परत करण्याची जर कुणी हमी देईल तर मी मॅनेजिंग एजन्सी सोडेन. पण विरोधकांना जबाबदारी नकोच होती. त्यांना फक्त दिसत होता नफ्याचा गोळा. हजार टनी मशिनरी सुरू झाल्याने १९५४ पासूनचा ताळेबंद वीस, तीस, चाळीस लाखांच्या नफ्याचा दिसणार होता. आगाशेसाहेबांचे 'साखरकारखाना पैशाचा पाऊस पाडेल' हे भाकीत खरे ठरणार होते.

१९५४ म्हणजेच १८-८-१९५४. या वेळी मॅनेजिंग एजन्सीबाबत संचालकमंडळाच्या सभेत त्यांनी पास करून घेतलेला ठराव हा त्यांची बुद्धिमत्ता, वकिली कौशल्य व कायद्याचा सखोल अभ्यास यांचे दर्शन घडविणारा आहे. संचालकमंडळाने ठराव केला की, कंपनीला नवे मॅनेजिंग एजंट नेमण्याची व्यवस्था होईपर्यंत सध्याच्या सी. जी. आगाशे कंपनीनेच मॅनेजिंग एजंट म्हणून काम पाहावे. कायद्याप्रमाणे मॅनेजिंग एजंट (नवा) नेमण्यास १५ जानेवारी १९५७ पर्यंत मुदत होती. हा ठराव केंद्र सरकारच्या कंपनी खात्याकडे पाठवावा व परवानगी मागावी, असा ठराव संचालकमंडळाने केला व हा ठराव पुढच्या खास बोलाविलेल्या सभेत प्रचंड बहुमताने पास झाला. खरे तर विरोधकांना शहाणपण यावयास पाहिजे होते, पण आले नाही. आता त्यांनी 'बृहन्महाराष्ट्र कंपनी' करमसीभाईंना विकून टाकण्यासाठी आटोकाट प्रयत्न सुरू केले. भागधारकांची दिशाभूल करून सी. जी. काळे यांच्या मार्फत शेअर्स खरेदी केले. पण कंपनीच्या मूळ ठरावामुळे करमसीभाईंना शेअर्स घेता येणे अशक्य झाले व कंपनी गिळंकृत करण्याचा त्यांचा व अलीकडच्या भाषेत बोलायचे झाल्यास त्यांच्या हस्तकांचा डाव सपशेल उधळला. सत्य व प्रामाणिकपणाचा तो विजय ठरला.

पण आगाशेसाहेबांचे आयुष्य संपत होते. ते कणाकणाने झिजत होते. त्या लढ्यात विजयी झाले तरी तो आनंद भोगण्यास ते राहिले नाहीत.

१९५५–५६ मध्येही बाटलीबॉय कंपनीच्या चारशे पानी अहवालास चारशे पानी उत्तर देऊन आगाशेसाहेबांनी त्यांची खोटी विधाने खोडून काढली आहेत. तो अहवालही दप्तरी बंद झाला. सर्व कष्ट, त्रास संपत आलेला असताना आयुष्यच कमी पडले. इतका उत्तम प्रकारे चाललेला साखर-उद्योग प्रा. लिमये, वर्वे, भट व काळ्यांसारखे इतर काळे लोक यांनी करमसीसारख्या धनिकांच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न करणे म्हणजे 'साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी। बोलविता धनी वेगळाची ॥' म्हणजेच (करमसी) असे असताना आगाशेसाहेबांनी मात्र–

'जिंकू किंवा मरू। माणुसकीच्या शत्रुसंगे युद्ध आमुचे सुरू ॥' असा लढा दिला.

# कर्मपूजक आगाशेसाहेब

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचे ऑफिस लक्ष्मी रोडला कॉमनवेल्थ बिल्डिंगमध्ये दुसऱ्या मजल्यावर होते, आजही तेथेच आहे. तर ह्या मुख्य कचेरीत आगाशेसाहेबांचे कामकाज चालत असे. त्यांचा देवावर दृढविश्वास होता. ऑफिसमध्येही छोटेसे देवघर होते. तेथे चांदीचे तबक, वाट्या, हळदीकुंकू, तांब्या-भांडे, फुलांसाठी तबक व एक सुबक पांडुरंगाची मूर्ती होती.

ऑफिसचे काम चालू करण्यापूर्वी ते मूर्तीसमोर चिंतन व मनन करीत असत, आणि मगच मॅनेजिंग एजंटच्या खुर्चीत स्थानापन्न होत असत. अनेक मंडळींना त्यांच्या या देवाबद्दलच्या श्रद्धेबद्दल कुतूहल व नवल वाटे. पण आप्तेष्टांपासून मित्र-शत्रूंपर्यंत त्यांची कसोटी पाहावी असा योग असल्यामुळेच म्हणा, हा पांडुरंगच त्यांचा जिवाचा सखा होता. त्यांनी पुण्याच्या या कचेरीत अनेक फोटो लावलेले होते. ते फोटो एक छंद म्हणून लावलेले नव्हते तर त्यामागेही काही निष्ठा होत्या. याबद्दलची आठवण श्री. चाफेकरसाहेबांनी फारच छान शब्दांत लिहिली आहे–

"आगाशेसाहेबांनी अढळ निष्ठेचे प्रतीक म्हणून ध्रुव-नारायणाचे चित्र; प्रयत्न भगीरथासारखे पाहिजेत म्हणून गंगावतरणाचे चित्र लावले होते. उद्योगधंद्याच्या क्षेत्रात मध्यमवर्गीयांचे साहाय्य घ्यावे ही स्फूर्ती मावळ्यांचे साहाय्य घेऊन स्वराज्याचा संकल्प सोडणाऱ्या छत्रपतींकडून घेतली, म्हणून शिवछत्रपतींचे छायाचित्र आपल्या समोरच्या बाजूला लावलेले होते. अधिकरण आहे, कर्ता आहे, कारण आहे व विविध प्रयत्न आहेत पण भगवंताचे अधिष्ठान

पाहिजे असे सांगणाऱ्या श्रीसमर्थांचे चित्र तेथे लावले. जनसेवा हीच ईश्वरसेवा म्हणणारे न्यायमूर्ती रानडे आणि निष्काम कर्म कर, केवळ 'मामनुसर युध्य च' असा कर्मयोगपर अर्थ लावणारे लोकमान्य टिळक यांचेही चित्र होते. ज्ञानोपासनेची स्फूर्ती देणारे श्री ज्ञानेश्वर महाराज व सर्वसाक्षी भक्तकल्पद्रुम पांडुरंग यांचे फोटो होते. त्यांना नमस्कार करूनच ते कामाला सुरुवात करीत. ते अशा वातावरणात राहत म्हणून सिद्धी पावले."

आगाशेसाहेबांनी १९३६ मध्ये ह्या चित्रांच्या निवडीमागील रहस्य श्री. चाफेकरसाहेबांना सांगितले आहे.

सर्वच जबाबदाऱ्या एकट्याच्या शिरावर घेतल्यामुळे ऑफिसचे वक्तशीर वेळापत्रक त्यांच्या स्वभावाला कधी मानवले नाही व जमलेही नाही. या सर्वात एक गमतीचा भाग म्हणजे त्यांच्या बसावयाच्या खुर्चीमागे त्यांनी एक पाटी लावली होती– 'गरजवंताला अक्कल नसते.' कुणी माणूस विनाकारण काही तक्रारी घेऊन आला तर ते त्याला समजावत व तो समजलाच नाही व ताशेरे झाडू लागला तर पाटीकडे बोट दाखवीत. अनेक गैरसमज झालेल्या ठेवीदारांच्या बाबतीत हा किस्सा घडत असे. कचेरीत आले की साखरउत्पादनाचा तक्ता त्यांचेपुढे ठेवला जाई. सकाळच्या वर्तमानपत्रांत आलेली बरी-वाईट टीका-स्तुती, एकंदर वार्ता यांचा परामर्श ते घेत. त्याबरोबरच टपालाने येणारे ठेवींचे अर्ज व ठेवी मागणारांची पत्रेही त्यांच्यासमोर असत. कंपनीच्या ऑफिसमध्ये कारखान्याची साखर घेण्याकरिता व्यापारी येत. त्यामध्ये पुण्याचे प्रसिद्ध व्यापारी विठ्ठलदास साखळचंद, सांगलीचे गोविंदराम शोभाराम, अकलूजचे व्होरा आणि कंपनी, रामचंद मोतीराम फडे, पंढरपूरचे पाच-दहा व्यापारी ही मंडळी असत. त्यांच्याशी साखरेचे सौदे करताना, त्यांच्याशी बोलताना चांगले संबंध, चांगली नाती प्रस्थापित करणे व हे सर्व कायम राहील असे धोरणात्मक निर्णय घेणे जरुरीचे होते. ते आगाशेसाहेबांनी इतक्या उत्कृष्ट तऱ्हेने व पद्धतीने घेतले की सर्व व्यापारी आजतागायत त्यांच्या व्यापारी नीतीचा गौरवाने उल्लेख करतात.

साखरउत्पादनाचा मोठा आधार म्हणजे उत्तम ऊस व साखरेचा उत्तम उतारा. या दोन्ही गोष्टींवर त्यांचे बारीक लक्ष असे. आपण आजारी माणसाच्या औषधाची व्यवस्था जशी काळजीपूर्वक करतो तद्वतच आगाशेसाहेब पिकांची काळजी घेत असत. एक आठवण अशी सांगितली जाते की, शेतकी अधिकाऱ्यांनी तक्रार केली की, उसाला पुरेसे खत, पेंड मिळत नाही. त्या तक्रारीचे प्रतिध्वनी संचालकमंडळापर्यंत गेले. स्वत: चेअरमन शेतीवर जाऊन पाहणी करून आले. पण खताचा खर्च दोन लाखाच्या वर लागतो आहे हे कळल्यावर त्यांना साहेबांच्या अडचणीची कल्पना आली. कारण भांडवल कमी व खर्च जास्त ही परिस्थिती होती. तरीसुद्धा अनेक प्रयत्नांती पैशाची सोय माझे वडील करीत असत. व्यापाऱ्यांकडूनच कर्ज घेत, उसाला खतपुरवठा होई, पीक जोरदार आले की त्या उभ्या पिकावर बँक कर्ज देई व परत सर्व व्यवस्थित होई.

कचेरीत येणाऱ्या पत्रांमध्ये कोणाच्या तक्रारी असत, त्यांचा परामर्ष हळुवार शब्दांनी ते स्वत: घेत. एखादा ठेवीदार प्रचंड गैरसमज करून रागाच्या भरात आवाज चढवू लागला तर आपल्या सेवकाबरोबर खास टॅक्सी करून त्याला फॅक्टरीवर पाठवीत, तेथे उभे असलेले भरदार फड दाखवीत, हा धंदा कसा फायदेशीर आहे पण दमदार कसा करायचा हे पटवून देत. जाहिरात किंवा लेख यापेक्षा प्रत्यक्ष दर्शन हे अधिक प्रभावी ठरल्यामुळे हे रागावलेले ठेवीदार आपली ठेव मागण्याऐवजी ठेवीची मुदत वाढवून देत व आणखी नवी ठेवही ठेवत. इतरांना हा एका व्यक्तीसाठी केलेला एवढा खर्च अनाठायी वाटत असे. पण वृत्तपत्रातील स्पष्टीकरणापेक्षा ही या ठेवीदाराची बोलकी जाहिरात अधिक महत्त्वाची आहे असे साहेब म्हणत. श्री. पाटणकर नावाच्या एका ठेवीदाराच्या बाबतीत असे घडले होते. आर्थिक अडचणी नित्याच्याच होत्या; तरी कचेरीत काम करणाऱ्या सेवकांना व तेथे येणाऱ्या इतर लोकांना कसे सांभाळावे याची हातोटी आगाशेसाहेबांना साधली होती.

सेवकांकडून उत्तम काम व्हावे म्हणून त्यांची निवड ते पात्रता पाहूनच करत. तसेच त्यांच्या अपेक्षा जास्त वाढू न देता, त्यांच्या मनात पितृतुल्य वागणुकीने कंपनीबद्दल, कारखान्याबद्दल आस्था व निष्ठा निर्माण करत. प्रसंगी रागावतही असत, परंतु त्यामध्ये कंपनीचे हित व व्यक्तीच्या कामात सुधारणा ही दृष्टी असे. पेंडीचे व्यापारी किंवा कोणीही त्यांची बिले, देणी मागण्यास आले व पैशाची चणचण असली तर आगाशेसाहेबांच्या बोलण्यामुळे, त्यांच्यावरील विश्वासामुळे ते पैशासाठी कटकट न करता, पैसे मिळाले नाहीत तरी नवी ऑर्डर घेऊन जात. पुण्याच्या ऑफिसमध्ये आगाशेसाहेब व त्यांचे सेवकही रात्री आठ-नऊ वाजेपर्यंत सुद्धा काम करत व अनेकदा त्यानंतर बोरगावला जाण्यास साहेब निघत. फॅक्टरीवर आगाशेसाहेबांचे आगमन झाले की तेथील सर्व आसमंतात एक आदर व आदब यांचा साक्षात्कार वाटे, अशी आठवण तेथील अधिकारी सांगतात. भोवतालची सधन, श्रीमंत मंडळी तर त्यांना मानतच पण सामान्य शेतकरी, कारखान्याचे खंडकरी त्यांना देवासमान मानत. विशेष म्हणजे सोलापूर जिल्ह्यात सापडणारे रामोशी, पारधी यांच्यासारखे गुन्हेगारीचा टिळा लागलेले लोकसुद्धा आगाशेसाहेबांपुढे नतमस्तक होत. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटचा पसारा मोठा पण त्यातील कोणत्याही वस्तूला कोणी हात लावणार नाही. वेळप्रसंगी सुगीच्या काळात ज्वारी, हरभऱ्याची पोती उघडचावर असायची, केवळ एक-दोन राखणदारांवर संपूर्ण शेतीची, गुदामाची रखवाली होत असे. आजही आगाशेसाहेबांचे नाव निघाले की 'असा माणूस होणे नाही' असे उद्‌गार निघतात. माझ्या काकांना व वडिलांना गोधनाचे फार अप्रूप होते. सुबत्ता आल्यानंतर कारखान्यावर ५०० बैल व ४०० गायी होत्या. प्रत्येक सेक्शन ऑफिसरच्या घरात गोरस पोहोचायचे. गोठ्यातील २०० म्हशींचे दूध डेअरीला विकायला जायचे. या गोधनाला तुरीचा भरडा व पेंड घातली जाई. एखादी गाय साहेब आले आणि हंबरली तर तिला त्यांच्या हातून गवताच्या पेंडीचा घास मिळे. आमच्या काकांचाही एक

लाडका खोंड होता. काकांनी हाक मारली की लगेच तो त्यांच्या-जवळ जाई व गोंजारणे वगैरे लाड करून घेई.

कारखान्याच्या साखरेची व कारखान्याला लागणाऱ्या मालाची ने-आण बैलगाड्यांतूनच होत असे. अशा पशुधनाचा श्रावण-पोळा कारखान्यावर मोठ्या उत्साहाने साजरा होई. गोठ्यातले पाचशे बैल नटवून-सजवून, वाजत-गाजत मिरवणुकीने न्यायचे. आगाशे-साहेब व काका काही वेळा या समारंभात सामील व्हायचे. त्यातील कोणते बैल देखणे आहेत यावर त्यांची नजर राही. कारखान्याचे सर्व खिलार दृष्ट लागण्यासारखेच होते. माझ्या आठवणीतही या सर्व गोष्टी आहेत. सर्व पंचक्रोशीतील लोक हा बैलपोळ्याचा सोहळा पाहण्यास येत असत. आगाशेसाहेब अतिशय उत्साही होते. त्यांना कोणत्या गोष्टीत रस नाही असे नव्हतेच.

सकाळी त्यांची फेरी आपल्या शेतावरून होत असे. ऊस, कापूस, कुठे अन्नधान्य, कुठे भाजीपाला असलेली विविध पिकांखालील जमीन खंडाने घेतलेली व खरेदी केलेली अशी दोन्ही प्रकारची होती. सुरुवातीला तर आगाशेसाहेब हा फेरफटका सायकलवरून करीत. चाळिशीतला हा उमदा मालक सायकलवरून शेतीच्या पाहणीस निघाला की लोकांच्या नजरा आपोआप वळत. मग या प्रभातफेरीत गरजू मंडळी आपापली गाऱ्हाणी व मागणी साहेबांच्या कानावर घालीत. आगाशेसाहेब मनाने अतिशय श्रीमंत होते. कपाशीच्या शेतात तीन तोडे होत असत, चौथा तोडा ते पीक घेणाऱ्या शेतकऱ्याला मोफत देत असत. आपल्या जमिनीत जास्तीत जास्त पीक निघावे म्हणून सेक्शन अधिकाऱ्यांमध्ये स्पर्धा लावीत असत. कारखान्याच्या शेतीचे दहा सेक्शन्स होते. खोडवा व आडसाली दोन्हीत जो सेक्शन अधिकारी उसाचे जास्त उत्पादन काढेल त्याचे कौतुक करीत व बक्षिसी देत. चांगल्याचे कौतुक हे इतरांना नकळत सुधारणेची सूचना व अपेक्षा व्यक्त करून जाई. एखाद्या सेक्शनमध्ये अडचण असेल तर ती समजून घेऊन आपल्या बरोबर असणाऱ्या अधिकाऱ्याला सूचना देत असत.

जमीन आणि शेती हे आगाशेसाहेबांचे आवडते विषय होते. इंदापूरला आल्यानंतर कारखान्याकडे गाडी वळली की शेजारी बसलेल्या माणसाला म्हणत, "येथून मैलोन् मैल कारखान्याची हिरवीगार उसाची शेती दिसली पाहिजे, हे माझे स्वप्न आहे." भाटघर धरणाच्या पाण्यावर निघालेल्या २१ क्रमांकाच्या फाट्यावरील हा कारखाना खूप मोठा होऊन त्याकरिता हजारो टन ऊस लागणार हे ते ओळखून होते. भाटघर धरणाच्या खाली नीरा नदीवर वीर धरण होणार होते. त्या पाण्यावरही उसाचे बरेचसे ब्लॉक दिले जाणार होते. ते ब्लॉक मिळविण्यासाठी प्रयत्न करावयाचे आणि त्यासाठी जमीन हवी म्हणून वेळापूर, मळखांबे येथे त्यांनी जमिनीही घेतल्या. त्यालाही विरोधी आवाज निघालाच. परंतु तीस वर्षांच्या भाडेपट्ट्याने घ्यावयाच्या मालकांसाठी ते सांगत, "या श्रावणात जे भाडेपट्टा करतील त्यांना त्या वर्षाचा खंडही मिळेल व जमिनीतील उभे पीकही त्यांच्या मालकीचे राहील." नडलेला शेतकरी सावकाराच्या कर्जात असे. त्यांना पुढील दोन-तीन वर्षांचा खंड आगाऊ देत असत. ज्यांची घरगुती अडचण असे त्यांना आगाशेसाहेब दोन-तीन हजारापर्यंत कर्जही देत असत. या त्यांच्या धोरणामुळे, हा पुण्याचा बामण आपली शेती बळकावण्यास आलेला नाही, तर सर्वांच्या जीवनात विविध तऱ्हेचा विकास साधण्यासाठी हा कारखाना उभा राहत आहे, हे त्यांना पटत असे. त्यामुळेच त्या भागातील शेतकऱ्यांनी बृहन्-महाराष्ट्र शुगर सिंडिकेटला सतत सहकार्य दिले आहे.

शेती आणि शेतकरी यांची पाहणी, फेरफटका झाल्यानंतर आगाशेसाहेब कंपनीचे गेस्ट हाऊस – जे काकांचा पत्रा या नावाने ओळखले जाई, तेथे येत. तेथे भावाभावांच्या गप्पा, कामकाजाबद्दल चर्चा होत असे, निर्णय घेतले जात. आगाशेसाहेब नेहमी म्हणत, "एकदा कारखान्याचा आराखडा पूर्ण झाला की मी त्याचे दोन विभाग करणार. एक शेतीचा व दुसरा साखरनिर्मितीचा. मी मोठी जमीन घेणार. माझ्या बरोबर या अवघड प्रवासात जी मंडळी आहेत, त्यांनाही मी शेतकरी बनविणार व आयुष्याचा

उत्तरार्ध पांडुरंगाच्या परिसरात एक सुखी शेतकरी म्हणून माझा वृद्धापकाळ व्यतीत करणार." पण देवाच्या मनात वेगळेच होते. त्यांची इच्छा अपुरीच राहिली. कारखान्यात आल्यानंतर त्यांचे लक्ष प्रथम आपल्या उसाची जी साखर होते त्याचा उतारा काय पडतो व गळित किती होते याकडे असे.

केसरी दैनिकात एक तज्ज्ञ या नावाखाली एक लेख आलेला होता. त्या लेखाला त्यांनी सविस्तर उत्तर दिले होते. साहेब म्हणतात– "उत्तर हिंदुस्थानात जो ऊस होतो, त्या उसाच्या १०० टनामागे ९ ते १० टन साखर तयार होते आणि महाराष्ट्रातील उसातून १०० टनामागे ११ टन साखर तयार होते. यालाच साखरेचा उतारा म्हणतात. या साखरेला दर टनी भाव रु. २६२/- आहे. याचा अर्थ महाराष्ट्रातील कारखानदारांना १०० टन उसापासून रु. ५२५/- जास्त मिळतात व त्यातून खतांचा खर्च भागवता येतो. उपमा द्यावयाची तर दूध जास्त पण कस कमी, त्यामुळे लोण्याचे प्रमाण कमी, आणि आपल्याकडे दूध थोडे पण कस जास्त; म्हणून ११ टक्क्यांपेक्षा उतारा येणारा कारखाना फायद्यात चालेल." उसाच्या जातीविषयी लिहिताना ते म्हणतात की, "ह. के. व इ. ओ. जे. या जातीचा ऊस महाराष्ट्रात दर एकरी ४० ते ५० टन येतो असा अनुभव आहे. वरीलप्रमाणे दर एकरी उसाचे पीक आणि ११ टक्के उतारा महाराष्ट्रीय कारखानदारीने कायम टिकवल्यास महाराष्ट्रातील साखर कारखान्याला भीतीचे कारण नाही." १९३५ मध्ये म्हणजे ५६–५७ वर्षांपूर्वी आगाशेसाहेबांनी व्यक्त केलेले मत त्यांच्या सखोल अभ्यासाचे व दूरदृष्टीचे द्योतक आहे हे नक्की. आजची महाराष्ट्रातील साखरकारखान्यांची प्रचंड वाढ आणि प्रगती यांचे भविष्यकथन आगाशेसाहेबांनी केलेले आढळते.

कारखान्यात ते शिरल्याबरोबर त्यांचा मोर्चा प्रयोगशाळेकडे वळत असे. आपल्या कारखान्यातला साखरेचा उतारा किती पडतो व तो कसा वाढवता येईल, याचा विचार करून त्या काळात सुद्धा पाडेगाव येथे उत्पादनातील संशोधनसंस्था होती, तिच्याशी संपर्क साधला जाई. या कारखान्याने एका विशिष्ट काळात १३.२ एवढा

उतारा आपल्या स्वतःच्या शेतीतून निर्माण झालेल्या उसापासून काढून दाखवला आहे. पाडेगाव या संशोधनसंस्थेचे शोधकार्य सतत चालू असते. सी. ओ. ४१९ व पी. ओ. जे. २८२८ या जाती त्या फर्मने नव्याने शोधून काढल्या आहेत. कोणत्याही साखर-कारखान्याच्या साखरेचे प्रमाण उच्च प्रतीचे राखण्याकरिता त्याची प्रक्रिया ही केवळ उसाची जात, त्यातील साखरेचा अंश आणि प्रयोगशाळेवर अवलंबून नसून त्या कारखान्याचे प्रत्येक चक्र व्यवस्थित चालले तरच गव्हाणीत टाकलेल्या उसाचा रस पूर्णपणे काढून त्यावर प्रक्रिया होऊन साखर बाहेर पडते. तिच्या दाणेदारपणा व शुभ्रतेवर बाजारभाव अवलंबून असतात. अर्थात आगाशेसाहेब या प्रत्येक टप्प्यावर अभ्यासपूर्ण लक्ष देऊन उभे असत.

त्यांच्या मनात तेव्हापासूनच १००० टनी साखर कारखान्याची कल्पना होती, ती अमलात आणली. त्यांचे वैशिष्टच असे– शेतकऱ्यांपासून मध्यमवर्गापर्यंत सर्वांचा हातभार लागलेली त्या वेळची लिमिटेड पण खऱ्या अर्थाने 'सहकारी' कंपनी उभी राहिली. सहकारी तत्त्वाचे अलीकडील साखरकारखाने, त्यांच्या तत्त्व व व्यवहाराची पायाभरणी शोभेल, असा हा एकच कारखाना होता. म्हणून आगाशेसाहेबांना या क्षेत्रातील द्रष्टा म्हणून संबोधणे अधिक सयुक्तिक आहे.

कारखान्यातील यंत्रे आणि तंत्रविभाग हा आगाशेसाहेबांचा खास शिकणे आणि शिकवणे यांचा विभाग. ते स्वतः वकील– एलएल. बी., पण त्यांना प्रत्येक गोष्टीत तज्ज्ञांनीही चकित व्हावे असे गम्य होते. मनुष्य तज्ज्ञ असला किंवा पदवीधर झाला तरी तो कारखानदार बनतोच असे नाही. जे लोक मोठ्या धंद्यात शिरतात ते स्वतः फारसे शिकलेले असतातच असे नाही. त्यांची शैक्षणिक पदवी, पात्रता फारशी नसली तरी हुशार इंजिनिअर, केमिस्ट बनण्याची क्षमता त्यांच्या बुद्धीला लाभलेली असते. आगाशेसाहेब पदवीधर तर होतेच पण कारखान्याच्या दृष्टीने लागणारी बुद्धीची प्रगल्भता ही त्यांच्या ठायी होती. श्री. चाफेकरसाहेब एका आठवणीत सांगतात– आगाशेसाहेबांचे फॅक्टरीकडे बारीक लक्ष


होते. ते कधी कुणाला रागाने वेडेवाकडे बोलत नसत. कारखान्याचे अधिकारी आणि कामगारांवर त्यांचा पूर्ण विश्वास. पण अडचणीच्या वेळी कुणी स्वतंत्रपणे विचार केला नाही तर स्वतःशीच म्हणत, 'इतकी माणसे ठेवली आहेत, पण कुणाचा उपयोग नाही.' एकदा कारखान्याचा गळित हंगाम तोंडाशी आला असताना यंत्रातले कॉपर फाइल खराब झालेले होते. ते नीट करून घेण्यासाठी मुंबईच्या रिचर्डस् क्रूडास कंपनीकडे जावे लागे. ती कंपनी सहा हजार रुपये कामापोटी आगाऊ घेई आणि फाइलसचा पुरवठा सहा महिन्यांनी करे. कारखान्याचा सीझन तर तीन महिन्यांवर आलेला, तो सुरू झालाच पाहिजे. काय करावे हा प्रश्न होता. चाफेकर-साहेबांनी सुचवले, "आपण इथेच प्रयोग करू या. शिलकेतील एखादी कॉपर फाइल खराब झाली तर चालेल का?" आगाशेसाहेब एकदम प्रभावित झाले. त्यांना तेच हवे होते. कुणीतरी स्वतःच डोके चालवावे, आपल्या समस्येला सामोरे जावे असे त्यांना वाटे. चाफेकर-साहेब व त्यांच्या हाताखालच्या मंडळींनी ही कॉपर फाइलची समस्या दीड महिन्यात सोडविली. आगाशेसाहेबांनी लगेच दोन हजार रुपये चाफेकरांच्या हाती दिले. ती बक्षिसी चाफेकरांनी सर्वांना वाटली. आगाशेसाहेब जसे रागावत, नाराज होत तसे एखाद्या प्रयत्नाचे कौतुकही भरल्या हाताने करत असत. चाफेकरांना ते म्हणाले, "विलायतच्या तोडीची दुरुस्ती तुम्ही केली आहे." चाफेकरसाहेब हजरजबाबीने म्हणाले, "तीही माणसे व आम्हीही माणसेच. आम्हाला पण कळत नाही का? पण संधी मिळाली पाहिजे." मनातली गोष्ट बोलल्यामुळे साहेब मनापासून हसले. व्यापाराबाबत पण आगाशेसाहेब म्हणत– "गुजराथी, मारवाडी करतात तो व्यापार मराठी माणसांना का करता येऊ नये?" ही त्यांच्या मनातील बोच होती.

कारखान्याची मशिनरी उभी राहताना किंवा यंत्रे काम देत असताना आगाशेसाहेब तेथे तासन् तास ठाम उभे राहत. प्रत्येक गोष्ट आपल्या नजरेतून गेली पाहिजे हा त्यांचा कटाक्ष. मग थोडेफार खटकेही उडत.


तंत्रज्ञाचे मत आणि कामाची रीत एका चाकोरीतली, तर आगाशेसाहेबांचा स्वभाव नवे प्रयोग करण्याचा. एकाला पुस्तकातला आधार हवा तर दुसऱ्याला व्यवहारातला दाखला महत्त्वाचा वाटे.

कारखाना उभा राहताना इमारती कशा असाव्यात, लोकांच्या राहण्याच्या जागा कोठे, कशा असाव्यात यांचे साहेबांचे आराखडे इतरांशी नेहमी जुळतच असे नाही. मतभेद झाले की साहेब संतापत, 'पाडून टाका हे काम' म्हणत. पण ते क्षणिक असे. संबंधिताने शांतपणे त्याची रीत सांगितली तर मान्यता देत किंवा आपले म्हणणे त्या अधिकाऱ्याला पटवून देत. कारखान्याच्या यांत्रिक, तांत्रिक विभागात एकदा समस्या निर्माण झाली. गोडबोले नामे केमिस्टांना साखरेचा उतारा पुरेसा पडत नाही, अशी समस्या आली. आगाशेसाहेबांनी पुस्तके वाचून, अभ्यास करून त्यांना सुधारणा सुचविल्या आणि उतारा बरोबर येऊ लागला. फॅक्टरीच्या उभारणीपासून नंतर मशिनरी, इमारती यांची कामे त्या त्या कामाचे कंत्राटदार करत, आगाशेसाहेबांची देखरेख असे. या कारखान्याला अनेक तज्ज्ञ व शिक्षित मंडळींची गरज होती. परंतु सेवकभरती ही अत्यंत नाजूक जबाबदारीची समस्या सोडवताना आगाशेसाहेबांचे कौशल्य, उदारता आणि उपयुक्तता या कसोटचा लागल्या. श्री. चाफेकर हे निर्भय, निःस्पृह व प्रसंगी फटकन मत सांगणारे, स्वतंत्र बाण्याचे अधिकारी त्यांनी मुद्दाम आमंत्रण देऊन कारखान्यात आणले. श्री. चाफेकरसाहेब म्हणतात, "आगाशे-साहेबांच्या बरोबर काम करण्यात एक आनंद होता. त्यांची वागणूक एका कुटुंबातील कर्त्या पुरुषासारखी होती. पण अशी विलक्षण जादू या माणसाजवळ होती, की त्यांच्या शब्दासाठी काहीही करायला अनेकजण पुढे येत. असा माणूस, असा थोरपणा विरळाच. तिथेच राहणाऱ्या शेतकरी लोकांचे नातेवाईक व मुले यांना पण त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांनी नोकरीवर घेतले."

ऊस कारखान्याच्या मालकीचा. त्याची पेरणी, जोपासना कारखान्यातर्फे, पण तेथे कामगार त्याच जमिनीचे मालक.




मांगदरीतील श्रीराम



एक दुर्मिळ छायाचित्र



(वै.) जगदिश तथा पंडितसाहेब व श्री. ज्ञानेश्वरसाहेब



इवलेसे रोप.... मामासाहेबांच्या
हातची एक आठवण

कारखान्याच्या भागातील शेतकरी आपली बैलगाडी घेऊन कामाला हजर. शेतीच्या कामाला लागणारे बैल पिकाची व त्यातून होणाऱ्या साखरेची वाहतूक करीत. पूर्णपणे वर्षातले किमान आठ महिने बेकार असलेल्या शेतकऱ्याला बाराही महिने काम देणारा हा कारखाना म्हणजे बोरगावच्या दारिद्र्यावर संजीवनी ठरली. आपल्या कारखान्याची शेती व ऊसउत्पादन उत्कृष्ट दर्जाचे व्हावे ही आगाशेसाहेबांची दृष्टी असल्यामुळे शेतीखात्याकडे असलेले गांगल व त्यांचे सहकारी यांच्या आठवणीतून 'चंद्रशेखर'च दिसून येतो. श्री. चंद्रकांत वाघमारे आपल्या आठवणीत सांगतात— आगाशेसाहेबांना हाती घ्यावे त्या गोष्टीचा संपूर्ण, सखोल अभ्यास ही सवयच. उसाची शेती चांगली होण्याकरिता त्यांनी खूप प्रयत्न केले. त्या वेळी युरिया खताची ओळख शेतकऱ्याला नुकतीच झाली होती. कारखान्याच्या उसालाही नुसती पेंड हेच खत दिले जाई. युरिया खताचा गुण असा की एका आठवड्यातच ते उसाला लागू पडायचे. उसाची वाढ त्वरित होई. म्हणून त्यांनी कारखान्याच्या शेतीत 'रॅपिड केमिकल मेथड' नावानें ओळखली जाणारी युरिया वापराची पद्धत सुरू केली. इस्टेट मॅनेंजर भांडारकर यांना आगाशेसाहेबांनी सांगितले की, या पद्धतीत उसाच्या बाजूने लहान लहान बांध घालून, त्या बांधाच्या बाजूनें चाऱ्या काढावयाच्या व त्यात पाणी सोडायचे. त्या पाण्यात मी पाठवितो ते खत सोडायचे. त्या वेळी या नवीन खताचा प्रयोग करण्याचे ठरविले; व प्रयोग नुसता तोंडी न सांगता प्रत्यक्ष पाहणीसाठी आपण येणार असल्याचे त्यांनी कळविले. त्याच जागी युरियाचा वापर केला होता. आगाशेसाहेब येणार म्हणून गडबड उडाली. तेथे रस्ता वगैरे तयार करून भांडारकर व मंडळी वाट पाहत होती. त्यांनी गाडीतून उतरल्याबरोबर एकूण पिकाची परिस्थिती पाहिली व सर्व पाहणी झाल्यावर त्यांचे समाधान झाले. त्या वेळी बँका उभ्या पिकावर कर्ज देत असत, तशी युरियामुळे भरघोस आलेल्या ऊसपिकावर आगाशेसाहेबांना हवी तेवढी रक्कम बँकेने दिली. आपले पाहुणे, ठेवीदार व भागधारक यांना कारखान्याची हद्द सुरू होताच उसाचे

फड दिसले पाहिजेत असे त्यांनी ठरवले. त्यासाठी कारखान्यातून निघालेली मळी कॅनॉलच्या कडेला पसरून द्यावयाची, तेथे उसाची लागण होईल अशी जमीनच तयार करावयाची. त्यात पेरणी केलेल्या उसाला पाणी द्यावयाचे, कारखान्याच्या परिसरात पाऊल टाकल्याबरोबर हिरवीगार शेती डोलली पाहिजे असा त्यांचा मानस होता आणि त्यांच्या जाहिराततंत्राचा तो एक भागही होता. आगाशेसाहेब सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करत. त्या भागातील बोरगावमधील लोकांनाच काम मिळावे म्हणून त्या भागातील भूपुत्र नोकरीत ठेवले. कारखान्यात गरजेपेक्षा नोकरमाणसे जास्त आहेत, असा काही वेळा ऑडिटर शेरा मारीत. आगाशेसाहेब म्हणत, मला माहीत आहे. त्यांच्या या उदार धोरणाचा अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे पुण्यासारख्या परक्या ठिकाणाहून येऊन माळशिरस तालुक्यात कारखाना काढणाऱ्या ब्राह्मण माणसाला लोकांनी देवमाणूस मानले. आमच्या कारखान्यात कधीही संपाची भाषा ऐकायला मिळाली नाही. दोन गोष्टी त्यांच्या धोरणात प्रकर्षाने दिसतात; योग्य ठिकाणी नेमक्या योग्यतेचा माणूस नेमायचा व त्यासाठी निःस्पृहता, निर्भयता, फटकळपणाही सहन करायचा. आपण 'मालक' ही भावना कारखान्याच्या हितापुढे ते दुय्यम समजत, पण त्याचबरोबर एखाद्या तज्ज्ञ किंवा अज्ञ माणसाने अनाठायी मग्रुरी दाखवली तर त्याच्या हातात नोकरीवरून कमी केल्याचे पत्र संध्याकाळीच दिले जाई. एरवी मेणाहूनही मऊ, पण काही मर्यादेपर्यंतच. त्यांच्या आपलेपणाच्या वागणुकीने जाती-भेदाचा प्रश्न कधीही आला नाही. याचे उदाहरण म्हणजे गांधी-हत्येच्या क्षोभामध्ये आगाशेसाहेबांना ब्राह्मण आहेत म्हणून कोणी त्रास दिला नाही.

आमच्या कारखान्यातील सेवकवर्गही चांगला होता. तसे सेवक आगाशेसाहेबांनी मिळविले, टिकविले व कारखाना यशस्वी केला. आर. डी. जोशी नावाचे डबल ग्रॅज्युएट झालेले गृहस्थ चौतीस वर्षे काम करून ७३ साली निवृत्त झाले. त्यांच्या समवेत सर्वश्री पेंडसे, काका उपळीकर, व्ही. एस. लिमये, भाटे, भास्कर वेलणकर, गानू,

नातू, पटवर्धन, चाफेकर, मुकुंदमामा गोखले, बापूसाहेब थत्ते व इतर खूप मंडळींची जोड कारखान्यास मिळाली. पुढे सर्वश्री पेंडसे, रबडे, वाकणकर, जोशी, पटवर्धन हे पुण्याच्या कचेरीत होते.

कारखाना सदैव पैशाच्या अडचणीत, तेव्हा सेवकवर्गाकडून काम करून घेणे अवघड. पण चार-चार महिने पूर्ण पगार देता येत नाही म्हणून अर्धपगारी राहून व वेळप्रसंगी रेशनकरिता धान्य व जीवनोपयोगी वस्तू पुरवून सेवकवर्ग व कामगारवर्ग कारखान्याशी एकनिष्ठ ठेवण्याचे अवघड काम श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशेच करू शकले.

कारखान्याच्या इतक्या सर्व व्यापातूनही त्यांची पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनाची फेरी कधी चुकली नाही. त्यांचे ते सुखनिधान, विसाव्याचे व आत्मबल वाढविण्याचे स्थान होते. सुरुवातीला कारखान्यावर गेले की पंढरपुरास जात. पण पुढे साधारण १९५० पासून तर दर बुधवारी पांडुरंगाच्या भेटीसाठी पंढरपुरास जात. ते कितीही उशिरा गेले तरी त्यांच्याकरिता बडवे मंडळी मंदिर उघडे ठेवत असत. त्यांना मुकुटासहित पांडुरंगाचे दर्शन प्रिय होते. म्हणून त्यांच्यासाठी बडवे मंडळी मुकुटधारी पांडुरंगाचे दर्शन त्यांना घडवीत असत. ते गरुडखांबापाशी अनेक वेळा बराच वेळ निश्चल उभे राहत असत. देवाची करुणा भाकीत असत. डोळे मिटून जणू त्यांची काही काळ समाधीच लागल्यासारखी असे. असे अनुभवास येते की, आपली सर्व कार्ये सहसा आपल्या जाणिवेच्या पातळीखाली चालतात. मानवी मनाच्या दोन अवस्था असतात. एक, जाणिवेची अवस्था असताना जी कामे केली जातात ती 'मी करीत आहे' असा अहंभाव असतो. तोच विद्यमान असतो. पण आगाशेसाहेब करीत असलेले काम हे दुसऱ्या अवस्थेप्रमाणे, म्हणजे नेणिवेच्या अवस्थेने करीत असत. त्या नेणिवेत अहंभाव नसतोच; तसाच आगाशेसाहेबांजवळ अहंभाव नव्हता. म्हणून उच्च पातळीवर देवाशी एकरूप होण्याइतके मन या उच्च पातळीवर आरूढ होत असे. ही जी त्यांच्या मनाची जाणिवेपलीकडील अवस्था होई, त्या अवस्थेतून परत येताना

त्यांचे मन शांत होई, मार्ग सापडे व ते परत कामाची सुरुवात करीत. माझे काका व आगाशेसाहेब यांनी मांगदरीच्या श्रीरामाचा आदर्श ठेवला व काही ध्येये ठरविली.

बोरगावच्या – श्रीपूरच्या लोकांना तेथे समृद्धी आल्यामुळे 'सोनीयाचा दिवस आजि अमृते पाहिला' ह्या ज्ञानेश्वरमाउलीच्या पद्यपंक्तीची आठवण होत असे.

आगाशेसाहेबांच्या, काकांच्या आईला कुणी आशीर्वाद दिला असणार,

पुत्र होईल तव वंशी । दिगंत होईल त्याची कीर्ती ।
सोने होईल येथील धरती । सोने होईल अवघी धरती ।।

पदस्पर्शाने होईल पावन ।
वसुंधरेचा अवघा कणकण ।।
पतितपावन स्वयम् दयाघन ।
येईल घरी श्रीपती ।।

# वाड्यावरले मामासाहेब-मामी

पुण्याच्या शनिवार पेठेत ओंकारेश्वराच्या प्राचीन मंदिरासमोर एक मोठ्ठा वाडा होता. त्या वाड्याचा दरवाजा दिल्ली दरवाजा-सारखा खूप मोठा. इतका रुंद की आजची मर्सिडीज गाडीदेखील आत जाऊ शकेल. त्याला दिंडी दरवाजाही होता. आत शिरले की डाव्या बाजूला श्री. चित्राव हे घरमालक आणि उजव्या बाजूला श्री. बंडूनाना देव हे घरमालक. वाडा एकच पण मालकी दोघांची होती; परंतु दोघात सलोखाही होता. थोडे सरळ आत गेले की मध्यभागी एक कौलारू घर होते. तेच आमचे घर. श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे तेथे भाड्याने राहत होते. दारातून आत शिरले की एक लांब पडवी होती. तेथेच झोपाळा बांधलेला असायचा. झोपाळ्यावर झोके घेत, गाणी म्हणत आम्ही लहानाचे मोठे होत होतो. पडवीतून उजव्या कोपऱ्यातून दोन पायऱ्या चढून गेले की ओटी. म्हणजेच आगाशेसाहेबांची बैठकीची जागा. पडवीतच एका लहान खोलीत फोनची व्यवस्था केलेली होती. ओसरीवर, त्या ओटीवर जमिनीवर सतरंजी, त्यावर अतिशय चांगले, किमती गालिचे घातलेले असत. गालिच्यावर भितीशी लोड, तक्के ठेवलेले असत. बसण्यासाठी शुभ्र चादर घातलेली छोटी गादी, माझे वडील बसत, त्यांचेपुढे एक बैठे चौकोनी टेबल असे. त्यावरच ते पोथी-वाचन, इतर वाचन, लिखाण करीत असत. भिंतीच्या एका बाजूला फळीवर ज्ञानेश्वरमाउली, चिनी Laughing God व इतर देवादि-कांच्या तसबिरीशेजारीच माझ्या आजीची तसबीर होती. सर्व व्यवहार, व्यापारी बोलणी, साखरेचे सौदे, वेदान्तविषयक चर्चा,

पोथीवाचन, मनन, चिंतन, मुला-लेकरांशी सुखसंवाद एकंदर सर्व ओटीवर होत असे. पूर्वी पेशवेदरबार असायचा, तद्वतच आमच्या ओटीवर काम चाले. सर्व तऱ्हेचे लोक – त्यात विद्वान, ठेवीदार, भागधारक वगैरे अनेकजणांची हजेरी लागे.

दारातून प्रवेश केला की माजघर, तेथे माझ्या आजीची बैठकीची जागा. तिचे पाय अधू झाले असल्यामुळे ती जेमतेम घरात हिंडू शकत असे. ती अत्यंत करारी व संसारदक्ष. स्वभाव कडक, आवाज मोठा, सर्वांवर जरब होती. घराची सूत्रे तिच्याच हातात असत. बाहेर जाताना, बाहेरगावी जाताना, कोणत्याही कार्यारंभी माझे वडील प्रथम देवाला व आमच्या आजीला नमस्कार केल्याशिवाय जात नसत. आमच्या विष्णूच्या देवळात काकडआरती वगैरे नियमितपणे होत असे. अजूनही होते. त्याला माझी आजी जात असे. तिला अभंग व गाणी खूप येत असत. ती पाककलानिपुण होती. ज्याला नेटका संसार म्हणतात तसा करणारी होती. त्या काळाप्रमाणे खूप सोवळे-ओवळे व देव-देवतार्चन आमच्या घरी होते. या माजघरातच खूप ब्राह्मणभोजने, लग्नकार्ये झालेली आहेत. हे माजघर म्हणजे आमचे जेवणघर. सणावारी आमच्या माजघरात जेवणाचा पेशवाई थाट असे. माझे वडील कामानिमित्त जास्त बाहेरगावी, पण दसरा–दिवाळी अशा मोठ्या सणांना घरी असत. वडील आमच्या पंगतीला असले की आम्ही भावंडे खुशीत असत असू. मागे पाट, पुढे पाट, चांदीची ताटे, समया, उंची वस्त्रे, अलंकार असे आमचे खूप कौतुक होते.

माजघरातून आत गेले की मुदपाकखाना, म्हणजे आमच्या आईचे सदर. दिवसातला बराचसा वेळ आमची आई या सदरेवरच असायची. स्वयंपाकाला नोकर असले तरी दिवसभर राबता चालूच असायचा. माझ्या वडिलांना स्वतःला आई, एक बहीण व दोन भाऊ. पण एक भाऊ स्वर्गवासी झाला होता. म्हणजे हे तिघांचे कुटुंब. पैकी आत्या आमच्या माजघरातल्या एका खोलीत बिऱ्हाडाने राहत होती. तिला दोन मुलगे व एक मुलगी. तिचे मुलगे ती. दादा व बापू आणि मुलगी मैनाताई. हे माझ्या वडिलांना मामा व

आईला मामी म्हणत असत. त्यामुळे आम्ही पण सर्व भावंडे माझ्या वडिलांना मामा व आईला मामी म्हणू लागलो. १९१४ मध्ये मामांचे लग्न धारवाडच्या गोखले सराफांच्या मुलीशी झाले. माझ्या काकांनी – नारायणकाकांनी लग्न केले नाही. ते अविवाहितच होते. लग्नानंतर सर्व सुख होते. पण बारा वर्षे माझ्या आई-वडिलांना मूलबाळ नव्हते. १९२६ मध्ये त्यांना प्रथम अपत्य झाले, ते कन्यारत्न. म्हणजेच आमची ताई. तिचे नाव लीला. आम्ही एकंदर भावंडे म्हणजे सात बहिणी व तीन भाऊ. त्यांपैकी एक भाऊ बारा वर्षांचा असताना निधन पावला. त्याचे नाव रंगनाथ. ताईनंतर त्याचा जन्म, मग माझा – मग शकुंतला मग सुशीला, त्यानंतर जगदीश, त्यानंतर विमला, सरला मग ज्ञानेश्वर, नीला व श्री ऊर्फ श्यामला.

आत्ताच्या कालमानाप्रमाणे मोठे कुटुंब, पण त्या काळी सर्व घरोघर सहासात भावंडे असायचीच. त्यामुळे आम्ही जास्त भावंडे म्हणून वैषम्य वाटण्यासारखे नव्हते.

लीला, आमची ताई ही पहिलीच. त्यामुळे कौतुकाची. होतीही तशीच, दिसायला गोरीपान, उंचनिंच, सरळ नाक, हसरा चेहरा, प्रसन्न प्रभावी व्यक्तिमत्त्व. लहान भावंडांवर माया, सगळ्यांना मदत करण्याचा स्वभाव. तिचा तिच्या १९ व्या वर्षी, आमच्या-जवळच राहणारे श्री. वसंतराव मेहेंदळे यांच्याशी विवाह झाला. ते जंगलखात्यातील अधिकारी. तेही चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे, सुस्वरूप, निःस्पृह अधिकारी.

आमच्या ताईने खरे म्हटले तर दोन घरचें संसार चालविले. मामा अचानक गेल्यामुळे ती आम्हा भावंडांची आणि आईचीही काळजी घेत असे. सासरचे कुटुंबही मोठेच; त्यामुळे त्या कुटुंबाची जबाबदारीदेखील तिने सांभाळली. आमचे सर्व नातेवाईक पुण्यात. तेव्हा कोणाकडचे लग्न असो, दुःखद प्रसंग असो, कोणाची कोणतीही अडचण असो, आमच्या ताईचा सल्ला घेतला जाई. तिला शिकण्याची आवड होती. ती व तिची मोठी मुलगी सौ. रोहिणी,

दोघी एकदम एम्. ए. झाल्या. अभ्यास न करणाऱ्या मुलांकडून ती बरोबर अभ्यास करून घेत असे. आणि तो विद्यार्थी उत्तीर्ण होई. चि. जगदीश व चि. ज्ञानेश्वर यांच्याकरिता ती काय करत नव्हती हाच प्रश्न आहे. वडिलांच्या मागे बहिणींना स्थळे पाहण्यापासून तीच करत असे. मुलगी असून तिने मुलाची जबाबदारी घेतली होती. आमची ताई म्हणजे, आमचे सर्वांचे काळजीवाहू सरकारच होते. कुणाला आवडो वा न आवडो, ती तिचे कर्तव्य करणारच ! आमच्या दुर्दैवाने ती तीन वर्षांपूर्वी स्वर्गवासी झाली. तिच्या पाठचा भाऊ रंगनाथ, तो बारा वर्षांचा होऊन अचानक गेला, तेव्हा मामांना दुःखाचा मोठा धक्का बसला. त्यानंतर माझा नंबर. काय गंमत आहे बघा, आम्ही भावंडे सख्खीच ना ! पण देवाने सर्वांना काही सारखेपणा दिला नाही. हाताची पाची बोटे सारखी नसतात असे म्हणतात; पण मी अगदी त्यातले लहान करंगळीसारखे बोट हो. ताई सुस्वरूप तर त्यानंतर मी म्हणजे 'ठीक आहे !' असे म्हणण्यासारखी. उंची बेताची, नंबर दोन म्हणजे रंग काळा, अंगकाठी बेताची, सर्वच बेताचे हो. पण काय करणार ? जे देवाने दिलंय तेच पुष्कळ समजते. मी उच्च शिक्षणाऐवजी पेंटिंगचा कोर्स केला. १९५३ साली माझा विवाह डहाणू येथील श्री. राजाभाऊ करंदीकर यांचेशी झाला. येथे जमेची बाजू अशी की, किंवा माझ्या चांगल्या नशिबामुळे हेही मामांचे जावई माझ्यापेक्षा सगळ्या बाबतीत उजवे आहेत. दिसण्यात, हुशारीत व सर्वच बाबतीत. त्यांचा पूर्वी जंगलव्यापार व आता मिठागरे व इतरही छोटे उद्योगधंदे ते चालवतात.

माझ्या पाठची बहीण सुशीला. ही जरा चेष्टेखोर. मला चिडविण्यात, माझी चेष्टा करण्यात तिला फार मजा वाटते. ही माझी बहीणही अंगापेराने मजबूत, नाकीडोळी नीटस, बुद्धीने चाणाक्ष व हुशार आहे, कलाकौशल्य-निपुण असून बी. ए. झाली आहे. ही बहीणच आमच्या वडिलांच्या तैनातीत जास्त असे. त्यांना काय हवं-नको बघणे, बरेच वेळा ती पैशाचे व्यवहार पण सांभाळत असे. मामांचा तिच्यावर जास्त जीव होता. तिचा विवाह मात्र

मामा गेल्यावर झाला. बार्शी येथील श्री. सहस्त्रबुद्धे यांचे चिरंजीव श्री. केशवराव यांचेशी तिचा विवाह झाला असून ते इंजिनियर व बिल्डर आहेत. तेही सुस्वरूप, सुस्वभावी आहेत. ते शांत स्वभावाचे असल्यामुळे आमची ही फटकळ बहीण पण शांत झाली आहे. एक आठवण अशी मामा कुठेही बाहेरगावी गेले की, छान छान साड्या आणायचे. हिला पांढरा रंग आवडायचा आणि मामांची लाडकी, त्यामुळे तिला तिच्या आवडीची साडी आणीत असत. आगाशेसाहेब—मामा आमचे सर्वांचे खूप लाड करीत असत. जास्त मुली म्हणून कधीही राग केला नाही. सर्वांना चांगले शिक्षण, चांगले संस्कार शिकविले. चि. जगदीश — आम्ही त्याला पंडित म्हणत असू, हा आमच्या तिघी बहिणींपेक्षा लहान, पण मामांच्या निधनानंतर सर्व जबाबदारी पेलताना तो गंभीर व जबाबदार माणसासारखा झाला होता. लहानपणापासून स्वभावाने गमती, खेळकर होता. त्याचे शिक्षण इंटरसायन्सपर्यंत झाले होते. मामा गेल्यानंतर त्याने शिक्षण सोडले, बृहन्महाराष्ट्राची जबाबदारी उचलली. तो दिसण्यात चांगला, नाकीडोळी नीटस होता. त्याच्या चालण्यात बोलण्यात वेगळीच आदब होती. आमच्या घराण्याला मातृप्रेमाचा व बंधुप्रेमाचा वारसाच आहे. माझे दोन्हीही भाऊ आमच्या आईला अतिशय मान देत असत. मामांच्या निधनानंतर चि. पंडितने ज्ञानेश्वरला असे प्रेम व जिव्हाळा दिला की मामांची उणीव भासू नये. बाहेरच्या कोणत्याही काळज्या त्यांनी घरापर्यंत येऊ दिल्या नाहीत. त्यामुळे घरातले वातावरण आनंदाचे राहिले. चि. सौ. विमल व चि. सौ. सरला अतिशय समजूतदार बहिणी आहेत. सौ. विमल बी. ए., एलएल. बी. असून सौ. सरलाही पदवीधर आहे. सौ. विमलचा विवाह पुणे येथील डॉ. खऱ्यांचे चिरंजीव श्रीनिवास यांचेशी झाला असून ते शिपिंग कॉर्पोरेशन-मध्ये अव्वल दर्जाचे अधिकारी आहेत. सौ. सरलाचा विवाह पुण्यातील श्री. भिडे यांचे चिरंजीव श्री. नीलकंठ यांचेशी झाला असून ते M. Sc., Ph. D. आहेत. त्यांचा स्वतःचा रंग तयार करण्याचा कारखाना आहे. ह्या दोघींचा विशेष म्हणजे त्या पाठच्या बहिणी

असून कधी भांडायच्या नाहीत. लहानपणापासून या दोघींचे अगदी मेतकूट. दोघींनाही वाचनाची, कलाकौशल्याची आवड आहे. चि. ज्ञानेश्वर, चि. सौ. नीला व सौ. श्यामला ही भावंडे वडील गेले तेव्हा लहान होती. त्यांना मामांचा सहवास कमी लाभला. चि. ज्ञानेश्वरचा विवाह श्री. गोगटे यांची कन्या रेखा हिच्याशी झाला आहे. चि. पंडितने मात्र लग्न केले नाही. तो अविवाहितच राहिला. चि. सौ. नीलाचा विवाह धनंजय खरे यांच्याशी झाला असून श्री. खरे बोटीवरचे अधिकारी आहेत. श्री. कर्वे यांच्याशी चि. श्यामलाचा विवाह झाला असून ते टेल्को कंपनीत अधिकारी आहेत. चि. ज्ञानेश्वर, चि. सौ. नीला व श्यामला ही भावंडे लहानपणापासून जास्त वैभवात राहिली. कारण त्यांच्या लहानपणात सर्व स्थिरस्थावर झाले होते. ते सर्व जरी वैभवात राहत असले तरी त्यांना कोणत्याही गोष्टीचा दंभ किंवा गर्व नाही. आमच्या आईचे वळण असे होते की, कोणालाही गर्व वगैरे प्रवृत्तीला वाव मिळाला नाही.

माझी आजी ही बरीच वर्षे सहवासाला असल्यामुळे आईला ती गुरूप्रमाणे होती.

माझी आई – माझी आई म्हणजे मूर्तिमंत वात्सल्यच उभे असे. ती अतिशय कष्टाळू व सर्वांचे मनापासून करणारी होती. वडील आमचे खूप लाड करीत. कोणतीही गोष्ट मागितली की लगेच आम्हाला ती देत. परंतु लाडाने मुले बिघडू नयेत म्हणून माझी आई त्याला आवर घालीत असे. मनात आले की अयोग्य असून-सुद्धा ते करायचे अशा गोष्टीला आईचा विरोध असे; तो योग्यही होता. कारण, संयम हा जीवनात आवश्यकच आहे. संयम हा सोन्याचा लगाम आहे.

आमच्या घरी मोटारी आमच्या जन्मापासून आहेत. पण शाळेत जाताना आम्ही चालतच गेले पाहिजे, असा तिचा दंडक होता. कॉलेज लांब, म्हणून फार तर सायकलवरून जा. यामागील कारण असे की, शिक्षण घेताना साधेपणा व कष्ट या दोन्ही गोष्टींची

तयारी पाहिजे. घरातील मोठ्या माणसांचा मान राखला पाहिजे. उलटून बोलणे किंवा मनाला येईल तसे वागणे तिला मुळीच आवडत नसे. जेवणाच्या वेळी सुद्धा जे आहे ते आनंदाने जेवले पाहिजे असा तिचा कटाक्ष असे. त्या काळात रूढीला धरून जे पोशाख योग्य होते तसेच ती मान्य करीत असे. फॅशनेबल किंवा भडक पोशाख तिला आवडत नसत. मामासाहेब कारखान्याच्या कामानिमित्त सतत बाहेर; त्यामुळे मुलांना योग्य वळण लावणे, त्यांच्या शिक्षणाकडे लक्ष देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे या सर्व जबाबदाऱ्या माझ्या आईने उत्तम प्रकारे सांभाळल्या. माझी आई त्या शांततेच्या काळात रोज गोठ, पाटल्या वगैरे दागिने घालत असे व उत्तम साड्या नेसत असे. रोज नथ घालून तुळशीला पाणी घालताना माझी आई तिच्या तेजस्वीपणामुळे भारदस्त व छान दिसत असे. तिच्या वागण्यातही सौजन्य व आदब होती. आमच्या वैभवशाली घराची ती लक्ष्मीच होती. सणावारी उंची वस्त्रे व अलंकार परिधान केले की ती लक्ष्मीसारखीच दिसत असे. पण वैशिष्टच असे की, लक्ष्मीला चंचल म्हणतात, तशी मात्र माझी आई नव्हती. स्वभावाने शिस्तीची खरी, पण एरवी सौजन्यशील होती. आमच्या घरी देवधर्म व दानधर्म हे कर्णाच्या वृत्तीने चालत असत. पण त्याला तिने कधी विरोध केला नाही. माझे वडील गमतीने आईला म्हणत, "तुम्ही गोखल्यांच्या मुली म्हणजे चिक्कू आहात." पण वडिलांच्या तुकारामबुवासारख्या स्वभावाला, एवढा मोठा संसार चालवायला कुठेतरी काटकसरीची गरज होतीच.

माझ्या आईला वाचनाची आवड होती. ज्ञानेश्वरी, दासबोध, अमृतानुभव वगैरे ग्रंथ एवढ्या व्यापातही सवड काढून ती वाचत असे. तिला कलाकौशल्याचीही आवड होती. विणकाम, पोतीच्या वस्तू, शिवणकाम हे सर्व ती करीत असे. कोणाला माहीत नसलेली एक कला म्हणजे ती काव्य करीत असे. माझे मामा – डॉ. गोखले यांना तिने काव्यात लिहिलेले पत्र माझ्या स्मरणात आहे. माझ्या वडिलांना आयुष्यात माझ्या आईची योग्य जोड मिळाल्यामुळे त्यांचे जीवन सुखमय झाले. कारण मोठ्या माणसाची पत्नी होणे

हेदेखील अवघडच असते. अनेक आवडीनिवडींना मुरड घालावी लागते; समाजासाठी काही गोष्टी कर्तव्य म्हणून कराव्या लागतात; पतीच्या मोठेपणाला म्हणजेच योग्यतेला अनुसरून वागावे लागते. त्या काळातले एक वेगळेपण म्हणजे त्या काळच्या स्त्रिया एवढे मोठाले संसार असून कधी कंटाळलेल्या वाटत नव्हत्या किंवा 'टेन्शन', 'मूड' हे शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हते असे दिसते. कारणे काहीही असोत, पण माझी आई अतिशय उत्साही होती हे खरे. तिथी, सणवार, मुलांची देखभाल, आल्यागेल्याची वास्तपुस्त; एवढे करूनही माझी आई कधी कंटाळलेली दिसत नसे.

मामांच्या आकस्मिक निधनामुळे मात्र आईला धक्का बसला. पाच मुली लग्नाच्या व दोन्ही मुले तर लहान. वडिलांच्या व्यवहारांची त्यांना माहिती कमी. मामांच्या मृत्यूनंतर अनेक घडामोडी झाल्या. त्या वेळी कंपनीतील काही मंडळींचा आईपुढे प्रस्ताव आला की, अमुक म्हणजे एक लाख रुपये तुम्हा कुटुंबियांना आम्ही देतो; तुम्ही कंपनीचा अधिकार सोडावा. विरोधकांना तर पर्वणीच वाटल्यास नवल ते काय ?

पण माझी आई किती धीराची, निःस्पृह व करारी होती याचा प्रत्यय त्या कसोटीच्या क्षणी आला. तिने सांगितले की, "याचकासारखा उताणा हात पुढे करण्याची आमची पद्धत नाही. आमचा हात देणाराचा, दातृत्वाचा आहे. तेव्हा आम्हाला तुमच्या दयेची भीक नको आहे. आमचा जो अधिकार आहे, तोच आम्हाला राहिला पाहिजे." अशी होती आमची आई. वडिलांच्या नंतर वीस वर्षे ती जगली. सर्व मुलांना पित्याचे व आईचे – दोघांचे प्रेम, माया व जिव्हाळा दिला. चि. जगदीश व चि. ज्ञानेश्वर यांनी तिची अगदी फुलासारखी जपणूक केली. पानशेतच्या पुरानंतर चि. जगदीश याने राजवाड्यासारख्या बांधलेल्या बंगल्यात ती वैभवात, गौरवशाली वातावरणात राहिली. सर्व बहिणींची लग्नकार्ये, सण, सासरच्यांचे मानपान व्यवस्थित केले. कोणालाही वडिलांची उणीव भासू दिली नाही. चि. जगदीशने लग्न केले नाही,

त्यामुळे त्याची काळजी तिने सतत केली. चि. ज्ञानेश्वरचे लग्न चि. सौ. कां. रेखा गोगटे हिच्याशी झाले. गोगटे कुटुंब पण नामवंत, सद्‌विचारी व सौजन्यशील आहे. चि. सौ. रेखा ही उद्योगपती श्री. वासुदेव म. गोगटे यांची मुलगी. सौ. रेखा – आमची वहिनी ही दिसावयास तर गोड आहेच, पण स्वभावानेही अतिशय सौजन्यशील आहे. तिचे माहेरचे कुटुंब आमच्या मानाने लहान व आमच्या घरापेक्षा थोडे सुधारक. आमच्या घरी केवढ्यातरी माणसांचा राबता. आम्ही एवढ्या बहिणी, आमची मुले व इतर नातेवाईक; आईचेही सोवळेओवळे होते; देवधर्म, कुळाचार हे चालूच; पण हे सर्व तिने हसतमुखाने, कुणाचाही अपमान न करता, एकंदर समजुतीने आत्मसात केले. माझा भाऊ चि. ज्ञानेश्वर यानेही अनेक जबाबदाऱ्या घेतलेल्या व नाव कमावलेले. पण तिने सर्व आघाड्या योग्य प्रकारे सांभाळल्या आहेत. आता तर ती ज्ञानेश्वरच्या बरोबरीने उद्योगक्षेत्राकडे वळली असून नेल्सन सॉस, जॅम, जेलीज वगैरे खाद्यउत्पादने तयार करून तिने कर्तृत्वाची झलक दाखविली आहे. माझ्या वडिलांचा असा उद्योगप्रियतेचा वारसा व कष्ट करून यश संपादण्याची तयारी ही गोष्ट आमच्या घराण्याला व आम्हाला निश्चितच अभिमानास्पद आहे.

चि. ज्ञानेश्वरचे दोन्ही मुलगेही चांगल्या स्वभावाचे आहेत. मोठा या वर्षी इंजिनिअर होईल. दुसरा कॉलेजशिक्षणाबरोबर क्रिकेटमध्येही प्रावीण्य मिळवीत आहे. आमची भाची चि. शीतल यंदा दहावीच्या अभ्यासात गर्क आहे. ती एकुलती एक मुलगी असली तरी तिच्यातही गरिबांबद्दल कनवाळा व मोठ्यांबद्दल आदर, प्रेम हे गुण वंशपरंपरेनुसार आहेतच. चि. ज्ञानेश्वर व चि. पंडितबद्दल तर प्रश्नच नाही. वडिलांप्रमाणेच लोक त्यांच्या या मुलांनाही देवाप्रमाणे मानतात. वडील जसे नोकरमाणसांची काळजी घेत असत, त्यांना प्रेम देत असत, तशीच, काकणभर जास्त पण कमी नाही, अशी वागणूक सर्वांना देतात. जिव्हाळ्याने वागणे किंवा नोकरमाणसांशी माणुसकीने वागणे ह्या गोष्टी शिकवून येण्यासारख्या नाहीत, त्या उपजतच असतात.

आमचे वडील मामा जेव्हा पुण्यात असत तेव्हा सकाळी आमच्या सर्वांबरोबर चहा घेत असत. त्याला ते गमतीने गोलमेज परिषद म्हणत; त्या वेळी आमच्या बरोबर विनोदात, गप्पात सहभागी होत. ते कधीही आमच्यावर रागावत नसत. पण गप्पागोष्टी करतानासुद्धा अशा तऱ्हेने आम्हाला सांगत की, नकळत आमच्यावर त्यातल्या चांगल्या गोष्टींचे संस्कार होत. कधी ज्ञानेश्वरीतले, कधी तुकारामाचे दाखले आम्हांला कळतील अशा भाषेत सांगत. आमच्या बरोबर कधीकधी पत्ते खेळत. पत्ते खेळताना पण कोणी खोटे पान टाकले की म्हणायचे, " कोणी खोटे खेळायचे नाही." म्हणजेच खोटेपणा नको हेच शिकविले जाई. आमचे शब्दोच्चार चांगले व्हावेत, रामाची महती कळावी म्हणून आमच्याकडून रामरक्षा म्हणून घेत, शिकवीत असत. शिक्षणाची आवड होतीच. त्यांना शिक्षणाला खूप त्रास झाला, तेव्हा आपल्या मुलांनी खूप शिकावे, मोठे व्हावे असे त्यांना वाटे. पुण्यात थंडी पुष्कळ, थंडीच्या दिवसांत आमच्या ओटीवरच विटांवर एक शेगडी ठेवून त्यात शेकोटी पेटायची व वडील, कधी काका व आम्ही शेकोटीभोवती बसून गप्पागोष्टी करत असू. काकांच्या व मामांच्या त्यांच्या लहानपणच्या गोष्टी, कधी कारखान्याच्या गोष्टी रंगत, माझी आजीपण असे.

श्री. दादा साने, म्हणजे डॉ. सौ. लीला भागवत यांचे वडील आमच्या काकांचे स्नेही. ते आमच्याकडे येत. मग कंपनीच्या वार्षिक सभांच्या गप्पा, विरोधकांच्या फजितीच्या गोष्टी खूप रंगत.

माझ्या वडिलांकडे अनेक लोक अनेक कारणांसाठी येत असत. श्री. गोविंददास नारायणदास हे साखरेचे व्यापारी, मुंबईचे वासीशम्म हे व्यापारी, लेखक, विद्वान मंडळी येत असत. कोणी गरीब विद्यार्थी, देणगी मागणारे, ऑफिसमध्ये असणारे सेवक काही कामाकरिता येत. आमच्या ओटीवरच सर्वांशी बोलणे चाले. त्यामुळे आमच्या कानावरही कित्येक गोष्टी पडत. त्याचा फायदा असा की, व्यापारी लोकांच्या स्वभावाचे बारकावे, विद्वान मंडळींचे सुविचार, गरिबांचे प्रश्न अशा अनेक गोष्टींचे आकलन आम्हांला

लहान वयात झाले. त्या अनुभवासाठी बाहेरच्या जगात वावरण्याची जरूर पडली नाही. आम्ही राहत होतो त्या आजूबाजूच्या परिसरातल्या सर्व गोष्टींची दखल घेतली जाई.

कोणाची काहीही अडचण असल्यास ती सोडविण्याचा प्रयत्न माझे वडील करीत. देवधर्माच्या कामातही सढळ हाताने मदत करीत. दरवर्षी वैशाखात ओंकारेश्वराच्या मंदिरात शंकराला चंदनाच्या गंधाची पूजा बांधली जात असे. आजूबाजूची मंडळी चंदन उगाळून, त्याचा गोळा करून त्याची शंकराची मूर्ती करत असत. संध्याकाळी शोभिवंत अशी पूजा साकार होई. रात्री परमपूज्य सोनूमामा दांडेकर यांचे विद्वत्ताप्रचुर कीर्तन होई, आम्ही-देखील ऐकायला जात असू. आमचे वडीलही जात असत. त्यांचा स्वत:चा ज्ञानेश्वरीचा अभ्यास होता, व्यासंग होता. त्यामुळे ती. मामासाहेब दांडेकरांचे ज्ञानेश्वरीचे विवेचनात्मक कीर्तन त्यांना आवडत असे. त्यानंतर आमच्या घरीच दोनशे-तीनशे माणसांसाठी कॉफीपानाचा कार्यक्रम होत असे. लहानपणापासून प्रत्येक गोष्ट मोठ्या प्रमाणात पाहावयाची आम्हाला सवय झाली आहे. आमच्या घरची सर्व लग्नकार्येही मोठ्या समारंभपूर्वक झाली आहेत. सुबत्ते-बरोबर आम्हा सर्वांनाच हौसही आहे. त्यामुळे कोणताही समारंभ, छोटा वा मोठा, सुशोभित दिसतो. मामासाहेब हौशी होते, तशीच आमची भावंडेही. चि. पंडित पण हौशी होता. तो स्वत: अविवाहित होता, तरी सर्वांचे तो हौसेने करीत असे. माझी आतेभावंडे ती. दादा, बापू व माई हेपण तसेच. या सर्वांची मामीवर व मामीची त्यांच्यावर खूप माया. सख्ख्या भावंडांसारखीच आमची नाती आहेत. या सगळ्यांच्या सहवासात आमचे लहानपण अगदी मजेत गेले. माझ्या दोन्ही मावश्यापण पुण्यातच होत्या. आमची आतेबहीण ती. माई, आमची ती. गंगूमावशी व ती. सौ. येसूमावशी व आमची आई यांचा ग्रुप--चौफुला होता. (आई) मामी व भाची माई यांचे प्रेम असे होते की त्या दोघींच्या प्रेमात तिसऱ्याला जागाच नव्हती. आमची गंगूमावशी म्हणजे कोणत्याही गोष्टीत ना खंत ना खेद बाळगणारे एक समाधानच. ती. सौ. येसूमावशी म्हणजे

हुशार, हौशी, सर्व गोष्टींत आनंद वाटून घ्यायला शिकविणारी, पण क्वचित प्रसंगी कुठेतरी बोचणारा सल मनात ठेवून दुसऱ्याचे कौतुक करणारी होती. आमच्या घरच्या सर्व समारंभांना या या सर्वांची हजेरी अगदी आवश्यक असायचीच. माझ्या वडिलांना ती. माईचे कौतुक होते. तिच्या मामांप्रमाणेच ती अत्यंत धीराची, धोरणी व सहनशील होती.

ती. दादा, ती. बापू व बापूची पत्नी वत्सला या सर्वांना माझ्या वडिलांबद्दल आदर व आपुलकी होती. त्या सर्वांनी आमच्या घरातील मंडळींची खूप सेवाही केली आहे. ती. बापूचा माझ्यावर जीव. मी हट्ट धरला म्हणून माझ्या लहाणपणी त्याने एकदा माझी वेणी पण घातली होती. अशी आहे आठवणींची साठवण.

ती. मामा ऑफिसमधून रात्री आठ–साडेआठला आल्यानंतर थोडाफार फराळ किंवा दूध घेऊन पोथीवाचन करीत. ओसरीवरच्या बैठकीतच एक चौकोनी टेबल, त्यावर ज्ञानेश्वरी, गुरुचरित्र किंवा अमृतानुभव असे ग्रंथ, उदबत्ती लावलेली असे, त्याचा सुगंध दरवळत असे, अशा प्रसन्न वातावरणात मामांचे एकाग्रतेने वाचन चाले. त्या वेळी त्यांच्याकडे पाहिले की, आपल्यालाही क्षणभर वेगळाच साक्षात्कार होई, तिथे देवत्व असल्याची जाणीव होई. नेमक्या शब्दांत सांगता येण्यासारखे नाही, पण काहीतरी भव्य-दिव्य, उदात्त असे वाटत असे.

त्यांचे कोणतेही काम, कोणतीही भक्ती ही डोळस असल्यामुळे कृत्रिमपणा, दिखाऊपणा नव्हताच. रामकृष्ण परमहंस, योगी अरविंद, रमणमहर्षी, स्वामी विवेकानंद ही त्यांच्या अध्यात्म-मार्गातील श्रद्धास्थाने होती. तर पांडुरंग, ज्ञानेश्वर माउली ही त्यांच्या भक्तिमार्गातील दैवते होती. ते ध्यानधारणा वगैरे करीत असत. ध्यान लागतही असे. अध्यात्माची जोड त्यांच्या सर्वच व्यवहाराला होती, म्हणूनच त्यांचे वेगळेपण उठून दिसत असे. अध्यात्मविषयक अभ्यास खूप केलेला होता. 'साधना केलेली होती, त्यामुळे त्या दृष्टीने त्यांची योग्यता व पातळी

संतांच्या कोटीतली, उच्च होती. ती ज्याला कळली त्यालाच कळली. तोकड्या, संकुचित मन:प्रवृत्तीच्या लोकांना त्याचे आकलन झाले नाही व होणारही नाही. पंढरपूरला ते अलीकडे जवळजवळ दर बुधवारी जात असत. पंढरपूरला जाणे म्हणजे तेथे गेल्यानंतर चंद्रभागेचे स्नान, देवदर्शन, प्रसाद घेऊन घरी येणे म्हणजे इतिकर्तव्यता असे लोक समजतात. परंतु आईवडिलांच्या सेवेमुळे पुंडलिकासमोर देव प्रकट झाले आहेत याचा त्यांना नेमका विसर पडतो. आईवडिलांची सेवा ही पांडुरंगाच्या सेवेपेक्षाही पलीकडची आहे हे त्यांना कळत नाही. परंतु माझ्या वडिलांनी मात्र पुंडलिका-सारखीच आईची सेवा केली व तिला देवासमान मानले. असे हे माझे वडील, पंढरपूरला देवळात गेले की गरुडखांबाशी निश्चल उभे राहत, डोळे मिटून पांडुरंगाशी एकरूप होण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्याच्याशी मनोमनी संवाद साधून त्यांची अडचण सांगत. पांडुरंगाची कृपा अशी की, त्यांची संकटे तो निवारीत असे. नास्तिक लोकांना हास्यास्पद वाटेल, पण हे असे होत असे हे खरे. एकदा अशीच पैशांची अडचण होती, गरुडखांबाशी डोळे मिटून ते उभे होते. थोड्या वेळानंतर एक कळकाचा (बांबूचा) व्यापारी आला आणि त्याने त्याच्या बायकोचे दागिने गहाण टाकून, निव्वळ माझ्या वडिलांना मदत करायचीच ही इच्छा म्हणून एक लाख रुपये त्यांच्या हातावर ठेवले. इथेच परमेश्वराची अनुभूती सापडते. परमेश्वर भेटतो, कृपा करतो म्हणजे अशा गोष्टीहून काय वेगळे असणार ? परमेश्वराच्या कृपेबद्दल, संकटात साहाय्य करण्याबद्दल ती. नरूभाऊ लिमये यांनी श्रद्धाळू माणसाची कथा सांगितली आहे–

एक माणूस सागरतीरी हिंडत होता. तो वाळूतून चालत असताना त्याची पावले त्या वाळूत उमटत होती. तो पाहत होता तेव्हा त्याला आठवले की आपल्या पावलांच्या जोडीने दुसऱ्या कुणाच्या तरी पाऊलखुणा आहेत. तो भाविक असल्यामुळे त्याला वाटले, ह्या परमेश्वराच्याच पाऊलखुणा आहेत, ही आपल्याला त्याचीच सोबत आहे. पण मधूनच त्याला देवाच्या पाऊलखुणात

खंड पडला आहे असे दिसले; व नेमका तोच कालखंड आपल्या आयुष्यात संकटाचा, कष्टाचा आहे, असे लक्षात आले. त्याची नजर आकाशाकडे गेली. त्याच्या मनाची एकरूपता परमेश्वराशी झाली. त्याने विचारले, " हे देवा, तू माझ्याबरोबर चालत असताना नेमका संकटाच्या वेळी कुठे होतास ? तुझ्या पाऊलखुणा का दिसत नाहीत ?" तेव्हा त्या माणसाला हास्याचा, कोणी बोलल्याचा भास झाला. त्याच्या अंतर्मनाचा आवाज सांगू लागला, " त्या खुणा नीट पाहा. जिथे पाऊलखुणांचा खंड पडला आहे, तिथे तुझ्या खुणा उमटलेल्या नाहीत. त्या माझ्या पावलांच्या खुणा आहेत. संकटाच्या वेळी, मी तुला माझ्या खांद्यावर घेऊन चालत होतो." मामांच्या बाबतीत याहून वेगळा अनुभव नव्हता. त्यांच्या अढळ श्रद्धेमुळे देवाची करुणा भाकली की तो परमेश्वर पांडुरंग त्यांना स्वत:च्या खांद्यावर बसवून संकटकालात त्यांचा दुस्तर मार्ग आक्रमीत असे.

ईश्वरावर अढळ श्रद्धा असलेले मामा कंपनीचा कारभार नेटाने चालवीत होते. १९५२ साली सप्टेंबर महिन्यात माझे काका गेले. ते निवृत्तीच्या मन:स्थितीत होते. जीवाभावाचा, सुखदु:खात सहभागी होणारा, लहानपणापासून ज्या दोघांनी जीवनाचा लढा जोडीने लढला, तो प्रिय भाऊ गेल्यानंतर त्यांच्या जीवनात फार मोठी पोकळी निर्माण झाली. परंतु श्री. सबनीस-काकांनी मामांचा दुसरा भाऊच अशा नात्याने जबाबदारी सांभाळली, त्यांची काळजी घेतली. कोणतीही सभा, कंपनीची कामे, प्रवास, सर्व गोष्टींत श्री. सबनीस हे भावासारखे पाठीशी उभे राहिले ते आगाशेसाहेबांच्या शेवटच्या क्षणापर्यंत. वडिलांच्या नंतर चि. पंडितला देखील त्यांनी फार मोठा आधार दिला. आमच्या कुटुंबाची काळजी घेतली. गरिबांची कणव हा तर आमच्या वडिलांचा स्थायीभाव होता. पुण्यातील एका पुस्तकाच्या दुकानदाराला पैशांची अडचण आली. तो माझ्या वडिलांकडे आला, अडचण सांगितली. माझ्या वडिलांनी चार-पाच हजारांची पुस्तके विकत घेतली, त्याची अडचण निभावून गेली. एक कापडव्यापारी

होता. त्याचे पांढऱ्या कापडाचे तागे पावसाच्या पाण्याने भिजले, डाग पडले. तो माझ्या वडिलांकडे आला व कापड घ्या अशी विनंती केली. त्याचे फार नुकसान झाले होते. तेव्हा त्याला मदत म्हणून ते सर्व कापड वडिलांनी विकत घेतले व गोरगरिबांना वाटून टाकले.

एका होतकरू तरुणाने पोळ्या करण्याचे यंत्र तयार केले. तो माझ्या वडिलांकडे आला, त्याला पैशांची जरुरी होती. वडिलांनी त्याला पैशांची मदत केली व सांगितले— "पैसे परत नकोत. यंत्र तयार कर व त्यातल्या दोन पोळ्या मला आणून दाखव, दे." असे प्रोत्साहन व अशी मदत करण्याची त्यांची पद्धत होती. माझ्या वडिलांबद्दल लिहावे तेवढे कमीच.

माणसाच्या आयुष्यात चढउतार असतात हे आपण समजू शकतो. पण मानवनिर्मित असा जो विरोधकांनी त्यांना दिलेला त्रास, छळ या मनोवृत्तींना काय म्हणावे ? त्यांचे लहानपण त्रासात गेले हे तर खरेच. पण आयुष्याच्या शेवटपर्यंत झालेला त्रास, तोही विनाकारण, ह्या आठवणींनी मन उद्विग्न होते. त्यांचे वडील लवकर गेले, तरी आईचे छत्र त्यांच्या बासष्ट-त्रेसष्ट वर्षांपर्यंत त्यांना लाभले. माझ्या आजीने तिचे मरण आठ दिवस आधी वर्तविले होते. तिने वडिलांना सांगितलेल्या दिवशीच ती गेली. त्यांच्या आयुष्यात पत्नीची जोड चांगली मिळाली. लक्ष्मणासारखा भाऊ मिळाला. बहीण एवढ्या मोठ्या मनाची की, परिस्थिती बेताची असूनही तिने अनेक लोकांवर उपकार केले आहेत. तिची आठवण श्री. राजाभाऊ कर्वे सांगतात, की त्यांच्या गरिबीत माझ्या आत्याने फार मदत केली, अनेक वेळेला जेवू घातले. मामांना संतानसुख मिळाले. मोठा मुलगा गेला. परंतु चि. जगदीश व ज्ञानेश्वरांचा कृपाप्रसाद समजलेला चि. ज्ञानेश्वर या दोघांनी प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देऊन यशप्राप्ती केली आहे.

माझे वडील माझ्या आठवणीत दोन-तीन वेळाच उद्विग्न झालेले मी पाहिले आहेत. मॅनेजिंग एजन्सीच्या विरोधात व

करमसीभाईंना कारखाना देण्याबाबत काढलेल्या पत्रकात रँग्लर र. पु. परांजपे हेही सामील झाले होते तेव्हा. त्या वेळी रँ. महाजनी वडिलांना भेटायला घरी आले होते. त्यांनी कंपनीची चौकशी केली, तेव्हा वडील त्यांना म्हणाले, " अप्पासाहेबांचा मी विद्यार्थी. तेव्हा मी चुकत असेन तर माझ्या थोबाडीत मारली असती तरी चालले असते. पण महाराष्ट्राचा उद्योग शेटजीच्या ताब्यात देण्याबाबत माझ्याविरुद्ध त्यांनी पत्रक काढले, त्याबद्दल मला अतिशय वाईट वाटते."

दुसरी आठवण या सर्व गदारोळाच्या वेळीच डॉ. फाटकांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तो प्रकृतिअस्वास्थ्यामुळे दिला होता. पण मामांना तेव्हा नैतिक व जवळच्या माणसाचा आधार आवश्यक होता. तेव्हा काहीं दिवस अबोला होता. पण सरतेशेवटी डॉ. फाटक जास्त आजारी झाल्यावर सासरे-जावयाची गळमिठी होऊन राग संपला. डॉ. फाटक नंतर गेलेच, पण त्यांचा आशीर्वाद जावयाला देऊनच !

माझ्या वडिलांच्या कारकिर्दीतच सेवेत रुजू झालेले व अजूनही बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटच्या सेवेत असलेले साठेसाहेब यांच्या आठवणी तर फारच हृद्य आहेत. आगाशेसाहेबांनी ऑफिसमध्ये त्यांच्या खुर्चीच्या मागे भिंतीवर 'गरजवंताला अक्कल नसते' अशी पाटी लावल्याची आठवण लिहिलीच आहे; पण ती का लिहिली याची आठवण सांगताना साठेसाहेब म्हणतात, " कंपनीला पैशाची अडचण नेहमीचीच. कर्जफेडीचे हप्ते मागे-पुढे व्हायचे. एक दिवस बँक मॅनेजर, कंपनीच्या सेक्रेटरींना बोलले. त्यामुळे साहजिकच सेक्रेटरींना अपमानास्पद वाटले. ते साहेबांना म्हणाले, 'मी बँकेत पाऊल टाकणार नाही.' तेव्हा आगाशेसाहेबांनी त्यांना समजाविले की, 'आपण वैयक्तिक कारणासाठी थोडेच पैसे मागतो ! आपल्यावर हजारो कुटुंबांचा प्रपंच अवलंबून आहे, तेव्हा आपण हे सहन केले पाहिजे. माणसाला विचार करायला लावण्याची ही त्यांची पद्धत फार चांगली होती. या प्रसंगानंतर दोनच दिवसांनी ती पाटी खुर्चीमागे लावली गेली होती."

पांडुरंगावरच्या श्रद्धेबद्दलची पण अशीच एक आठवण आहे. एकदा एक व्यापारी पैसे मागण्यास आले असता, काही वेळ गप्पात गेल्यानंतर पैशाचा विषय निघाला. तेव्हा साहेब म्हणाले, "फोन लावून बघतो काही व्यवस्था होते का!" परत काही वेळाच्या गप्पांनंतर व्यापाऱ्याने विचारले, "तुम्ही फोन लावणार होता ना?" साहेब म्हणाले, "लावला आहे." तो व्यापारी म्हणाला, "आम्ही तर काही पाहिला नाही तुम्ही फोन केलेला." तेव्हा आगाशेसाहेब म्हणाले, "वायरलेस आहे." पुन्हा काही वेळ गेला. व्यापाऱ्याच्या मनातली शंका जाईना. धीर करून त्यांनी विचारले, "पैशाच्या व्यवस्थेसाठी कोणाला फोन लावलात?" साहेबांनी उत्तर दिले–"पंढरपूरला!" ते व्यापारी पंढरपूरचेच होते. त्यांनी परत विचारले, "कोणाला फोन लावला?" तेव्हा साहेबांनी शांतपणे उत्तर दिले "पांडुरंगाला." वरील संवाद होत असतानाच कंपनीचे चीफ कॅशियर श्री. धु. शं. ऊर्फ पंत पटवर्धन आत आले, व 'आपले काम झाले का?' असे साहेबांनी विचारताच, त्यांनी बँकेने पैसे देण्याचे मान्य केले आहे, असे सांगितले. असे त्यांचे काम पांडुरंगच पार पाडत असे. खरोखर हे वायरलेससारखेच होते.

श्री. साठेसाहेब एका आठवणीत सांगतात– ते पगाराची व्यवस्था पाहत असत. एक दिवस आगाशेसाहेबांच्या पगाराचे व्हाउचर व पैसे घेऊन ते केबिनमध्ये गेले. आगाशेसाहेबांनी विचारले, "कामगारांच्या पगाराच्या पैशांची व्यवस्था झाली का?" तेव्हा साठेसाहेबांनी सांगितले, "अजून झाली नाही, पण एकदोन दिवसात पैशांची व्यवस्था होईल." तेव्हा आगाशेसाहेबांनी त्यांना सूचना दिली की, "कामगारांच्या पगाराची पूर्ण व्यवस्था झाल्यानंतरच माझा पगार देत जा." असा मालक मिळणे म्हणजे सेवकवर्गाचे भाग्यच म्हटले पाहिजे.

एकदा अकलूजचे व्यापारी जमले होते. हळू आवाजात चर्चा चालू होती, 'साहेब अचानक गेले तर आपल्या पैशाचे काय?' श्री. साठेसाहेब तेथेच उभे होते. माझ्या वडिलांना ऐकू कमी येत असे, पण काही वेळा हळू आवाजात बोलले तर नेमके ऐकू जायचे.

दुसऱ्याच्या चेहऱ्यावरील हावभाव, ओठांच्या हालचाली व घेणेकरी वृत्तीच्या माणसांची मनोवृत्ती याचे त्यांना अचूक ज्ञान होते. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता व्यापाऱ्यांना सांगितले, "काही काळजी करू नका. तुमची पै न् पै चुकती केल्याशिवाय मी मरत नाही. शिवाय माझ्याजवळ रोखीने माल खरेदी करावयास पैसा नसल्यामुळे तुम्ही भरपूर भाव लावला आहे. तेव्हा आजपर्यंत मालापोटी मी जे पैसे दिले आहेत, त्यातच तुमच्या मालाची किंमत व नफा पोचता झालाच आहे. बाकी देणे म्हणजे किंमत व नफा यावर व्याज आहे." या उत्तरानंतर त्यांचे चेहरे पाहण्यासारखे झाल्यास नवल ते काय ?

महाराष्ट्र व महाराष्ट्रातील उद्योगाबद्दल आपुलकी होती, याची आठवण म्हणजे महाराष्ट्र बँकेपेक्षा कमी दराने दुसऱ्या बँकांनी कर्ज देऊ केले होते. परंतु १९३५ साली स्थापन झालेली ही बँक त्याला मामा 'My Bank, Sister Bank' असे म्हणत. तर या आपल्या बँकेने जादा एक टक्का व्याज घेतले तरी चालेल. का ? तर त्यामुळे महाराष्ट्राच्या उद्योगधंद्याला मदतच होईल हा विचार. म्हणून त्यांनी ह्याच बँकेशी व्यवहार ठेवला, व दुसरे महत्त्वाचे म्हणजे कंपनीच्या अडचणीच्या वेळी व त्यांच्या निधनानंतरही महाराष्ट्र बँकेने अतिशय आपुलकी ठेवली, शक्य तेवढे अर्थसाह्य कंपनीला केले.

खरेच अशी माणसे ही परमेश्वराचे प्रेषितच असतात असे वाटते. म्हणूनच त्यांच्या अंगात असे असामान्य गुण असतात. त्या त्यांच्या कष्टाचा एक प्रमुख साक्षीदार म्हणजे मामांच्या गाडीचे चक्रधर श्री. जोगळेकर. अतिशय हुशार ड्रायव्हर. गाडीचे चक्र धरले की ते ड्रायव्हर, पण एरवी आमचे कुटुंबीयच असे नाते होते. मामांच्या जिवाची केवढी मोठी जबाबदारी त्यांच्यावर असे ! सुरुवातीला जुन्या गाड्या, त्यांची किती पंक्चर्स होत ! ते जोगळेकरांनाच एकट्याला करावे लागे. क्लीनर वगैरे कोणी नाही, पण न कंटाळता हे करणे म्हणजे नवलच होते. रात्री, दिवसा साहेब जेव्हा म्हणतील तेव्हा यांची फॅक्टरीवर, मुंबईला कुठेही जाण्याची,

प्रवासाची तयारी. त्यांनी आमच्याकडे कमीत कमी चाळीस वर्षे तरी नोकरी केली. त्यांची हुषारी पाहून मामा त्यांना म्हणायचे, "नुसता ड्रायव्हर काय राहतोस ? जरा जास्त शीक, मेकॅनिक हो." अर्थात ते काही त्यांना जमलेच नाही.

माझ्या आठवणीत म्हणजे १००० टनांच्या कारखान्याची उभारणी चालू असताना, श्री. जोगळेकर मामांबरोबर पुण्याहून कारखान्यावर जायचे, मग येताना स्कोडाचा इंजिनियर व मामा पुण्यात यायचे. मामांना घरी सोडून फार तर एखादा कप चहा प्यायचे व स्कोडा कंपनीच्या माणसाला घेऊन लगेच मुंबईला जायचे, त्याला मुंबईला सोडून परत पुण्याला मामांच्या सेवेस हजर. त्यांच्या ह्या कष्टाची कमाल वाटते. जर त्या वेळी त्यांना कोणी सांगितले, 'जोगळेकर, आम्हाला जरा अमुक ठिकाणी सोडून ये' तर ते हलणार नाहीत. साहेबांचे काम महत्त्वाचे. श्री. जोगळेकरांनी मामांची फार इमानेइतबारे सेवा केली. मामांच्या निधनानंतर माझ्या दोन्ही भावांनी त्यांच्या कुटुंबाशी अतिशय सलोख्याचे नाते ठेवले असून त्यांच्या कुटुंबाशी सर्व तऱ्हेची काळजी घेतली आहे. दोन-चार वर्षांपूर्वीच श्री. जोगळेकर स्वर्गवासी झाले. त्यांच्या पत्नी अजूनही आमच्याकडे येतात. माझी वहिनी सौ. रेखा त्यांची काळजीपूर्वक चौकशी, त्यांचे अगत्य करते हे विशेष. मामांचे जसे जोगळेकर तसे माझ्या काकांचे ड्रायव्हर श्री. महाजन. हे आमचे महाजन नेहमी कोट, टोपी, धोतर, सदरा या पेहरावात असायचे. त्यांचा विशेष म्हणजे फिरतीची नोकरी असूनसुद्धा ते संसारदक्ष होते. त्यांनीही ती. काकांची अतिशय निरलसपणे सेवा केली. तेसुद्धा आमच्याकडे तीस-पस्तीस वर्षे तरी नोकरीत होतेच. त्यांचा मुलगा हुशार आहे. सध्या मा. सुरेश कलमाडी यांचा पी. ए. म्हणून काम करतो, अशी माहिती ज्ञानेश्वरने दिली. आमच्याकडे ज्यांनी नोकरी केली, त्यांचे कल्याण झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. मामांची पुण्याई, प्रामाणिकपणाने केलेले कष्ट व नोकर माणसांबद्दलची आत्मीयता ह्यालाच ह्याचे श्रेय आहे. कितीही आठवणी लिहिल्या तरी त्या अपुऱ्याच वाटतात. एवढा सगळा व्याप होता,

त्रास होता, तरी मामा घरात आल्यावर कधी चिडलेले, संतापलेले आमच्या स्मरणात नाहीत. जेवढा वेळ घरी असत, तेव्हा कधी हास्यविनोद, कधी विरंगुळा म्हणून केलेल्या गप्पागोष्टी, शिक्षणा-बद्दलची विचारपूस अशाच गोष्टी चालत. त्यांची आठवण म्हणजे ते म्हणत, "मंदिरात देवदर्शनाला जाताना पादत्राणे बाहेर काढून ठेवायची असतात." केवढा मोठा आशय ते सांगत असत. घर म्हणजे प्रसन्न मंदिरच, तेव्हा तेथे प्रवेश करताना बाहेरच्या काळज्या, कटकटी बाहेर ठेवूनच आत शिरावे. घरीसुद्धा जेवताना एखादा पदार्थ आवडला, चांगला झाला की आईला ग. ल. ठोकळांची 'लई सुग्रण माझी कारभारीण' अशी कविता गमतीने म्हणून दाखवीत असत. रोज जेवायला त्यांना खूप उशीर व्हायचा. ऑफिस, भेटायला येणारे लोक, टपाल, पैशांची तरतूद या सर्व गोष्टी करताना त्यांना वेळेचे गणित कधी जमले नाही. सर्व कार्यक्रम अनियमित असायचा. आंघोळ वगैरे पण वेळेनुसार कधी लवकर, कधी उशिरा. आंघोळीनंतर ठराविक देव-देवतार्चन, पूजाअर्चा, पण सर्व कामावर अवलंबून. आठवड्यातले तीन-चार दिवस तर फॅक्टरी, कधी मुंबई, दिल्ली अशी भ्रमंती. पुण्यात असतील तेव्हा कामाचे डोंगर असायचेच. पण त्यातूनही वेळ काढून ते मनन, वाचन, चिंतन करीत असत हे विशेष. खेळांची आवड होतीच. लहान वयात ते स्वतः हुतूतू व आट्यापाट्या चांगले खेळत असत. घोड्यावर बसत असत. चि. ज्ञानेश्वरने अशीच तालीम तालीम करावी व मेहनत करावी म्हणून त्याच्याकरिता स्पेशल आखाडा तयार केला होता. त्याच्याकरिता व त्याच्या मित्रमंडळींना खुराक, थंडाईसाठी पोत्यावारी बदाम वगैरे आणत असत. आज महागाईच्या काळात हे खोटे वाटेल, पण माझा भाऊ ज्ञानेश्वरही ही आठवण सांगेल. ज्ञानेश्वरने, माझ्या आठवणीप्रमाणे १९५३ साली भिकुसा यमासा क्षत्रियांच्या मुलाबरोबर एक कुस्ती जिंकली होती. ती. मामा असतानाची ही गोष्ट आहे. चि. जगदीशने पण खूप शिकावे असे त्यांना वाटे. आमच्या घरी आला-गेला खूप. अभ्यासाला स्वतंत्र जागा नाही, म्हणून त्याचा अभ्यास शांतपणे


व्हावा म्हणून त्याला फर्गसन कॉलेजच्या होस्टेलमध्ये ठेवला होता. चि. पंडित (जगदीश) अभ्यासाबरोबर नाटकात काम करणे, खेळ व फोटोग्राफी शिकत होता. पण मामा गेल्यावर त्याचे आयुष्य बदलून गेले.

मामांनी प्रत्येक मुलाला, मुलीला त्याच्या आवडीप्रमाणे शिक्षणाला, कलेला वाव दिला. आईने प्रोत्साहन दिले. असे आईवडील मिळणे म्हणजे, 'आईबाप हे दैवत माझे... कशाला जाऊ पंढरपुरी' असे आहे.

१९५३ साली माझा विवाह झाला. हेच माझ्या वडिलांच्या हयातीतले शेवटचे कार्य. त्यानंतर मधुमेहाचा त्रास सुरू झाला. विरोधकांच्या कारवाया व सरकारी धोरण यामुळे ते वैतागून जात. ते तसे कधी कोणाला दाखवायचे नाहीत, भासून देत नसत, पण अंतरी कणाकणांनी थकत होते. जाईपर्यंत तब्येत चांगली होती, उत्साह होता. पण अपेक्षाभंगाचे दुःख होते. आपण काढलेला साखरकारखाना हा महाराष्ट्राचे भूषण आहे, असे असताना हा शेटजींच्या घशात घालण्याचा आपल्याच मराठी माणसांनी केलेला प्रयत्न हेच अपेक्षाभंगाचे कारण होते. साधुवृत्ती असल्यामुळे त्यांनी संयमाने ही गोष्ट घेतली. परंतु विष हे जाणून खा की न जाणून खा, त्याचा परिणाम होणारच आणि तसेच झाले.

त्यांची पाठ, सांधे हे वातप्रकृतीमुळे आताशा कधी कधी दुखत. तेव्हा त्यांना कोणी वज्रेश्वरीच्या कुंडातल्या पाण्याने आंघोळ करा म्हणजे बरे वाटेल, असे सांगितले होते. म्हणून ते वज्रेश्वरीला जात असत. तसेच ९ जून १९५६ या दिवशी सकाळी नेहमीप्रमाणे वज्रेश्वरीला गेले, तेथे कुंडात आंघोळ करून बाहेर आले व त्यांना अस्वस्थ वाटू लागले. ते वज्रेश्वरीहून नेहमी मुंबईला जात व मग मुंबईहून पुण्यास येत. त्यांना फार अस्वस्थ वाटू लागल्यामुळे माझ्या वडिलांनी ड्रायव्हर जोगळेकर यांना सांगितले, "आता मुंबई नको, पुण्यास जाऊ." ते वज्रेश्वरीला नित्यानंदस्वामींचे दर्शन घेत असत. नित्यानंदस्वामींचे मौन असे, ते कोणाशी बोलत नसत. पण

वडिलांनी नमस्कार केल्यावर " घरी जा " एवढेच शब्द बोलले. बरोबर श्री. सबनीस होतेच. त्यांनी जवळच्या भिवंडीच्या डॉ. प्रधान यांना प्रकृती दाखविली. त्यांच्या सल्ल्याप्रमाणे त्यांनी दोन तास डाकबंगल्यावर विश्रांती घेतली व ते पुण्याला यावयास निघाले. सहा वाजता पुण्याच्या वेधशाळेजवळ गाडी आली, ड्रायव्हर जोगळेकरांनी जास्तीत जास्त लवकर घरापाशी गाडी आणून उभी केली. एवढ्या यातना होत असतानाच ओंकारेश्वर मंदिराकडे पाहून हात जोडले. घरच्यांना काहीच कल्पना आली नव्हती. ते गाडीतून स्वतः उतरले, दोन पायऱ्या चढून वर आले. त्यांनी आपला कोट स्वतः काढला व आजीचा फोटो होता त्यावर लावला. माझी आई समोर उभी होती. तिच्याकडे पाहून खाली गादीवर बसले आणि एका क्षणात सारे संपले होते.



कंपनीचे गेस्ट हाऊस म्हणजे 'काकांच्या पत्र्यात'
श्री. नारायणकाका आगाशे श्री. चंद्रशेखर तथा मामासाहेब आगाशे



आगाशे परिवार
डावीकडून उभे : सौ. सरला भिडे, सौ. विमल खरे, सौ. लीला मेहेंदळे, सौ. निर्मला सहस्त्रबुद्धे, सौ. शकुंतला करंदीकर, सौ. शामला कर्वे
डावीकडून बसलेले : श्री. पंडितराव आगाशे, श्री. ज्ञानेश्वर आगाशे,



श्री. ज्ञानेश्वर व सौ. रेखावहिनी
(डावीकडून उभे) चि. मंदार, कु. शीतल, चि. आशुतोष



आईची माया देणारी मा. साहेबांच्या (आत्याबाई) भगिनी
(कै.) सौ. जानकीबाई रामचंद्र थत्ते
आम्हा भावंडांच्या आत्याबाई

# उत्तररंग

ती. मामा आजीच्या फोटोवर कधीच कोट लावत नसत. पण आता तू पुढचे पाहू नकोस म्हणून कोटाने आईचे डोळे झाकले आणि स्वतःचे मिटले की काय ! ज्या मातेने स्वतःच्या मृत्यूच्या वेळी हसत जगाचा निरोप घेतला, ज्या मातेने मांगदरी सोडताना सांडलेले अश्रू शेवटचेच म्हणून पुण्यात आपल्या मुलांना आणून जिद्दीने वाढविले; त्यांचे कर्तृत्व, दातृत्व, कष्ट व यश हे सगळे भरल्या डोळ्यांनी पाहिले, त्या मातेचे छायाचित्र कदाचित हा आपला लाडका राजा असा अकस्मात गेलेला पाहून अश्रू ढाळेल असे तर नसेल ना वाटले ? सारा वाडा, सारा परिसर कोसळला. एक सामान्य शिक्षक म्हणून जीवनाची सुरुवात करून त्यांच्या नावामागे बिरुदे लावली. कर्तबगारीने पहिल्या प्रतीचे कारखानदार, स्वदेशनिष्ठा, स्वदेशप्रेम, परोपकारी वृत्ती, साधी राहणी, दान-शूरता, दुर्दम्य आशावाद, ‘हाती घ्याल ते तडीस न्या’ हे ब्रीद आचरणात आणणारे, कोणत्याही परिस्थितीत न डगमगणारा, अतुल धैर्याचा मेरुमणी, पांडुरंगाचे निस्सीम भक्त व ज्ञानेश्वर माउलीला गुरुस्थानी मानणारे व आळंदी संस्थानचे पंच असे आमचे परमपूज्य व आम्हाला प्रिय असणारे वडील हृदय-विकाराचा झटका येऊन ९ जून १९५६ रोजी संध्याकाळी सहा वाजता आम्हांला दुःखसागरात लोटून, पोरके करून न परतीच्या प्रवासाला निघून गेले. त्यांच्यावर काळाने अकस्मात घातलेली ही झडप माझ्या आईला व आम्हा भावंडांना दुःखाच्या खाईत टाकून गेली. चि. पंडित कॉलेजमध्ये शिकत होता व चि. ज्ञानेश्वर तर

आठव्या इयत्तेत शिकत होता. दोन्ही मुलांना वडिलांच्या व्यवहारांची माहिती नाही. आणि 'आता पुढे काय?' हा प्रश्न होता. पण चि. पंडित व माझी आई यांनी धीरोदात्तपणे सर्व समस्यांची उकल केली.

आगाशेसाहेब गेल्यानंतर आधीपासूनच विरोधात असणारी मंडळी अधिकारप्राप्तीची स्वप्ने बघू लागली. आगाशांचा मुलगा सतरा-अठरा वर्षांचा, तो काय टिकाव धरणार? अशीच त्यांची समजूत. साहेबांच्या मृत्यूमुळे श्री. दामुअण्णा पोतदारांसारखे उपद्व्यापी गृहस्थ सिंडिकेटच्या संचालकमंडळात येऊ शकले. त्या वेळचे महाराष्ट्र, माया, माधुरी वगैरेचे संपादक लिहितात की, "पोतदारांनी त्यांच्या कावेबाज स्वभावाला अनुसरून एक संधी मिळविली. श्री. आगाशे यांनी कार्टिंग एजंट श्री. पटवर्धन यांचेकडून दीड लाख रुपये कर्जाऊ घेतले होते व त्याची प्रॉमिसरी लिहून दिली होती. श्री. आगाशे वारल्यानंतर त्यांच्या, या जगाचा काहीही अनुभव नसलेल्या अशा सरळ व निष्पाप मुलाकडून – चि. जगदीशकडून सदर प्रॉमिसरी पुन्हा लिहून घेतली. पण दीड लाखाच्या वसुलीची त्यांना खात्री वाटेना. म्हणून श्री. पटवर्धन यांनी संचालकमंडळात येण्याचा प्रयत्न चालविला. या कामी त्यांना जोडीदार पाहिजे होता. म्हणून श्री. पोतदार–पटवर्धन या दोन पापग्रहांची युती झाली. त्या दोघांनी संचालकमंडळात शिरण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा सुगावा कोणाला लागू दिला नाही. उलट, कै. आगाशे यांच्या चिरंजीवांना सिंडिकेटच्या संचालकमंडळावर आणीत आहोत असा आभास निर्माण करून त्यांच्या नावाने तसे जाहीर पत्रक काढून सिंडिकेटच्या भागधारकांकडे रवाना करण्यात आले. संचालकमंडळानेही पुढील धोका लक्षात घेऊन कै. आगाशे यांच्या नावाचे शेअर्स मुलांच्या नावे ट्रान्स्फर करण्याची घाई केली. श्री. आगाशे यांचा मुलगा संचालकमंडळावर उभा असल्याने त्याला कै. आगाशे यांची पुण्याई उपयोगी पडली. पुढे श्री. पोतदार यांनी कारस्थान करून, चि. जगदीशची उमेदवारी बेकायदा ठरविली व पटवर्धनांनाही अशाच युक्तीने हवेत उडविले व

प्रॉक्सीच्या जोरावर स्वत: निवडून आले." त्यांच्या 'महाराष्ट्र' या मासिकात श्री. अंबिके यांनी दा. वा. पोतदार व आ. रा. भट यांचे फोटो देऊन कली व कलुषा असे नाव दिले आहे. हे वृत्त मे १९५७ मध्ये दिलेले आहे. हेच दोघे नव्हे तर अशा अनेक लोकांनी 'पंत मेले राव चढले' या उक्तीप्रमाणे सत्तेसाठी प्रयत्न केले. पण माझा भाऊ चि. पंडित हा अतिशय शांत व धीम्या विचारांचा होता. तो मुळीच डगमगला नाही. ती. काकांच्या जागी असलेले श्री. सबनीस यांच्यावर विश्वास ठेवून, त्यांना योग्य मान देऊन, तो या सर्वांतून स्वप्रयत्नाने बाहेर पडला. आगाशेसाहेबांनी लढाई तर जिंकली होती, पण त्यानंतरचा राज्यकारभार फार कठीण होता. १९५५-५६ पासून कंपनीची स्थिती सुधारू लागली होती. ठेवीदारांचा ठेवी परत मागण्याचा ओघही कमी झाला होता. माझ्या वडिलांनी सर्व सेवकवर्गावर विश्वास टाकून जबाबदारीची कामे सोपविण्याची पद्धत ठेवल्यामुळे कारखान्यातील किंवा पुण्याच्या कार्यालयातील सर्वच मंडळींना आपापल्या कामाची पूर्ण माहिती होती. आपल्या हाती सर्व सत्ता न ठेवता त्याचे विकेंद्रीकरण केले होते. आजची आधुनिक पद्धत साहेबांनी ४० वर्षांपूर्वीच अमलात आणली होती. तांत्रिक बाजू श्री. केशवराव चाफेकर (जनरल मॅनेजर) यांनी समर्थपणे सांभाळली. कै. शंकरराव लिमये यांचेकडून संचालकमंडळाला योग्य मार्गदर्शन मिळाले. बँकेने आर्थिक साहाय्य देणे जरुरीचे होते. ते सर्व पंत पटवर्धन व श्री. वाळिंबे यांनी सांभाळले. महत्त्वाचे म्हणजे माझ्या वडिलांवरील अपार श्रद्धेने कामगारवर्ग एकोप्याने प्रशासनाच्या पाठीशी उभा राहिला. ठेवीदार व भागधारक यांचे सहकार्यही मिळाले.

हे सर्व ठीक. चि. पंडित काही दिवस रु. ५००/– महिना घेऊन ऑफिसला जात होता. १९५७–५८ मध्ये चि. पंडित संचालकमंडळावर आला, व चि. ज्ञानेश्वर १९६६–६७ मध्ये संचालकमंडळावर आला. १–७–१९७० पासून जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून धाकटा बंधू चि. ज्ञानेश्वर याच्याबरोबर काम पाहू लागला. वडिलांचे नाव मोठे व कर्तृत्वही, आणि चि. पंडित

वयाने व अनुभवाने लहान. तेव्हा त्याच्याकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन वेगळा होता. हा एवढा सर्व कारभार पाहू शकेल किंवा नाही याबद्दल संदेह होता. परंतु चि. पंडित सुईच्या नेढ्यातून जसा दोरा अलगद बाहेर पडतो तसा सर्व परिस्थितीतून बाहेर पडला. त्याने कंपनीची भरभराटच केली. त्यालाही शेतीची आवड. त्यामुळे श्रीपूर परिसरातील शेतीविकासाकडेच त्याने आपले सर्व लक्ष केंद्रित केले होते. जमिनी खरेदी करण्यापासून, तर विहिरी खोदणे, पाइपलाइन टाकणे, लिफ्ट स्कीम उभी करणे व उसाचे उत्तम पीक घेणे इत्यादी सर्व कामांसाठी गरजू शेतकऱ्यांना अत्यंत सढळ हाताने व कित्येक प्रसंगी विना-व्याजही कर्ज दिले. वडिलांप्रमाणे उदार वृत्ती असल्यामुळे कित्येक गरीब शेतकऱ्यांनी या मदतीचा उपयोग करून घेतला. खायची भ्रांत असलेली काही कुटुंबे (शेतकरी) स्वतःची घरेदारे, वाहने इ. बाळगून सधन बागाईतदार म्हणून त्या भागात ओळखली जाऊ लागली आहेत. त्या क्षेत्रातील हीच एक कंपनी आहे की जिने एक कोटी नव्वद लाख रु. ची रक्कम कर्ज म्हणून दिली, त्यासाठी स्वतः भरपूर आर्थिक झळ सोसली व माळशिरस तालुक्यातील श्रीपूर परिसरा-मधील सहाराचे हरितक्रांतीत रूपांतर केले. याचे सर्वस्वी श्रेय चि. पंडित यास आहे. त्या परिसरातील शेतकरीवर्गाच्या अंतः-करणात चि. पंडित यांचेबद्दल अपार प्रेम, आदर आजही अनुभवास येते. चि. पंडित यावर लहान वयातच, वडिलांचे आकस्मिक निधन झाल्यामुळे, फार मोठी जबाबदारी पडली. त्यातून जरा कुठे स्थिरस्थावर होणार तर त्याहून भयंकर धक्का पानशेतच्या पुराचा. त्याचा चि. पंडितवर फार मोठा परिणाम झाला; तरी त्यातूनही धडपड करून त्याने कागदपत्र वाचविले. त्याने ते कागदपत्र घेऊन बाहेर पाऊल टाकले अन् पाण्याच्या महाभयंकर लोंढ्यात घर जमीनदोस्त झाले. तो धक्का त्याच्या सहनशक्तीबाहेरचा होता. त्यानंतर दोन-तीन वर्षे तो आजारी होता. त्याच्या मनाला जबर-दस्त धक्का बसला होता. त्यातून तो सावरला व नंतर कंपनीची सर्व सूत्रे हाती घेतली. त्या आजारात त्याला फार त्रास झाला. पण

तो बरा झाला, पूर्ववत झाला, हीच आमच्यावर परमेश्वराची कृपा होती. त्या वेळी श्री. सबनीससाहेब जसे त्याच्या पाठीशी उभे राहिले तसेच श्री. रा. ह. केळकर यांनीही फार मदत केली. ते पंडितची मोठ्या भावाप्रमाणे काळजी घेत होते; व त्यांनी कंपनीच्या व्यवहारात पण कै. चि. पंडित व श्री. ज्ञानेश्वर यांना फार मोलाची मदत केली आहे. त्यांच्या पत्नी कै. सौ. लीलाताईंनीही पंडितच्या आजारात फार मदत केली. आमची कै. सौ. ताई त्यांच्याजवळ होती, तिलाही त्या धीर देत असत व मदत करत असत. त्यांच्या घरीच आमची राहायची सोय करीत असत.

कंपनीचा कारभार आता चांगला चालू झाला. चि. पंडितही प्रत्येक गोष्टीत रस घेऊ लागला. त्याच्या कर्तृत्वाची ओळख आता सर्वांना पटली होती. हळूहळू चि. ज्ञानेश्वरची जोडही त्याला मिळू लागली होती. सरकारने पूर्वीच अस्तित्वात आणलेला कूळकायदा आता साखरकारखान्यांना लागू करण्यात आला. त्यामुळे कंपनीच्या जमिनीवर परिणाम झाला. सरकारी धोरणामुळे बऱ्याचशा जमिनींवर कारखान्याला पाणी सोडावे लागले. एकंदर सर्व बाजूंनी चि. पंडितच्या मागेही त्रास चालू होता. इन्कम्‌टॅक्स, सेलसटॅक्स, इतर कांही जुनी देणी वगैरे गोष्टींना त्याला सामोरे जावे लागले होते. त्याची परिस्थिती म्हणजे दगडाखाली हात सापडावा तशी होती. परंतु कै. श्री. सबनीससाहेब, कै. श्री. केळकरसाहेब यांच्यासारखे दीपस्तंभ त्याला लाभले म्हणून त्याचे निभावून गेले. रवीन्द्रनाथ टागोरांच्या गोष्टीची आठवण झाली. " एका गावात भोळीभाबडी माणसे राहत होती. उठल्यापासून सूर्योदय झालेला पाहून आनंदित झाली. सर्व कामधाम करून घराच्या अंगणात बसली होती. सूर्य मावळू लागला, तशी सर्व घाबरली, आता अंधकार होणार, सूर्य गेल्यानंतर आमचे कसे होणार म्हणून हवालदिल झाली, रडू लागली, तरी सूर्य नेमाप्रमाणे अस्तास गेला. काळोख झाला, दयनीय स्थिती झाली, सर्व संपले असे सर्वांना वाटू लागले. तेवढ्यात एक लहानसा आवाज ऐकू आला. सर्वांनी तिकडे डोळे व कान लावले. दूरवर पाहिले तर एक अगदी छोटा

दिवा होता. तो आपल्या ताकदीप्रमाणे प्रकाश देत म्हणाला, 'घाबरू नका, सूर्य अस्तास गेला तरी मी आहे ना ? मी तुम्हाला प्रकाश देईन.' लोकांना आनंद झाला." या गोष्टीप्रमाणेच आगाशे-साहेब पडद्याच्या आड गेले तरी माझे हे दोघे छोटे भाऊ त्यांच्या कर्तृत्वाच्या प्रकाशाने कंपनीचे भविष्य उजळीत राहिले.

पण दैव किती निष्ठुर आहे पाहा. हे आमचे सुखही दैवाला पाहवले नाही. १ फेब्रुवारी १९८३ या दिवशी माझी आई स्वर्गवासी झाली. माया, ममता, जिव्हाळा हे शब्द त्या दिवसापासून फक्त कागदावरच राहिले, प्रत्यक्षात आईबरोबरच संपले !

हे दुःख कमी पडते असे देवाला वाटले की काय कोण जाणे ! चि. पंडितला १९८४ मध्ये हृदयविकाराचा झटका आला. निष्णात डॉक्टर सरदेसाई, डॉ. खरे यांच्या प्रयत्नाने तो पूर्ण बरा झाला. त्यानंतर तीन वर्षे तो इतका उत्साही व आनंदी होता की मागच्या काही वर्षांत त्याला एवढा आनंदी आम्ही पाहिला नव्हता. कारखाना व ऑफिसचे काम, घरी सर्वांशी मनमोकळे बोलणे-चालणे, असा छान दिनक्रम चालू होता. पुढच्या संकटाची चाहूल, पुसटशी कल्पनाही आम्हांला आली नाही. १५ नोव्हेंबर १९८६ रोजी, तो नेहमीप्रमाणे श्रीपूरला गेला. तेथे त्याला बरे वाटत नव्हते म्हणून पुण्याला आला. ड्रायव्हर साधू याने त्याची खूप काळजी घेतली. घरी येऊन झोपला. बरे वाटेना म्हणून पाचच्या सुमारास माडीवरून उतरून हॉलमध्ये आला व आमच्या आई-वडिलांचा मोठा फोटो लावलेला आहे, तेथे कोचावर झोपला. तीच त्याची काळझोप ठरली. नियतीने असा निष्ठुर दावा साधला. देवा, तुला दयाळू म्हणतात ना, मग तू हे मन निष्ठुर का केलेस ? त्या सिंहाच्या छाव्याला असे अकाली उचलून का नेलेस ?

१६ नोव्हेंबर १९८६ हा दिवस काळा दिवस ठरला. हृदय-विकाराने चि. पंडितचा बळी घेतला. एक राजस व उमदे व्यक्तिमत्त्व पंचत्वात विलीन झाले. चि. ज्ञानेश्वरला दुःख आवरणे कठीणच होते. पण त्याला धीर द्यावयास मोठी बहीण—सौ. ताई

होती. तिने सर्वांना धीर दिला. तिचीही तब्येत त्या वेळी बरी नव्हती. पण तशाही परिस्थितीत ती भावंडांना धीर देत होती. कै. चि. पंडितची तर तिने अहोरात्र काळजी घेतली. त्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत तीच जवळ होती. चि. पंडित आमचा लहान भाऊ (तिघींपेक्षा). तो अकाली गेल्यामुळे घराचा दौलतीचा खांबच कोसळला. आम्ही जरा दु:खात बाजूला होणार तर कै. चि. पंडितच्या निधनानंतर दीड महिन्यातच आमची सर्वांची लाडकी बहीण – सौ. ताई मधुमेहाच्या आजारात हृदयविकाराने स्वर्गवासी झाली. काय करावे हो आम्ही ? एकावर एक हे आघात दैवानें आम्हाला का द्यावे ? पण नशिबाचे भोग कुणाला सुटत नाहीत हेच खरे !

# फिरत्या चाकावरती

ह्या सर्व परिस्थितीत चि. ज्ञानेश्वर याने आपले सर्व दुःख आवरून आगाशे परिवारातील सर्व कंपन्यांची जबाबदारी समर्थपणे उचलली आहे. वडिलांचा वारसा चालविणाऱ्या ज्ञानेश्वराचे हृदय सिंहाचे आहे. आगाशेसाहेब त्याला 'हा माझा सिंह आहे' असे म्हणत असत. त्याचाच अनुभव आता येतो आहे. उत्तम चाललेल्या या कारखान्यास सरकारी धोरणामुळे पुन्हा एकदा अडचणीचे दिवस आले. स्टेट फार्मिंगने अडवणुकीचे धोरण स्वीकारले. पुन्हा एकदा आर्थिक कोंडी. दुसऱ्या क्षेत्रात शिरण्यास कंपनीजवळ भांडवल नव्हते. कच्चा माल म्हणून दारूच्या धंद्यास वापरता येईल असे स्पिरिटचे उत्पादन (Industrial Spirit) म्हणून कंपनी करीत होती. हजारो कुटुंबे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कंपनीवर अवलंबून होती. म्हणून आगाशे कुटुंबियांची मानसिक तयारी नसतानाही अत्यंत नाइलाजाने कंपनीला मद्यार्कांच्या व्यवसायात उत्पादक म्हणून पदार्पण करावे लागले. आणि ज्या वेळी महाराष्ट्र सरकारने देशी दारूच्या उत्पादनास परवानगी दिली, त्या वेळी बृहन्महाराष्ट्राचे उत्पादन बाजारात प्रथम आले. इतक्या तडकाफडकी व विलक्षण गतीने कंपनीने उत्पादन बाजारात आणले की, या क्षेत्रात शतक गाठलेल्या कंपन्यांना आश्चर्याचा विलक्षण धक्का बसला. प्रत्येक माणसाला वेगवेळच्या निमित्ताने आयुष्यात संधी येते. परंतु त्यावर व्याघ्रदृष्टीने लक्ष ठेवून संधी साधणे जमतेच असे नाही. परंतु चि. ज्ञानेश्वरला प्रयत्नांती ते साधले आहे. मालाचा दर्जा उत्तम असल्याने कमी नफ्यातही व्यापारी आपला माल घ्यावयास

तयार असत. परंतु त्यांनाही योग्य नफा मिळाला पाहिजे असा चि. ज्ञानेश्वरचा प्रागतिक दृष्टिकोन असल्याचे अनेक प्रसंगांतून लक्षात येते.

कंपनीच्या 'रम' या मद्याला परदेशात मागणी आहे आणि त्याप्रमाणे निर्यातही झाली आहे. त्याच सुमारास मा. मोरारजी देसाई यांनी पंतप्रधान असताना दारूबंदीचा पुरस्कार केला. म्हणून कंपनीने कॅनडात माल उत्पादन करण्यास सुरुवात केली. परंतु मालाला मागणी चांगली असली तरी लक्षावधी रुपयांच्या जाहिरातस्पर्धेत उतरणे, हिंदुस्थानात राहून तिकडे अर्थ-साहाय्याच्या दृष्टीने अशक्य झाले व तेथील कार्यभाग आवरावा लागला. आर्थिक नुकसान सोसावे लागले तरी चि. ज्ञानेश्वरच्या व्यवहारकुशलतेमुळे व सर्व क्षेत्रांत व्यक्तिगत संबंध जोडण्याची, कायमचे प्रस्थापित करण्याची त्याची विलक्षण हातोटी यामुळे बृहन्महाराष्ट्राला फार मोठी आर्थिक झळ सोसावी लागली नाही. विजयात सगळेच साथीदार असतात; पण योग्य समयी, यशस्वी माघार घेण्यात सेनापतीची कसोटी लागते. चि. ज्ञानेश्वरचे हे गुण या वेळी प्रकर्षाने जाणवतात. चि. पंडित गेल्यानंतर मात्र तो एकाकी पडला. अनेक आर्थिक अडचणी व सरकारी धोरण यामुळे कोणीही माणूस वैतागेल; पण ज्ञानेश्वर मात्र त्याच्या लहान वयात अनपेक्षित येणाऱ्या अडचणी, काही वेळा होणारी मानहानी व कुणावरही न रागावता शांत वृत्ती ठेवतो. हे त्याला कसे जमते असा विचार येतो. त्याला क्रिकेटची अतिशय आवड. महाराष्ट्राच्या रणजी ट्रॉफीमध्ये तो यष्टिरक्षक व. आघाडीचा फलंदाज म्हणून खेळत असे. एक आक्रमक फलंदाज म्हणून त्याला ओळखले जाई. यष्टिरक्षणाचे धडे त्याने कै. नाना जोशी यांच्याकडून घेतले. महाराष्ट्र रणजी ट्रॉफी क्वचितच जिंके. तो म्हणतो, "आम्हाला हरण्याचीच सवय. त्यामुळे अशा खेळातून स्वतःवर फार मोठा परिणाम होऊ न देता हार-जीत स्वीकारायची सवय मनाला झाली." त्यामुळे कंपनीच्या अडचणी व मान-अपमान याला तो शांतपणे सामोरा जातो. चि. ज्ञानेश्वरचे ऑफिसमध्ये येणाऱ्या

व्यक्तीशी, सेवकांशी वागणे अतिशय आपुलकीचे आहे. प्राथमिक शाळेतील त्याचे शिक्षक असोत वा अन्य कोणी मोठी व्यक्ती ऑफिसमध्ये आली तर त्यांना आत बोलावतो. स्वत: केबिनचे दार उघडतो, कामानिमित्त येणाऱ्या परिचित-अपरिचित व्यक्तीचे उभे राहून हसून स्वागत करतो. ही कृती साधी वाटली तरी संस्कारांशिवाय हे शक्य नाही. चि. ज्ञानेश्वर कामानिमित्त अनेक वेळा परदेशांत जातो; पण काम संपल्याबरोबर मायदेशात येतो. त्याची 'डॅडी-मम्मी' संस्कृती नाही. मुले वडिलांना बाबा व आईला आईच म्हणतात. चि. मंदार – मोठा मुलगाही वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून आहे. चि. ज्ञानेश्वरला वाटणारा एकटेपणा तो दूर करेल अशी खात्री वाटते. आमच्या आई-वडिलांची पुण्याई व आशीर्वाद आम्हा सर्वांच्या पाठीशी असावेत हीच ईश्वराजवळ प्रार्थना आहे!

# सांगता

आगाशेसाहेबांच्या चरित्रलेखनाला सुरुवात केल्यानंतर प्रत्येक शब्दाबरोबर त्या त्या आठवणी, प्रसंग डोळ्यासमोर उभे राहत. माझे मन त्या भूतकालात जाई. आठवणींचे रेशीमधागे उलगडू लागत व कागदावर त्याचे शब्दरूपाने कोश विणले जात. आगाशे-साहेबांचे चरित्र म्हणजे पांडुरंगाच्या खांद्यावरील भरजरी शेला आहे. त्यांचे जीवन गंगेसारखे निर्मळ आहे. विरोधकांचे स्वार्थाने बरबटलेले पाय या गंगौघात सोडले तर त्यांच्या पायांनी गंगा अमंगल होणार नाही, तर सत्प्रवृत्तीच्या प्रवाहात विरोधकांचे पाय म्हणजेच त्यांची वृत्ती बदलेल.

माझ्याही जीवनाची संध्याकाळ होत आली आहे. अशा या माझ्या जीवनात वडिलांबद्दल आदर व्यक्त करावयाची संधी मला मिळाली याचा आनंद वाटतो. हेच चरित्र दहा-अकरा वर्षांपूर्वी लिहिले गेले असते तर जास्त चांगले झाले असते. त्यांच्या सहवासात आलेल्या बऱ्याच व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. पण त्याला इलाज नाही. आता ते लिहिले जात आहे हेही कमी महत्त्वाचे नाही.

या चरित्रातील आठवणी, कै. श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे यांच्या कारखान्यासंबंधी, ऑफिससंबंधीच्या आठवणी, काही दाखले या सर्व गोष्टींची आठवण घेताना मा. नरुभाऊ लिमये, श्री. मुकुंदमामा गोखले, श्री. विनायकराव साठेसाहेब व इतर अनेकांनी संग्रहित केलेल्या आठवणी व माहिती यांच्या आधारे

मी हे चरित्रलेखन करू शकले. निव्वळ या लोकांच्या सहकार्यामुळेच हे लिखाण करणे शक्य झाले. त्यांची मी अतिशय आभारी आहे.

माझ्या आठवणींचा मौक्तिक हार गुंफत असताना त्यातील कंठमणी कै. चि. पंडित व माझी कै. सौ. ताई ही मौलिक रत्ने मात्र ओघळून गेली आहेत, याचेच अतीव दुःख होत आहे.

आगाशेसाहेबांचे चरित्र, त्यांच्या आठवणी म्हणजे बकुलपुष्पे आहेत. ती इतक्या वर्षानंतर सुकल्यासारखी वाटली तरी त्यांचा सुगंध अजून ताजा आहे. वडिलांची महती सांगताना एक कवी म्हणतात—

दातृत्वी कर्ण रुसे । वाच्छपदी जननी फसे ।।
साखर तू अमृत तू । भक्ति तू श्रद्धा तू ।।
कीर्तीचा बांधिला सेतू ।।

अशा माझ्या देवतुल्य वडिलांना, परमपूज्य कै. ती. मामांना व माझी वात्सल्यस्वरूप आई, कै. ती. मामी या आमच्या दैवतांना माझे कोटी कोटी प्रणाम.

आशीर्वाद असू द्यावा । वंदीते मी तुम्हां सज्जनां ।।
जीवनात पदोपदी । आठवीन तुमच्या ऋणा ।।

आगाशेसाहेबांचे चरित्र मी लिहावे असा प्रस्ताव, आम्ही बहिणी एकत्र गप्पा मारीत असताना, बहिणींनी माझ्यापुढे मांडला. हे अवघड काम माझ्यावर सोपवण्याचा विचार ऐकून मी संभ्रमात पडले. कारण सर्वजणी सुविद्य व माझ्यापेक्षा हुशार आहेत. मनाशी विचार केला, या नेहमीप्रमाणे माझी फिरकी घेत आहेत. बघू या प्रयत्न करून, असा विचार आला व लिहिण्यास सुरुवात केली; आज ते दत्तजयंतीच्या दिवशी लिहून पुरे करीत आहे. भगिनींनो ! तुमच्या विचाराशी सहमत होऊन केलेला हा माझा प्रयत्न आहे. आपल्या वडिलांना आदरांजली वाहून चरित्रलेखन पुरे करते. मी हे चरित्रलेखनाचे काम संपविले आहे. आता लेखनाच्या निरोपाचे


क्षण जवळ आले आहेत. आपल्या लहानपणच्या स्मृतींनी, आई-वडिलांच्या आठवणींनी माझ्या मनाची अवस्था अशी झाली आहे–

निरोपाचे क्षण येता । मन हेलावे ओसंडे ।।
मन:पटलासमोरी । गोफ स्मृतीचा उलगडे ।।
पंख लावोनी पऱ्यांचे । संवत्सर येथे गेले ।।
सारे रुसवे फुगवे । स्मृतिरूपे उरले ।।
सहवास थोडा जरी । भावबंध रेशमाचे ।।
असे सोडुनी जाताना । मन सदैव उसासे ।।
सहवास थोडा जरी । ठसे खोल उमटले ।।
अवखळ बाल्य आपुले । विहरले सोनपंखी ।।
नका भगिनींनो रागावू । मनी कष्टी तुमची सखी ।।
निरोपाचे क्षण येता । डोळीयांत आसू येती ।।
झाले गेले विसरोनी । द्यावा निरोप शेवटी ।।

□

वाचोत जे वाचिती, न वाचोत जे वाईट म्हणती,
संतुष्ट होय एक जगत्पति, या यथार्थ निरुपणें ।।
ज्यांस इतर टीकाकारांचे अभिमान, ते न देतील या टीकेस मान,
हरिभक्त निर्मत्सर निरभिमान, ते देतील सन्मान या टीकेंतें ।।

—वामन पंडित



एक सामान्य शिक्षक
एक प्रतिथयश वकील होतो
आणि वकिली पेशातून
एक यशस्वी उद्योगपती.
नियतीने विश्वस्त होऊन
त्याचे नाव ठेवले.

**चंद्रशेखर गोविंद आगाशे**

